म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०३४
IRBK-0101034
IRBK-0101034
IRBK-0101034

IRBK-0101034

पुस्तक-बांधणी
जयभारत प्रिंटिंग प्रेस,
नाईकवाडी शिवाजी पथ ठाणे

दा० क्र० १०३८

# सरलादेवी

अरुणोदय, कृष्णाकुमारी, तंट्याभिल्ल इत्यादि नाटकांचे कर्ते

**वासुदेव वामन भोळे**, बी. ए., एल्एल्. बी. **उमरावती**,

यांनीं लिहिलें.

IRBK-0101034
IRBK-0101034

**प्रथमावृत्ति**

सन १९३१

किंमत बारा आणे

मुद्रकः गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें नं. २.

प्रकाशकः—रा. रा. के. नारायण काळे, बी. ए.
अन्नपूर्णाभुवन, ठाणें.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यांचे स्वाधीन )

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—१ श्रीसमर्थ नाटक मंडळी.
२ के. नारायण काळे, बी. ए.
अन्नपूर्णाभुवन–ठाणें.
३ मुंबई–पुणें येथील प्रसिद्ध
बुकसेलर्स.

.... 9038 ... 128

# कृतज्ञतेचे दोन शब्द.

आज नऊ दहा वर्षांच्या कालावधीनंतर माझी ही दुसरी नाट्यकृति मी रसिकांस सादर करीत आहें. यावेळीं नाट्यविषयासंबंधीं दोन शब्द लिहावेत असं माझ्या मनांत होतं, परंतु अनेक कारणामुळें मला तो बेत रहीत करावा लागत आहे. यानतर राहिलेलं आभारप्रदर्शनाचं, आवश्यक परतु अत्यंत प्रिय असं काम. या दृष्टीनें विचार करतां अगदीं प्रथम आणि प्रामुख्यानं उल्लेख करायचा म्हणजे तो माझे मित्र श्री. रा. रा. त्र्यं. सी. ऊर्फ **अण्णासाहेब कारखानीस** यांचा. मी निःसंशय सांगू शकतो कीं या माझ्या कृतीत रसिकाकडून जे चांगलं म्हणून गणलं जाईल त्याचं बरेंच श्रेय अण्णासाहेबांना आहे. माझ्या अरुणोदय नाटकाचे वेळीं शेवटीं दोन तीन आठवडे धुळ्यास येऊन, त्यांनीं नाटकांत इष्ट असे फेरफार करून घेतले व नाटक बसविण्यास बहुमोल मदत केली. या नाटकांत प्रथमपासून महत्त्वाचे फेरफार सुचवून प्रयोग यशस्वी होण्याकरितां त्यांनीं फार परिश्रम घेतले. या सर्व गोष्टीबद्दल मला जें कांहीं वाटतं तें आभार मानण्यानं पूर्ण-पणें व्यक्त होईल असं मला वाटत नाहीं.

यानंतर माझे मित्र रा. **केशवराव दाते** व **विष्णुपंत औंधकर** यांचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. मला नाट्यलेखनास प्रवृत्त करणारांपैकीं रा. औंधकर हे एक आहेत व माझा रंगभूमीवर प्रवेश झाला तो रा. दात्ये यांचेमुळेंच. माझ्या अरुणोदय नाटकाचे वेळीं उभयतांनीं मला महत्त्वाच्या सूचना केल्या व याही वेळीं तशाच सूचना करून नाटक बसविण्याच्या कामीं फार कळकळीनें श्रम घेतले. रा. औंधकर यांचे सहकारी रा. **दत्तोपंत वैशंपायन** व रा. **सितारामपंत जोशी** यांनींही नाटक यशस्वी होण्याकरतां आपलेपणानें फार मदत केली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

**श्रीसमर्थ मंडळीनें** हें नाटक उत्तम सजावटीनें रंगभूमीवर आणलें व हल्लींच्या सर्व दृष्टीनें कठीण अशा आर्थिक परिस्थितींत प्रयोग यशस्वी

होण्याकरतां जरूर त्या सर्व गोष्टी करण्यांत कसूर केली नाहीं याबद्दल मी मंडळीच्या चालकांचा आभारी आहे. माझ्या इच्छेप्रमाणें या नाटकाचें दृश्यस्वरूप रसिकांसमोर आणण्याच्या कामीं मंडळींतील नटांचा लाभ मला झाला ही मला विशेष समाधानाची गोष्ट वाटते.

माझे स्नेही रा. रा. के. नारायण काळे व रा. रा. श्री. वि. वर्तक यांनींही वेळोवेळीं माझ्याशीं या नाटकाचे बाबतींत चर्चा करून मला योग्य सूचना केल्या. रा. काळे यांनीं पुस्तकप्रकाशनाचें कार्य हौसेनें पत्करलें व पुस्तक सर्वांगसुंदर होण्यासाठीं फार श्रम घेतले. या उभयतां मित्रांचा त्यांच्या साहाय्याबद्दल मी फार आभारी आहे.

माझे मित्र कै. रा. रा. गर्गे मास्तर, नाट्यछटाकार "श्री. दिवाकर", हे या वेळीं हयात नाहींत याबद्दल फार वाईट वाटतें.

श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्सचे सेक्रेटरी रा. रा. गणेश काशिनाथ गोखले, यांनीं पुस्तक त्वरित छापून देऊन तें आकर्षक होण्यास मदत केली. त्यांच्या साहाय्यामुळेंच हें पुस्तक प्रथम प्रयोगाचे दिवशीं बाहेर पडत आहे. श्रीसमर्थ मंडळींतील प्रॉम्टर श्री. वासुदेव महादेव काळे, यांनीं शुद्धप्रत तयार करणें व छपाईसंबंधीं इतर कामाचे बाबतींत फार मेहनत घेतली. सुप्रसिद्ध पेन्टर रा. पी. एस्. काळे यांनीं, इतर कामांची निकड असतांनाही, अगदीं थोड्या अवधींत नाटकास योग्य असे सुंदर देखावे करून दिले व किर्लोस्करवाडीचे फोटोग्राफर रा. देसाई, यांनीं फोटो व ब्लॉक्स् अगदीं थोड्या वेळांत व सुंदर तयार करून दिले. वरील सर्वांचा मी फार आभारी आहे.

पुणें.
ता. २२।१२।३१.

वासुदेव वामन भोळे.

# सरलादेवी.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला

( **स्थळः**—मुंबई येथील काकासाहेब पंडितांचें—सरलेच्या मामाचें घर. त्यांतील दिवाणखाना नवीन फर्नीचरनीं सजविला आहे. एका बाजूस एक लहानसें टेबल असून त्यावर एक टाईमपीस टिक्, टिक् करीत आहे. टेबलावर मध्यभागीं रविवर्म्याची, श्रीसरस्वती देवीची लहानशी तसबीर, चांदीच्या नक्षीदार फ्रेममध्यें ठेवली आहे. तिच्या डावे हातास सरलादेवीचा लहानपणचा फोटो आहे. उजवे हातास रविंद्रनाथांच 'गार्डनर' हें पुस्तक आहे. एका खिडकी-मध्यें आंत मैना असलेला एक पिंजरा टांगला आहे. या खिडकींतून एका बाजूस श्रीलक्ष्मीनारायणाचें सुंदर व टुमदार देऊळ दिसत असून दुसरे बाजूस मलबार हिलचा एक भागही दृश्यमान आहे. दिवाणखान्याच्या मध्यभागीं ठेवलेल्या वाटोळ्या टेबलाजवळ सरलादेवीचे मामा आणि पालक काकासाहेब कांहीं लिहीत बसले आहेत असा पडदा उघडतो ).

**काका॰**—( टेबलावरचें सामान आवरीत ) अरे नारायण--( किसन येतो ) कोण किसन ? बरं त्या नारायणाला—

**किसन**—हें एक पत्र आलं आहे साहेब.

**काका॰**—दे इकडे आणि त्या नारायणाला पाठवून दे बरं आधीं ! ( किसन जातो ) आटोपतां आटोपतां नऊ झालेंच कीं ! आणि विलायतची बोट तर १०॥ ला बंदरांत येणार. कुणाचं आहे पत्र ? ( नारायण

प्र० क० ) अरे नारायण, ९ वाजले देखील. स्नानाला लवकर पाणी दे बघूं.

**नारायण**—होय साहेब. आपल्याला लवकरच निघायला हवं. मीही सूचना द्यायला येणार होतों. हें काढलंच पाणी. ( जातो )

**काका०**—कुणाचं पत्र ? (चरकून) काय त्या कार्ऱ्यांचं ? घरांतून हाकून लावल्यावर बरं इतके दिवस काळं केलं होतं.आज आतां सरला विलायतेहून यायची अन् आजच त्याचं हें अपशकुनासारखं पत्र ? ( विचारमग्न व खिन्न होऊन वाचूं लागतात. ) काय निर्लज्ज आहे कार्टा; म्हणे मला पांचशें रुपये द्या. कशाला ? दारूंत उडवायला ? "आतांपर्यंत मी भिऊन दूर राहिलों पण यापुढें वडलोपार्जित इष्टेट—माझा हिस्सा"—तुझा हिस्सा ? तुझीं पापं पाहून वाडवडील स्वर्गांत ढळढळा रडत असतील. अन् धमकी काय देतो आहे "या पुढें लाजलज्जा, पितृऋण, सर्व बाजूस ठेवून मला कठोर व्हावं लागेल" लाजलज्जा कांहीं शिल्लक आहे का जवळ ? म्हणे पितृऋण ! पितरांच्या नांवाला काळं फासून चांगलं फेडतोस आहेस बरं बाबा पितृऋण ? आणि इथं येऊन त्रास देण्याची धमकी देतो आहे पुढें ? निर्लज्ज पोरटा. आजच सरला येणार आणि याच वेळेला पत्र लिहून असा अपशकून-डेव्हील.—

**नारायणः**—( प्रवेश करतो ) साहेब स्नानाला पाणी काढलं आहे.

**काका०**—चल आलोंच-( जातां जातां पत्राच्या चिंध्या करीत ) डेव्हील, ब्रूट ( पुन्हां परतून चिंध्या नीट गोळा करून केराच्या टोपलींत टाकीत ) नारायण, नारायण, मी स्नान करून येतों तोंपर्यंत माझी ती तांबडी पगडी नी काळा कोट काढून ठेव. तोच घालून मी बंदरावर जाणार आहे बरं का ?

**नारायणः**—बरं.

**काका०**—आणि ती माडीवरची पश्चिमेकडची खोली त्या किसननी झाडून नीटनेटकी करून तयार ठेवली आहे कीं नाहीं तें तूं एकदां स्वतः पहा. अन् हो, इथल्या जिनसा साफसूफ करून काळजीनं नीट ठेव.

**नारायण**--इथं तर सकाळींच मीं स्वतः सर्व झाडून ठेवलं आहे.

**काका०**--पुन्हां एकदां पहा. केर असेल. अरे सरलेला एवढीसुद्धां अव्यवस्था खपत नाहीं. आजच ती येणार नी थोडसं इकडे तिकडे झालेलं तिला दिसलं म्हणजे मग ? ते कांहीं नाहीं. ती ठेवीत होती, त्याप्रमाणं सर्व जिनसा जिथल्या तिथं पाहिजेत.

**नारायण**--( स्वगत ) सरलाताई म्हणजे प्रत्यक्ष देवताच भेटायला येणार आहेत असं साहेबांना वाटतं आहे.

**काका०**—अरे, ऐकलंस का ?

**नारायण**--( दचकून ) होय.

**काका०**--आणि हे पहा सरलाताईच्या आवडीच्या पाटवड्या कर; सुधारस नी बिरड्यांची आमटी. तिला ती भारी आवडते. विसरूं नको अं. आल्याबरोबर सगळं पाहून पोरीला असं झालं पाहिजे--कसं झालं पाहिजे ?

**नारायण**—त्यांना आईची आठवण होतां कामा नये साहेब.

**काका०**—शाबास. आणि हें पहा चार जिनसा जास्त कर. तिच्याबरोबर पाहुणे येणार आहेत आठवण आहे ना ?

**नारायण**—हो, हो. पण साहेब पाणी निवेल.

**काका०**—निवूं दे. काय पहा—त्या पाहुण्यांच्या खोलींत नवीन फर्नीचर ठेवलं आहेस ना ?

**नारायण**—हो पण साडेनऊ व्हायला आले. तिकडे उशीर—

**काका०**—होऊं देरे बुवा. ( आठवून ) पहा, काय म्हणत होतों मी ? अं—आतां तूंच पहा काय तें ( जाऊं लागतात व पुन्हां घाईनं परतून ) हें पहा नारायण ( थांबून ) कांहीं नाहीं. असूं दे. ( जातात ).

**नारायण**--काय ही म्हाताऱ्याची आज धांदल ? सरलाताई आज विलायतेहून येणार, पण सर्व तयारी अगदीं देवदेवतांच्या स्वागताला शोभेल अशी.

**किसन**--( प्रवेश करतो ) कोण देवता येणार आहेत रे ?

**नारायण**--अरे आपल्या सरलाताई.

**किसन**--सरलाताई !

**नारायण**--तुला माहीत नाहीं ! हो खरंच. तुला कुठून ठाऊक असणार ? त्या विलायतला गेल्यावर तूं इथं नोकरीवर आलास. आपल्या साहेबांच्या त्या भाची आहेत.

**किसन**--भाची ?

**नारायण**--नांवाच्या भाची पण प्रेम पोटच्या गोळ्याहून अधिक आहे त्यांच्यावर.

**किसन**--पण देवतां येणार त्या कोण ?

**नारायण**--झालं ! काय बावळट आहेस रे ! अरे सरलाताई रूप-गुणसंपन्न आहेत. आणि म्हणूनच देवता शोभतात.

**किसन**—असं, असं; एकंदरींत या घरांत आतां आपल्याला दोन मालक.—

**नारायण**--अरे दम खा, जरा दम खा. मालकीण असावी तर अशीच असावी असं उद्यां लेकां तूंच म्हणूं लागशील. आम्हांला तर त्या केव्हां येतील असं झालं आहे. हो खरंच काकासाहेबांनीं इथला कोपरान् कोपरा पुन्हां झाडून ठेवायला सांगितला आहे.

**किसन**--तासा तासाला रे झाडलोट कशाला ?

**नारायण**--तासा तासाला झाडलोट कशाला ? तुला पंचाईत कशाला ? पाय धूं तर म्हणे साखळ्या केवढ्याच्या.

**किसन**--अरे घाल साखळ्या माझ्या पायांत. मी पायही नाहीं धूत आणि किंमतही विचारीत नाहीं.

**नारायण**—बरं, बरं, घे तो ब्रश. तुझ्याशीं जरा जास्त बोलायची सोय नाहीं. अरे बघतोस काय ? उचल ब्रश.

**किसन**--घेतों बाबा, तूं आमचा रिंगमास्तरच पडलास.

**नारायण**--त्या टेबलाकडे नको जाऊस. सरलाताईचं तें टेबल मी साफ करतों. तूं त्या कोचावर मार ब्रश. तो गालीचा सरळ कर कीं; असं रस्ते झाडल्यासारखं काय करतो आहेस ?

**किसन**—( हळूंच ) आतां जास्त गडबड करशील तर तुलाही झाडून टाकीन.

**नारायण**—गुरगुरतो आहेस कायरे असा आपल्याशींच ? थांब; हें टेंगूळ कसलं ? चंची ! ( सतरंजी खालून चंची काढतो. ) टिचभर नाहीं झालास तो तंबाखूरे कशाला. अन हें काय ? विडी ! फेंक बाहेर. इथं कशालारे ह्या जिनसा ! अं ?

**किसन**—अरे, झाडतांना थकलं म्हणजे दम मारण्याकरितां—

**नारायण**—चल काढ ती इस्टेट बाहेर ! अन् ती नाकांतलीही इस्टेट फेंक बाहेर. सारखा सूं सूं काय करतो आहेस, ( किसन चंची व विडी घेऊन जातो. ) लेकाचे नोकर, कुठं वाटेल तिथं जा. साऱ्यांची जात एक. ( किसन येतो ) हं, त्या मैनेच्या वाटींत पाणी आहे कीं नाहीं नीट बघ. हात धुसलेस कीं, घासटलेस दरवाज्याला ?

**किसन**—धुतले तर. ( नारायण सरलेचें टेबल लावीत असतां त्यास) कायरे याच टेबलावरचं सामान अगदीं नेमक्या ठिकाणीं ठेवायला साहेब नेहमीं कशाला रे सांगतात ?

**नारायण**—तुला पंचाईत कशाला ? चल आटप.

( सुंदरराव प्रवेश करून )

**सुंदरराव**—काय आहे रे तंटा? (नारायण गोंधळतो. किसन आ पसरून बघतो ) आ काय पसरला आहेस ? कोणरे हा ? नवीन दिसतो आहे ! नारायण, कसं काय आहेरे बुबा तुमचं ?

**नारायण**—पण काकासाहेब घरीं नाहींत.

**सुंदरराव**—घरीं नाहींत कीं, घरीं नाहींत असं तुला सांगायला सांगितलं आहे. समजलों, समजलों, घरींच आहेत. ते काय करताहेत तेवढं सांग म्हणजे झालं.

**नारायण**—बाहेर जाण्याच्या तयारींत आहेत—

**सुंदरराव**—असूं देत. हं कांहीं चहा बिहा करशील कीं नाहीं ? हें पहा, अगदीं " ए वन् " कर बुवा. तुझा तो पेटंट ब्रुक बाँडच आहे कां चालूं? आर्मी आणि नेव्ही काढ बुवा. थांबला आहेस काय असा ? स्वगत भाषण बोलतो आहेस का काय ! (किसन 'हे कोण' म्हणून खुणेनें विचारतो. नारायण त्याच्यावर डोळे वटारतो. ) बोलत कां नाहींस.

**नारायण**—तसं कांहीं नाहीं. चहाच संपला आहे घरांतला.

**सुंदरराव**—संपला ? मग जा त्या नाक्यावरच्या दुकानांतून पवणा कप घेऊन ये.

**किसन**—नारायण, ए नारायण, ए रिंगमास्टर कोणरे हा ?

**नारायण**—( त्याचा कान धरून व चिडून ) तुझा बाप.

**किसन**—माझ्या बापाचं कालच वर्षश्राद्ध झालं ना ?

**नारायण**—म्हणून आज तो तुला भेटायला आला आहे. मूर्खा आपल्या साहेबांचे चिरंजीव हे.

**किसन**—मग इतके दिवस कुठं होतेरे हे ?

**नारायण**—होते मसणांत. अरे साहेबांनीं त्यांना घरांतून हाकलून दिलं आहे.

**किसन**—( अधिक उत्सुकतेनं) आतां काय करतात रे हे ?

**नारायण**—हजामती. अरे प्रश्नसमंधा चूप बैस आतां. नाहीं तर टाळकं तासून घेईन यांच्याकडून तुझं.

**सुंदरराव**—फुसफुसत आहे कोण ? अं, नारायण तूं अजून इथंच ? तुला चहा आणायला--

**नारायण**—पण साहेब काय म्हणतील ?

**सुंदरराव**—साहेब काय म्हणतील ? अन् मला काय विचारतोस. मी कोण आहे ठाऊक नाहीं तुला ? मी इथला प्रिन्स ऑफ वेल्स आहे, प्रिन्स ऑफ वेल्स. चल आण चहा. ( नारायण जाऊं लागतो. ) इकडे ये. थोडी खारीं बिस्किटं अन् अर्धा प्लेट भजी आण. नाहीं तर आणशील नुसता चहा आंतडीं शेकायला. हो एक पासिंग-शोच पॅकेट-नाहीं-टिनच आण-नी पट्टी-सुका कात-मसाला विसरूं नकोस. ( नारायण हात जोडून तोंड वांकडे करून जातो. ) कायरे पोऱ्या कसलीरे एवढी झाडझूड चालली आहे आज ?

**किसन**—त्या सरलाताई का कोण, त्या येणार आहेत आज.

**सुंदरराव**—(दचकून) असं! बरं, अरे जरा पाय दाब, बघतोस काय? ( किसन तसें करतो ) शाबास कुठही दोन पैसे मिळवशील. हं, केव्हां येणाररे सरलाताई ?

**किसन**—थांबा हं विचारून येतो.

**सुंदरराव**--हं, हं, इकडे ये. चाललास कुठं असा चेंडूसारखा. तो नारायण आला कीं नाहीं बघ. ( नारायण येतो.) उगवलास एकदाचा ? मला वाटलं तूंच तिथं अगोदर चांगला चमन्ना उडवतोस कीं, काय ? काय काय आणलंस ? भजी, ठेव. चहा, सिगरेट; काय पांचच आणल्या ? अरे तुला टिन आणायला सांगितलं होतं ना ? मला तू मवाली समजतोस कीं काय ? भर या केसमध्यें सगळ्या. अन् पट्टी विसरलास ? अरे पट्टीशिवाय मजा नाहीं बाबा, मजा नाहीं.

**नारायण**--तो पट्टीवाला उधार देईना !

**सुंदरराव**—मग तू कां नाहीं फेकलीस दिडकी त्याच्या तोंडावर ?

**नारायण**--दिडकी नव्हती माझ्याजवळ.

**सुंदरराव**--दिडकी नव्हती ? लाज नाहीं वाटत कां बोलायला ? तूं काय नोकरी करतोस कीं हजामती ! शुंभ, चल दूर हो. ए पोऱ्या, ते सामान इकडं आणून ठेव.

**नारायण**— साहेब, साहेब, ते टेबल खराब करूं नकां उगीच. इथं बसा आणि कृपा करून लवकर आटपा.

**सुंदरराव**--तूं कोण मला सांगणार रे ? अन् काय म्हणून ? हं आज सरला येणार आहे नाहीं का ? सांग तिला माझं नांव. खूष होईल ती.

**नारायण**--( स्वगत ) देवा, इथून यांना लवकर जाण्याची बुद्धी दे !

**सुंदरराव**--हें काय ? सरस्वतीची तसबीर ? स्त्रीजात आहे ? असूं दे. हे कोण रविंद्रनाथ. कवी, म्हणजे सेंटीमेंट. खरोखर या कवीमंडळानं आमच्या तरुणवर्गावर उपकारच करून ठेवले आहेत. हं– (फेंकून देतो.)

**नारायण**--कृपाकरून अशी फेकाफेक करूं नका. सरलादेवीचं पुस्तक

**सुंदरराव**--अरे चल, टीचभर पोर नी म्हणे देवी. म्हणे फेकाफेक करूं नका. मी कोण आहे ठाऊक नाहीं ? मीं इथला, या घरांतला प्रिन्स ऑफ वेल्स आहे समजलास.

**किसन**--( स्वगत ) पायांतलीं काढून टिकावून देतो या प्रिन्सऑफ-वेल्सला. ( जोराने टेलिफोन होतो. नारायण फोनवर जातो. )

**नारायण**--कोण, कोण पाहिजे ? काकासाहेब ? स्नान करताहेत. झालंच असेल. बर, पाठवतो. ( आंत घाईनें जाऊं लागतो तोंच काका-

साहेब एका अस्तनींत हात घातला असून बाकीचा कोट तसाच लोंबतो आहे व दुसऱ्या हातानं उपरणं सावरींत असतां सगळांच गोंधळ झालेला आहे असे येतात.)

**काका०**--काय रे, कुणाचा टेलिफोन होता ? अरे ती माझी पगडी आण लवकर. दहा झालेच कीं. कुणाचा टेलिफोन ?

**नारायण**-- साहेब ? (उपरण व कोट यांचा अधिकच गोंधळ होतो.)

**काका०**-- साहेब काय ? पगडी घे तिकडची. गाडी आणली नसशीलच. नारायण कसारे तूं ? ( पुन्हां टेलिफोन होतो ) ( टेलीफोन घेत.) कोण आहे ? होय मीच काकासाहेब. हा पहा निघालोच होतो; काय ? बोट एकतास आगोदर आली ? सरला--हो. उतरली ? घरीं यायला निघते आहे. हो, हो, थँक् यू. बर-बर. नारायण, अरे पगडी काठी; काठी पगडी. ( असें म्हणत असतां सुंदरराव दिसतो. सर्व जागच्या जागीं उभे असतात. ) ( स्वगत ) काय ? पत्राचा अपशकून अखेर प्रत्यक्ष दत्त म्हणून उभा ? ( सुंदरराव चहाचे घोट घेतो. व तोंड पुसून ढेकर देतो. नारायण खालीं मान घालून उभा राहतो. किसन खुर्चीवर जोरजोरानं ब्रश मारतो. काकासाहेब सुंदररावांकडून नारायणाकडे व तसेच उलट बघतात व शेवटीं श्वास सोडतात. ) नारायण ?-

**नारायण**--आपला हुकूम मी पाळीत होतो. पण-

**काका०**--चूप, उचल तें सामान ( नारायण सामान घेऊन जातो. ) किसन, हें टेबल साफ कर आगोदर नीट ( किसन तसं करतो. ) कायरे किशा, हें टेबल कुणी उसकटलं ?

**किसन**--( एकदम ) या प्रिन्स ऑफवेल्सनी साहेब.

**काका०**--चल तूही काळं कर, जा इथून, ( किसन जातो, काकासाहेब सुंदररावाकडून चेहेरा दुसरीकडे फिरवितात. )

**सुंदरराव**--तुम्ही आतां मलाही जायला सांगणार असाल ? ( काकासाहेब त्याच्याकडे पाहातात. ) पण आपल्याशीं थोडं बोलायचं आहे. तें ऐकून घ्या आधीं--

**काका०**--चूप बैस दिवट्या. तुझ्यासारख्या मनुष्याशीं बोलण्याची माझी इच्छा नाहीं.

**सुंदरराव**--बाबा, इतक्या दिवसांनीं मी इथं आलों. आज आई असती तर—

**काका०**--आई असती, बिचारी पुण्यवान् म्हणून गेली. तिच्यावर देवाची कृपा म्हणून तुझे हे खेळ पाहण्यापूर्वी त्या माऊलीनं डोळे मिटले. म्हणे आई असती !

**सुंदरराव**—पण तिनं मला असं घरांतून बाहेर घालवलं नसतं खास !

**काका०**—कदाचित् नसतं. पण जवळ केलं असतं तें सर्वांनीं त्याज्य ठरवलेला म्हणून–कींव येऊन–अभिमानानं नव्हे.

**सुंदरराव**--कसं का असेना ? मला माझ्या म्हणण्याप्रमाणं तुम्ही घरांत घेत नाहीं तर इस्टेटीची फारकत करून द्या.

**काका०**—इस्टेटीची फारकत ? ठीक आहे. जा आजपासून आठ दिवसांनीं माझ्या सॉलिसिटरना भेट. आणि काय तुझा हिस्सा असेल तो घेऊन जा. इथं एक क्षणभर आतां थांबू एकोस. चल नीघ.

**सुंदरराव**—क्षणभर थांबू नकोस ? हं ती येणार आहे म्हणून नीघ. मला एकट्याला तेवढं असं कस्पटाप्रमाणं वागवतां नी–सरला—

**काका०**--एक शब्द न उच्चारतां बाहेर हो आधी. एक क्षणभर न थांबतां काळ कर.

**सुंदरराव**--ठीक आहे. मीच तेवढा वाईट ! मला अपमान समजतो. माझाच तेवढा काळा चेहरा ? ठीक आहे. पाहून घेईन. ( पाय आपटीत जातो. )

**काका०**--सरलेला याच्यामुळं झालेल्या अन्यायाचं परिमार्जन करून तिला यापुढं जर सुखी करायचं असेल तर याच्याशीं मला असंच निष्ठूर व्हायला पाहिजे. नारायण, नारायण ( नारायण येतो) टेलीफोन ऐकलास ना तूं ? सरला यायला निघाली आहे. येईल आतां. तयारी आहे ना सगळी पहा.

**नारायण**--होय साहेब. ( जातो. )

**काका०**--( खालीं बसत ) बिचारी सरला. किती अल्लड ? किती अज्ञान ? ( इतक्यांत सरला येते आणि व्हरांड्याच्या पायऱ्यावरून चट्‌चट् उड्या मारून काका, काका, असं हाका मारीत काकासाहेबांच्या गळ्यांत

पडते. ते तिला एकदम पोटाशीं धरतात) अहाहा, परमेश्वरा, तुमचं निर्व्याज वात्सल्य तें हेंच ना? मग मला तें असंच अखंड पिऊं द्या. बाळे, बाळे,

**सरला०**--काका, आई, मला इथंच असं पडून हे आनंदाश्रु ढाळूं द्या.

**काका०**-( स्वगत ) पडूं दे, देवा, हें अश्रुरूपी अमृत असंच पडूं दे. म्हणजे त्या योगानं माझ्या करपलेल्या अंतःकरणाला थंडोसा मिळेल.

**सरला०**--( उठून. ) काका, काका, तुम्ही कशी हो माझी निराशा केलीत ? तुम्ही बंदरावर दिसला नाहींत, तेव्हां काय पण मी घाबरले होते.

**काका०**--बाळ, बोट आज अनपेक्षीत एक तास अगोदर बंदराला लागली एका मित्रानं आतांच मला टेलीफोननं कळवलं. हा पहा मी निघालोंच होतों यायला.

**सरला०**--पण तुम्ही बंदरावर असतां तर किती किती तरी मजा आली असती.

**काका०**--ती ग कशी !

**सरला०**--बोट सरासरी मैलदीड मैल दूर राहिली असेल. जो तो अगदीं उतरण्याच्या तयारीत होता. अन् दुर्बिणींतून कुणी आईबापाला, कुणी बहिणीला, कुणी भावाला तर कुणी बायकोला एकसारखा हुडकीत होता. अन् मी काय करीत होते काका !

**काका०**--काय करीत होतीस !

**सरला०**--मी ! मी लाल पगडी नी काळा कोट सारखा शोधीत होते. ( काकासाहेब तिच्या गालावर हळूच चापट मारतात ) पण खरी मजा पुढेंच आहे. मी सत्यपालांना म्हटलं, ते माझ्याजवळच होते, मी त्यांना म्हटलं थांबा अं मी तुम्हांला माझी आई दाखवते. मला आई नाहीं हे त्यांना ठाऊक होतं म्हणून त्यांना सारखं आश्चर्य वाटत होतं. तुम्ही दिसे-पर्यंत दादच द्यायची नाहीं, आणि तुम्ही दिसल्या बरोबर आई म्हणून तुम्हांला दाखवायचं असं मी ठरवलं होतं. काका, आई, तुम्ही माझ्या आई आहात ना ! तुम्हीच माझ्या खऱ्या आई अहात. ( त्यांच्या खांद्यावर मान टाकते ते तिला थोपटतात. )

**काका०**--सरले जशी होतीस तशीच आहेस. वेडे तुझ्या आईच्या- माझ्या ताईच्या मागं तुझा सांभाळ करणं माझं कर्तव्यच नाहीं का ! बाळ,

मी सुद्धां बघ तूं विलायतेला गेलीस त्यावेळच्या हा पोषाख घालून बंदरावर तुला घ्यायला येणार होतो. पण-

सरला०--पण काय ? काका, तुम्ही आलां नाहींत नी मग सत्यपालांनीं मला किती किती चिडवलं. " नो अंकल नो मदर " " नो अंकल नो मदर " असं सारखं म्हणत सुटले. मी रडकुंडीला आले. पण ते कसले निष्ठूर, म्हणतात कसे तुझ्या काकांपेक्षां माझंच तुझ्यावर अधिक प्रेम आहे. मग मला रडूं आवरेना. काका तुम्ही माझे ना ? अगदीं, अगदीं माझेना ?

काका०--हो बरं, पण, पण अगदीं रडेपर्यंत तुला चिडवलं ना ?

सरला०--छे, छे ! माझे डोळे पाण्यानं अगदीं भरून आले होते. इतक्यांत ते माझ्यासमोर येऊन माझ्याकडे पाहूं लागले. तेव्हां काय झालं असेल सांगा पाहूं काका ?

काका०--दुसरं काय व्हायचं आहे, खूप रडली असशील झालं !

सरला०--अहं, माझी नजर त्यांच्या डोळ्याकडे गेली, तो त्यांचेही डोळे पाण्याने भरून आलेले दिसले ! अन् काका, अगदीं त्याच-त्याच पाण्यांत मला तुमचं प्रतिबिंब दिसलं. तीरासारखे माझे अश्रू परतून कंठांत अडकले. अन् अगदीं सहज मी त्यांच्या खांद्याला बिलगून राहिले ! मी लाजले नाहीं. कुणा, कुणाला भ्याले नाहीं, कारण ठाऊक आहे ?

काका०—तूंच सांग आतां कारण.

सरला०--कारण त्यांच्यांत, अगदीं त्यांच्यांत काका मला तुम्ही भेटलांत. त्यांनीं मग मला मुकाट्यानं टॅक्सींत बसवलं. मी रुमाल हलवला नी मोटार चालूं झाली.

काका०--( तिच्या डोळ्याकडे बोट दाखवून ) मग मात्र या तलावाचा बांध फुटून पाणी धो धो वाहूं लागलं असेल नाहीं !

सरला०—( मान वर करून ) कसं कसं ओळखलंत काका !

काका०--खरं खरं ना पण !

सरला०--जा गडे ( दूर होते. )

काका०--( तिचा हात धरून ) अल्लड पोरी, तुम्ही बायका, त्यांतून तुझ्यासारखी भावनामूर्ती. मग ग काय होणार आहे दुसरं ! अन् त्यांतून तिथं तुझे सत्यपाल. मग काय पाहिजे !

सरला०—काका, काका ?

काका०--सरले तूं मात्र माझ्याशीं खोटं बोललीस अं ?

सरला०—मी ?

काका०—होय तूं तूं. मी पूर्वी होतो तसाच आतांही तुझाच आहे. पण तूं ? सांग, सांग ( स्वर बदलून ) अरेच्या सत्यपाल कुठं आहेत ? विचारायचं विसरलोंच कीं, त्यांना नाहीं कां या म्हटलंस आपल्या घरीं ?

सरला०—( उसन्या रागानें ) काका, काका डोन्ट टीज मी.

काका०—तसं नव्हे ग, मी म्हणत होतो कीं—

सरला०—( त्यांच्या तोंडावर हात ठेऊन ) प्लीज, प्लीज डोन्ट.

काका०—बरं राहिलं झालं. पण खरंच सत्यपाल कुठं आहेत ? ते कां बरं आले नाहींत ? त्यांना ॲडव्होकेट जनरल नेमलं आहे नाहीं का सरकारनी ? खरंच मोठा हुशार नी कर्तबगार ?

सरला०—अन् स्वभाव तरी किती प्रेमळ, गोड नी हौशी. पण तसें मोठें करारीसुद्धां आहेत हो.

काका०—ते सगळं तुला माहीत.

सरला०—कसं बोलता हो तुम्ही काका ?

काका०—अग त्यांत काय आहे ? पत्रांतून अलिकडे नकळत जें तूं बोलत--

सरला०—आतां ऽ--( कोंचावर तोंड फिरवून बसते )

काका०—वा, वा हे काय बरं असं रुसावं ! सत्यपालांचे वडील रामचंद्रराव हायकोर्ट जज्ज झाले, तेव्हांपासून मी बापलेकांना पाहतो आहे. सत्यपालांच्या लहानपणच्या किती तरी मौजेच्या गोष्टी सांगता येतील. एकदां एका उर्मट सोल्जरानं ट्रॅममध्यें एका कुणबिणीचा अपमान केला. किती तरी लठ्ठभारती तिथं होते पण एक जागचा हालला असेल तर शपथ. चवदापंधरा वर्षांचा हा चिमुरडा सरळ गेला आणि त्या सोल्जराच्या तोंडांत सणसणीत दिल्या. थोडी मारामारी झाली, प्रकरण कोर्टांतही गेलं. चीफ जस्टीसचा हा मुलगा म्हणून केवढं सेन्सेशन झालं ! त्या वेळीं खुद्द गव्हर्नरांनीं त्याची पाठ थोपटली म्हणतात. हा मुलगा पुढं चांगलं नांव

काढील असं त्याच वेळीं मला वाटलं होतं. खरंच हुशार तितकाच निगर्वी भावनाप्रधान तितकाच महाधीराचा नी धीट.

**सरला०**—काका, काका कसे हो अहात तुम्ही? घटकेंत रडवतां नी घटकेंत हंसवतां.

**काका०**—मी वृथा स्तुती करीत नाहीं. पण मुलगा बापाची कीर्ति उज्ज्वल ठेवणार खास. रामचंद्रराव एक नमुनेदार जज्ज होऊन गेले. सत्या-करतां त्यांची नेहमीं धडपड. त्यांचे कांहीं स्नेही गमतीनं त्यांना सत्यप्रतिज्ञ म्हणत असत.

**सरला**—अन् हे सुद्धां म्हणजे वडिलांचीच प्रतिमा—

**काका०**—हे, हे कोण?

**सरला०**—ऐकाना काका! सत्यप्रतिज्ञ—इंग्लंडमध्यें याच गुणामुळें त्यांनीं नांव मिळविलं. हिंदुस्थानांतल्या एक दोन खटल्यांत तिथं त्यांनीं चांगलंच यश मिळवलं; व त्यामुळें स्टेट सेक्रेटरींची तर त्यांच्यावर इतकी मर्जी बसली कीं, इतर सर्व वशिल्यांना मागं सारून, काका, त्यांनीं यांचीच नेमणूक केली. वडील गेल्यानंतर इकडे येण्याचा त्यांचा विचार नव्हता पण—

**काका०**—पण काय? तूं चला म्हटलंस नी ते आले असंचना?

**सरला०**—अं, हे हो काय असं!

**काका०**—बरं राहिलं झालं. सत्यपाल कां बरें आले नाहींत अद्याप. लगेज काढून यायला इतका वेळ?

**सरला०**—खरंच इतका कां बरं उशीर? बघते तरी. (व्हरांड्यांत जाऊन दूरवर बघत उभी राहते.)

**काका०**—माझ्या अंदाजाप्रमाणं देशांतराचा हिच्या मनस्थितीवर इष्ट परिणाम झालेला दिसतो. विलायतेंत हिला सत्यपालासारख्यांचा सहवास घडला ही घटना ईश्वरी इच्छेमुळेंच झाली असेल कां! जोडा किती सुंदर आहे! पण—ईश्वरी घटना असेल म्हणावं, तर बिचाऱ्या सरलेचं जीवन विषमय करणारा हा माझा पापी कार्टा, कुठं काळं केलं होतं तो नेमका याच वेळीं इथं येऊन उभा राहावा! अरेरे, इतकं सुंदर पुष्प निर्माण

झाल्यावर त्याचं जीवित मात्र दुर्दैवाच्या वादळांत सांपडलेलं पाहून मन कसं भांबावून गेल्यासारखं झालं आहे. काय करावं सुचत नाहीं.

**सरला०**—छे, नाहींच दिसत अद्याप, अजून काय करताहेत ?

**काका०**--सरले, बाळ, ये अशी, येतील बरं आतां. ( सरला येते ). सरले, अग हें तुझं परमपूज्य दैवत ? या सरस्वतीदेवीच्या पाया नाहीं पडलींस ती अजून ?

**सरला०**--( तसबिरीस वंदन करून ) खरंच कशी पण विसरले हो मी काका.

**काका०**--अग तूं आतां विलायतेला जाऊन आलीस ना ?

**सरला०**--नाहीं बरं; तिथंसुद्धां दररोज सकाळीं प्रथम या पवित्र चरणांना वंदन केल्याशिवाय मी कधींच दुसरं कांहीं केलं नाहीं.

**काका०**--अरे वा ! शहाणीच आहे माझी बाळ. अन् मला नमस्कार राहिला तो ग ?

**सरला०**--तुम्हाला ? हजार वेळां (नमस्कार करते व चोहोकडे पहात). खरंच मी गेले त्या वेळेसारखं अगदीं दिसतं. हें श्रीलक्ष्मीनारायणाचं सुंदर मंदीर, ती मलबारहिल, माझं आवडतं टेबल, माझे रविबाबू, अन् काका, हे माझ्या देवीचें पवित्र चरण. कसंहो सगळं दिसतं हे ?

**काका०**--सरले, आपल्या लाडक्या बहिणीला त्या मैनेला विसरलीस ? ती बघ मान वर करकरून कशी बघते आहे तुझ्याकडे.

**सरला**--( धांवत जाऊन खिडकींत उभी राहते व पिंजरा हातीं घेऊन ) काका, बघा, बघा कशी पंख फडफडून नाचते आहे ती. लबाड ! ( पिंजऱ्याचे मुके घेते ). पुरे, पुरे, खाऊं ?

**काका०**--पुरे, बाळ पुरे; तुझ्या मुक्यांनीं ती गुदमरून जाईल बरं. पुरे, ये पाहूं इथं माझ्याजवळ. ( कोचावर येऊन बसतात ).

**सरला०**--( पाणी घेऊन पिंजऱ्यातल्या वाटींत ओतींत ) आतां चूप बसायचं अं. मग चॉकोलेट देईन अं माझ्या छबकडीला. ( खालीं उतरते पुन्हां एकदम ) खरच हो कसं दिसतं आहे सगळं ? जसं कांहीं मीच ठेवलं आहे.

काका०––बाळ तूं गेल्यापासून हे सगळं असंच ठेवण्याचा मी रोज काळजीपूर्वक प्रयत्न करीत असे बरं.

सरला०––खरं ? काका. काका,–( जवळ जाऊन खालीं बसते व त्यांच्या गुढघ्यावर डोकं ठेवीत ) काका, आय् ॲम् अ सिली गर्ल, रिअली आय ॲम. ( काकासाहेब तिच्या मस्तकावरून हात फिरवितात इतक्यांत हातांत पोर्ट मॅन्टो घेतलेले सत्यपाल येतात. वरील दृश्य पाहून दर्वाज्यांतच आश्चर्यानं थबकतात.)

सत्यपाल––(स्व.) ओ ? व्हॉट अ ब्यूटीफुल पिक्चर ? आणि यांत मी व्यत्यय ? अं, आणायचाच आहे केव्हां तरी–नो, आय ॲम गेटींग जेलस. (उ.) मे आय कम् इन् ?

सरला०—ओ, हे पहा आले. मी म्हणत नव्हते आतां येतील म्हणून ते हेंच.

काका०––( सत्यपालांचा हात धरून ) या, वेल कम् होम. हेंच ना ते सरले ?

सरला०––( सरोष लाजून ) काका—

सत्यपाल––( स्वगत ) आरेच्चा, सरला अगोदरच बोलल्यासारखी दिसते. हेंही ठीकच झालं. ( उघड ) काकासाहेब, फारसा पूर्वपरिचय नसतां, मी इथं येण्याचं धाडस केलं कीं काय असं मला वाटत होतं. पण –

काका०––आतां नाहीं ना तसं वाटत ?

सत्यपाल—छे, छे, आपल्या या गोड व मनमोकळ्या स्वागताबद्दल मी खरोखर कृतज्ञ आहे.

काका०—हेंही घर आपलं असं मानल्यावर कृतज्ञ असण्याचं कारणच नाहीं.

सत्यपाल—कृतज्ञ येवढ्याच करतां कीं, वडिलांच्या मृत्यूनंतर माझं इथलं सर्वस्व नाहींसं झालं होतं. पण आपण तर अगदीं वडीलांसारखा आपलेपणा दाखवित अहां.

काका०––यांत मी विशेष तें काय केलं ?

सत्यपाल––काकासाहेब, जरा मोकळेपणानं बोलतो याची क्षमा करा.

ज्याला मातृसुख म्हणून काय तें आठवत नाहीं, पित्याला समाधान देणं ज्याच्या आतां नशिबी नाहीं अशा पोरक्या पोराला आपल्या मायभूमीला परत आल्यावर काय वाटत असेल, याची कल्पना करा. होम, रियल होम दॅट इज माय हार्टस् क्रेव्हिंग. आपण अगदीं सहज वेलकम् होम असे शब्द उच्चारलेत. पण त्यानीं एकदम माझ्या हृदयाचा ठाव घेतला. त्याची तृष्णा शांत होण्याची आशा दृढ केली.

काका०--आपले उद्गार आपल्यां प्रेमळ स्वभावाची व थोर हृदयाची साक्ष देत आहेत. त्यांतून परक्या देशांत माझ्या सरलेचं जे आपण आपलेपणानं रक्षण केलंत तें विसरून जाण्याइतका मी कृतघ्न नाहीं.

सत्यपाल--याही बाबतींत मीच कृतज्ञ असायला पाहिजे. काकासाहेब, परक्या देशांत या पोरक्या जीवाला आपल्या मातृभूमीची तीव्र जाणीव जर कोणी करून दिली असेल, तर ती या आपल्या लाडक्या भाचीनं. फार काय सांगू ? अनेक प्रकारच्या मोहापासून नकळत माझं संरक्षण करून मला जन्मोजन्मींची ओळख हिनं पटवून दिली.

काका०--सरले ? खरं कां ग हे ?

सरला०--काका ते थोर आहेत.

सत्यपाल--मी वृथा स्तुती करतो आहे असं नव्हे. मला जे आणि जसं वाटतं ते किती अंतःकरणपूर्वक आहे, याची सत्यता आपणा सर्वांना पटवून देण्याचा एकच मार्ग आहे. जिनं मला अशी जन्मोजन्मीची ओळख पटवून दिली तीच-तीच एक माझी गृहसौख्याची भूक शांत करण्यास समर्थ आहे. काकासाहेब, उतावळेपणा करतो त्याबद्दल क्षमा करा. ही माझ्या हृदयाची भूक शांत करणं केवळ आपल्या आशीर्वादावर अवलंबून आहे. ( काकासाहेबांच्या पायाजवळ नम्र होतात. सरला आश्चर्यानं पहाते व नंतर गंभीर होते. )

काका०--(स्व.) परमेश्वरा, येणार कां घडून असं ? (उ.) उठा, सत्यपाल माझा म्हाताऱ्याचा आशिर्वाद तुम्हाला कसा मिळणार नाहीं? सरले-(सरला अगदीं स्तब्ध उभी राहते.) असं काय ? काय झालं तुला ? अशी स्तब्ध कां ? ( स्वगत ) हं अस्सं !

सत्यपाल—आली का मूड ? अहो काकासाहेब, तिकडे मी पहात



**सत्यपाल**—आली का मूड ?

(पान १६)

असेना, नेहमीं आपलं फिलॉसफीचं एखादं पुस्तक हातांत. भावनामय मन» केव्हां मध्येंच अशी मग्न होईल याचा नियम नसतो. हिचं नावच मी 'लिटल् फिलॉसफर ' ठेवलं आहे. कधीं कधीं आम्हांला ही फिलॉसफीचे डोसेसही देत असते.

काका॰––( तिच्या जवळ जाऊन ) सरले काय म्हणतात हे ? असंच कां हें ?

सत्यपाल––अं, तिच्या या मूड्सची आपल्याला आतां संवय झाली आहे.

काका॰––सरलेनं मग आपल्याला––

सत्यपाल––तसं नव्हे, काकासाहेब, आपल्या परवानगीशिवाय कोणतीही गोष्ट करणार नाहीं, अशी तिची अट आहे.

काका॰––( तिच्या जवळ जाऊन) शहाणीच आहे माझी पोर तशी. अरे हो, बोलण्याच्या नादांत यांना किती उगीच तिष्ठत ठेवलं आहे. जा बरं, माडीवर यांच्याकरतां खोली तयार करून ठेवली आहे, ती नीट झाली आहे कीं नाहीं पाहून ये पाहूं. ( सरला जाते. काकासाहेब व सत्यपाल तिच्याकडे बघतात. )

काका॰––सत्यपाल तिच्या वियोगाचा प्रश्न जवळ आला कीं अंतःकरणाला वेदना होऊं लागतात. सत्यपाल, खरोखर एका शब्दांत सांगायचं म्हणजे हे माझ्या हृदयाचं फूल आहे.

सत्यपाल—आपल्या इतक्यांच जबाबदारीनं मी तें सांभाळणार नाहीं असं तर आपल्याला वाटत नाहीं नां ?

काका॰––सत्यपाल, मी उघड बोलतो म्हणून तुमच्याविषयीं माझ्या मनांत विपरीत आहे असं समजूं नका. तुमच्या वडीलांना मी ओळखत होतो. तुम्ही मला मुलाप्रमाणं अहा–

सत्यपाल—त्याबद्दल मी आपला फार ऋणी आहे.

काका॰––परंतु तुमची ही तारुण्याची उसळी आहे कीं काय, याची प्रथम खात्री करून घ्या. सत्यपाल तुम्ही पाहिलतच कीं माझी सरला किती अल्लड आहे. अल्लडपणांत तिच्या हातून पूर्वी चुका झाल्या असतील

पुढही होतील. त्या सर्वांना पोटांत घालून, तिच्यावर सतत मायेची शाल पांघरण्याइतकं तुमचं प्रेम गाढ आणि निस्वार्थी आहे अशी तुमची खात्री असल्याशिवाय तिला तुमच्या पदरांत टाकण्याच धाडस माझ्याच्यानं एकदम कसं बरं करवेल ? म्हणून म्हणतो–

**सत्यपाल**––नाहीं, काकासाहेब, माझ्या अंतःकरणाचा पुरेपूर ठाव घेतल्याशिवाय मी बोललों नाहीं.

**काका०**––तसं नव्हे. मनुष्याची परिस्थिती कांहीं कारणामुळं कधीं कधीं––

**सत्यपाल**––काकासाहेब, कोणत्याही कठीण परिस्थितींत मी सरलेला सुखी ठेवणार नाहीं असा का आपल्याला संशय येतो ? तसं जर असेल तर तिच्याविषयींच माझं प्रेम खरं प्रेमच नव्हे. अशा हीन प्रेमाचा उच्चार करण्याइतका मी–

**काका०**––थांबा असं बोलूं नका. सत्यपाल कसं सांगूं ? काय, सांगूं ?

**सत्यपाल**––कांहीं सांगूं नका. सरला मिळत नसेल तर माझ्याच्यानं कांहींही ऐकवणार नाहीं. काकासाहेब, सरला मला किती–किती पाहिजे ते मी आपल्याला कसं पटवूं ?

**काका०**––माझी सरला कुणाला वेड लावणार नाहीं ? तिला अमक्या गोष्टींत क्षणभर बरं वाटेल, असं मला समजलं तर ती गोष्ट कितीही क्षुल्लक असे ना पण ती तिला मिळेपर्यंत माझा जीव खालवर होतो. अन् मी आपल्याला दोष देऊं ? पण काय करूं ?––

**सत्यपाल**––कांहीं हरकत नाहीं. सरला माझी होऊं नये असं आपल्याला खास वाटत नाहीं. बस, मला पुरे आहे.

**काका०**––होय पण––( इतक्यांत "काका खोली तयार आहे. नारायणला मी सामान लावायला सांगितलं आहे" असं म्हणत सरला खालीं येते ) बरं––( काकासाहेब दुसरीकडे बघत कोट काढतात. सत्यपाल तिचा हात धरतात. )

**सत्यपाल**––थँक गॉड. आतां तूं माझी–माझीच झालीस. ( सरलेच्या डोळ्यांत अश्रू येतात. )

सरला०--(दीर्घश्वास सोडीत) पण काकांच्या जवळ आगोदर सगळं-सगळं बोलणं झालं का ?

सत्यपाल--त्याशिवाय का हाकानं हा हात धरला ? (सरला काकासाहेबांच्या खांद्यावर मान टाकते. काकासाहेब तिचे डोळे पुसतात ).

सरला०--काका कसेहो अहांत ?

काका०--उगी बाळ, असं रडावं कां बरं ?

सत्यपाल--अं, वूमन इज सिली.

सरला--अँड मॅन इज वुइकेड. काका द्या द्याहो तुमचे कपडे मी घेऊन जाते आंत ( कपडे उचलते )

काका०--राहूं दे. त्यांना माडीवर घेऊन जा आधी. त्याना त्यांची खोली दाखीव.

सरला०--नो, ही मस्ट वेट नाऊ.

सत्यपाल--जन्मभर नाहीं ना वाट पाहायला लावणार ? ( सरला त्यांना वेडावते ) बरं. पाहिजे कशाला तुझी ऐट. मीच काढतो खोली शोधून. ( तिच्यापुढें जिना चढून जातात.)

सरला०--( मागे धांवत जात ) असं काय ? राग आला कां ? आले ना ? आले ना पण मी ? ( सरला जाते. काकासाहेब ती दोघे जातात तिकडे कांहीं वेळ पहात रहातात. नंतर एक दीर्घ श्वास सोडतात व विचारमग्न असें खुर्चीवर बसतात ).

**अंक पहिला समाप्त**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

( **स्थळः**—ह्यूजेस रोडवरच्या काकासाहेब पंडितांचे बंगल्याच्या बाजूचा वऱ्हांडा. त्याच्या बाजूस बागेचा एक भाग आहे. बागेच्या एका कोपऱ्यांत एक लहानसे फाटक आहे. वेळ सायंकाळ. आकाशांत चंद्र वर आला आहे. मोठ्या झाडांच्या विरल पानांमधून चंद्रप्रकाश बागेमध्यें पसरला आहे. रस्त्यावरचा मोटारींचा दुरून मधूनच ऐकूं येणारा आवाज सोडून दिला तर चोहोंकडे शांत आहे. किसन बागेंतल्या मोकळ्या जागेवर पाणी शिंपडीत असून नारायण तिथें बसण्याकरतां खुर्च्या आणीत आहे. )

**नारायण**--पुरे, पुरे पाणी. किश्या तुला कोणतीही गोष्ट प्रमाणांत म्हणून करतां येत नाहीं. नुसतं थोडंसं पाणी शिंपडायला तुला सांगितलं तर तुझा हा आवेश तानसा-तलाव इथं ओतण्याचा !

**किसन**—धुळ चांगली दबेल ना यानं ?

**नारायण**—शहाणाच आहेस, अरे, धुळीचे लोट उठायला हें काय वऱ्हाड का आहे ?

**किसन**—वऱ्हाड ? कुठलं वऱ्हाड ? आपल्या सरलाताईचं लग्न तर जुनी गोष्ट झाली आतां. आणखी कुणाचं लग्न झालं वऱ्हाड यायला ?

**नारायण**—मूर्खा, वऱ्हाड हा देश आहे. तिथं म्हणे पाण्याच्या तलावांतून धुळीचे पर्वत निघाले आहेत आतां.

**किसन**—तलावांतून धुळीचे पर्वत ! अजब चीज आहे ! मग ताईसाहेबांना सांगनारे पहायला पाठवायला आपल्याला.

**नारायण**—हं, झालं तुझं बोलणं सुरू. चल नीघ, तें लहान टेबल आण इथं मधें ठेवायला. आटप, मला घरांत काम आहे. (किसन टेबल आणतो) हे रे काय ? हा पाय कसा खिळखिळा झाला या टेबलाचा ?

**किसन**—हात् तिच्या, मी बसलों नव्हतों का मघां त्याच्यावर गमतीनं. ( नारायण त्याचा कान धरतो ) आई, आई हें असं काय ?

**नारायण**—कांहीं नाहीं उगीच गमतीनं. म्हणे गमतीनं बसलों होतों. गाढवा उद्यां गमतीनं सगळं फर्निचर चुराडा करून टाकशील. सरलाताईंचं तें आवडतं टेबल; त्या काय म्हणतील कांहीं विचार ?

**किसन**—( कान चोळीत चिडून ) विचार ! मी मात्र त्यांना विचारणार आहे.

**नारायण**—( पुन्हां कान धरून ) त्यांना ? आणि तूं विचारणार ?

**किसन**—हो हो.

**नारायण**—काय अक्कल सुचली आहे विचारायला ?

**किसन**—कांहीं नाहीं, या घरांतल्या मालक त्या कीं—

**नारायण**—मी ? हं म्हण. अरे उर्मटा ( पुन्हा कान धरायला जातो. किसन चटकन उडी मारून दूर होतो. )

**किसन**—ए रिंगमास्टर, माझा असा छळ करूं नकोस. ताईसाहेब म्हणतात खरं बोललं म्हणजे माणूस सुखी होतं. टेबल मीं मोडलं म्हणून खरं सांगितलं तर माझ्या कानाला तूं हें असं सुख देतो आहेस. येऊं दे ताईसाहेबांना म्हणजे सांगतों.

**नारायण**—( हंसून ) अरे त्या काय करणार आहेत रे !

**किसन**—अरे त्या आपल्या साहेबांप्रमाणें आहेत. खरं बोलावं म्हणून मला सांगतात नेहमीं. खरं बोलल्याबद्दल तूं मला मारलंस. त्यांना सांगणार कीं खरं बोलल्याबद्दल सुख मिळत नाहीं म्हणून कबूल तरी करा, नाहींतर या रिंगमास्टरचे कान धरा. त्या साहेबाप्रमाणं आहेत. तुझेच कान उपटले जातील !

**नारायण**—साहेबाप्रमाणं आहेत ? पण त्या विलायतेहून आल्या तेव्हां दोन मालक होतील, म्हणून तूंच बोंब मारली होतीस ना ?

**किसन**—अरे तें झालं त्या वेळचं. तूं म्हणालास त्याप्रमाणं ताईसाहेब म्हणजे खरोखर देवता आहेत देवता !

**नारायण**—खरं का ? उघले का डोळे ? ( किसन जवळ येतो व अधिरतेनं. )

**किसन**—का रे, तुला एक गोष्ट विचारूं का ?

**नारायण**—तूं नी एकच गोष्ट विचारणार ? शपथ घे आधीं कीं एकच विचारीन म्हणून.

**किसन**—ए असं काय करतोस ? विचारूं दे कीं.

**नारायण**—बरं विचार.

**किसन**—काय रे देवता रडतात का रे ?

**नारायण**--( स्वगत ) या पोराच्या सुद्धां नजरेस आलं हें ! खरंच असं काय बरं होत असेल ताईसाहेबांना ? सत्यपालासारखा उमदा नवरा मिळाला–आतां तरी त्या सुखी व्हायला पाहिजेत. धाकटे साहेब इथं आलेत–ते तर त्यांच्या नजरेस पडले नाहींत ना ?

**किसन**—बोलत कां नाहींस? तूं सुद्धां असा रडवा चेहरा कां केलास? अरे राजा, बोल ना एकदां–माझा जीव गुदमरायला लागला आहे.

**नारायण**--आले पुन्हां तुझे प्रश्न ?

**किसन**—अरे आपल्या ताईसाहेबांना रडतांना पाहिलं म्हणून विचारतों.

**नारायण**--ताईसाहेबांना ? कधीं पाहिलंस रडतांना ?

**किसन**—( हळूच ) दहापांच वेळां. खिडकीच्या भिंगांतून पाहिलं. आपलं पुस्तक समोर नी डोळ्यांत पाणी !

**नारायण**—( त्याचा कान धरून ) किश्या, भिंगातून पाहिलंस ? गध्या तुझी ही फाजील चौकसबुद्धि जाणार तरी कधीं ? पुन्हा करशील असं ?

**किसन**—नाहीं करायचा. पण ताईसाहेबांना रडलेलं पाहावेना रे.

**नारायण**—पहाशील पुन्हा ?

**किसन**—नाहीं–नाहीं–सोड. माझ्या कानावर कां तुझी इतकी मर्जी आज ?

**नारायण**—याद राख, पुन्हा असं केलंस तर. मी जातों घरांत. माझी काम पडलीं आहेत तिकडे. हें टेबल नीट ठेव अन् मग माडीवरचीं अंथरुणं बघ. ( नारायण जाऊं लागतो. त्याला किसन एकदम हाका मारतो. )

**किसन**—मला आपलं वाटलं कीं—

**नारायण**—अरे प्रश्नसमंधा, तुझे सासरे येतील आतां बाहेरून. आटप इथलं काम नी जा माडीवर.

**किसन**—पुष्कळ उशीर आहे त्यांना यायला आज. आधीं फिरायला जाणार, नंतर कोर्टांतल्या समारंभाला; तेव्हां वेळ लागेल यायला असं ताई-साहेब मला सांगून गेल्या.

**नारायण**—तें मला माहीत आहे. तूं आटप—मी आंत गेलों कीं, बसशील रस्त्यावरच्या माणसांनाच प्रश्न विचारीत. प्रश्नसमंध उगीच नाहीं म्हणत मी, चल आटप. (जातो.)

**किसन**—(मोठ्यानं) ए बाबा, मार मला पाहिजे तर पण समंध म्हणूं नकोस.

---

## प्रवेश २ रा.

( **स्थळ**—चर्नीरोड गार्डन्चा एक भाग. सुंदरराव व तात्या-दलाल प्रवेश करतात. )

**सुंदरराव**—च–चल आणखी मारूं दोन पेले. च--चल.

**तात्या**—अरे पण आतां पैसे पाहिजेत ना ? फुकट देईल का कुणी बाटली ?

**सुंदरराव**—तूं–दे–दे. दोस्त म्हण–वतोस–माझा–दो–दोस्त–आण–पैसे.

**तात्या**—आज त्या घोड्यावर लावूं नकोस पैसे म्हटलं तर ऐकलं नाहींस. परवांही असंच केलंस. अन् असा सारखा बुडतो आहेस–आपल्या-जवळ नाहींत पैसे.

**सुंदरराव**—दोस्त–म्हणवतोस. दे पैसे–दोन लि–लिहून घेतल्यास त–तशी आणखी एक प्रॉमिसरी लिहून घे प–पाहिजे तर. पण आणखी दारू–

**तात्या**—( स्वगत ) त्या दोन प्रॉमिसरी पडल्या आहेत धूळ खात माझ्या पेटींत. इस्टेटीची फारकत करून घेतलीस बापाजवळून, आणि उधळलीस; हं कोण तुला पैसे देईल.

**सुंदरराव**—तात्या-दोस्त दे पैसे—दारू—

**तात्या**—माझ्याजवळ एक कवडी नाहीं.

**सुंदरराव**—ख-खोटं-तात्या खोटं-दलालींत वकी-लांच्याकडून रोज इ-इतके रु-रुपये मिळवतोस. खोटं ब-बोलतोस. ख-ख-खोटं.

**तात्या**—याला आतां चढत चालली. आतां इथून निसटलं पाहिजे.

**सुंदरराव**—( त्याला धरून ) काढ पैसे-तात्या-का-ढ.

**तात्या**—( स्वगत ) आतां काय करावं-हं, बरं आठवलं-( उघड ) हें पहा सुंदर, मला जायचं आहे लवकर हायकोर्टांत त्या सत्यपालांचा सन्मान पाहायला. बॅ. त्रिमकचंदांनीं मला आग्रहानं बोलावलं आहे. गेलं पाहिजे.

**सुंदरराव**—क-कोण बदमाष सत्यपाल--बदमाष-( त्याला अधिक धरतो. )

**तात्या**—( स्वतःला सोडवीत असतां स्वगत ) आतां काय करावं-अं ह्याची बायको-हो सुशिलाच इकडे येत आहे. द्यावा तिच्या अंगावर सोडून ( उघड ) सुंदर तुला पैसे पाहिजेत ना ? ती पहा तुझी बायको सुशिला येत आहे. असतील तिच्याजवळ पैसे. ( एकदम जातो. )

**सुंदरराव**—म-माझी बायको सु-सुशिला, हं ठीक-आली. बरोबर तो कार्टा-संभाळायला घेतला आहे-सु-सुधाकर. तो-सुध्या-क-कोण कुणाचा ?--पैसे मिळवते, सगळे त्याच्यासाठीं खर्च करते.--आणि म-मला नाहीं-देत-येऊं दे आतां. झडप घालतो प-पैश्यावर--येऊं दे. ( बाजूस होतो. सुशिला एका ढकलगाडींत सुधाकराला घेऊन येते. समोर दिसणाऱ्या मनोहर सूर्यास्ताकडे पाहून भक्तिपूर्ण अंतःकरणानं नमस्कार करते. )

**सुशिला**—देवा नारायणा, त्या आदिशक्तिनं घालून दिलेल्या क्रमापासून केंसभरही न ढळतां, सुखदुःख, निंदास्तुति यांची पर्वा न करितां, सतत बारा तास तळपून आपण जगताला मार्गदर्शक होतां, म्हणूनच या वेळीं इतके रम्य, इतके तेजस्वी आणि इतके वंदनीय आहांत. नारायणा, आपलं तेज आणि आपली शक्ति माझ्यासारख्या दुबळ्या जिवाला थोडी तरी दयाळू अंतःकरणानं द्या इतकीच आपल्याला शरण येऊन माझी



**सुंदरराव**—तो—तोच पैसे देऊं देत नाहीं. (पा. २६)

प्रार्थना आहे. ही शक्ति आणि हें तेज जर माझ्यांत नसलं तर या असल्या पतीविषयींचं कर्तव्य माझ्या हातून कसं पार पडेल? आणि या अनाथ बाळाचं ( सुधाकराला उचलून घेऊन ) श्रमून ग्लानि आलेल्या हृदयाला जर हें विसाव्याचं स्थान नसतं तर या पूर्वींच, नारायणा, आपल्या पवित्र चरणाजवळ मी धांवून आलें असतें. बाळा सुधाकरा, तूं जसा या जगांत एकटा तशी मी-मी ( सुंदरराव झिंगत येतो. )

**सुंदरराव**--ए, ए या-संध्याकाळच्या वे-वेळेला बरी इथं भेटलीस.

**सुशिला**—काय ही स्थिति? या दारूच्या धुंदींत.

**सुंदरराव**--कोण दारू पितो? को-कोण द-दारू पितो?

**सुशिला**—नका, नका हो असं करूं. घराबाहेर, चारचौघांत ही आपली स्थिति मला बघवत नाहीं हो. ( मुलाला गाडींत ठेवतें व त्याचा हात धरून ) चला, घरीं चला. तीन दिवस पत्ता नाहीं; पोटांत अन्न असेल कीं नाहीं!--

**सुंदरराव**—च-चल दूर हो-म-मी-द-दारू पितों. मग-क-काढ पैसे-काढ. ना-नाहीं काढत? क-काढ. ( हाताला पुन्हा जोरानं धरतो. )

**सुशिला**—नका, नका हो असं करूं. या शरीराच्या हलानं मी थकलेंच पण माझं हृदयदी आतां खरोखरंच थकलं. नका म्हणते ना असं करूं. घरीं चला—

**सुंदरराव**—मी—द-दारू पितों-लाज न-नाहीं वाटत. काढ प-पैसे हं-हा कारटा सुध्या, तुला माझ्यापेक्षां ज-जास्त झ-झाला. त्याचे लाड क-करतेस. तो—तो कोणाचा कोण? आणि म-मी? मी?

**सुशिला**—आपण? आपण कोण तें कसं सांगूं? मला संधि द्या म्हणजे आपण कोण तें पटवितां येईल. ( त्याच्या खांद्याजवळ जाऊन. ) नका,नका हो असं बोलूं? आपण माझे ना?

**सुंदरराव**—मग—प-पैसे काढ. काढ, न-नाहीं (तिला दूर करून) य-या सुध्याकरितां ठ-ठेवायचं अ-आहेत? य-याला पाहिलं कीं, म-माझा संताप—सं-संताप ( तिला दूर लोटून सुधाकराकडे टवकारून बघतो. सुशिला सुधाकरासमोर उभी राहते. ) याला प-पाहिलं कीं, सं-संताप.

**सुशिला**—नका हो त्या पोरक्या पोराकडे असं बघूं.मला भीति वाटते. नका बघूं ना माझ्या सुधाकडे असं.

**सुंदरराव**—त–तोच पैसे देऊं देत नाहीं.

**सुशिला**—( संतापून ) कां त्या गरीब जिवावर एवढा संताप.त्याच्याच जिवावर ना आज दोन घांस खायला मिळताहेत ?

**सुंदरराव**—( सुंदरराव तिच्या डोक्यावर मारतो ) चूप—त्या–त्याचा कड घेतेस ( सुशिला बेशुद्ध पडते. सुंदरराव तिच्या खिशांतून पैशाचें लहान पाकीट घेतो. त्यांतील रुपये वाजवीत व सुधाकराकडे पहात ) माझे प–पैसे घेतोस ? याद र–राख चि–चिरडून टाकीन. मी द–दारू पितों. सरला आली आहे. तिच्या मागं जा–जाईन–पिच्छा पुर–वीन ति–तिचा ( जातो. दुसऱ्या बाजूनं काकासाहेब व सत्यपाल येतात. )

**काकासाहेब**--काय नादी पोर आहे ? समारंभाला जायची तर वेळ होत आली. जातां जातां सनूसेट् पाहून जाऊं म्हणाली म्हणून इकडे आलों. आणि अजुनि बघतेच आहे म्हणतां ?

**सत्यपाल**—विलायतेंत सुद्धां सनूराइज् आणि सनूसेट् पहायचं हिचं वेड हें असंच. मी किती चल म्हटलं तरी बघतेच आहे.

**काकासाहेब**—अन् इथं सुद्धां याच जागेवरून नेहमीं पहाते. काय विशेष सौंदर्य या जागेवरून हिला दिसतं कुणास ठाऊक ? सरले, चल आतां. भारी नादी बुवा.

**सत्यपाल**—नादी आणि मूडी ! – आतां आणल्याशिवाय कुठली यायला.

**काकासाहेब०**—येईल ती. कशाला जातां ?

**सत्यपाल०**--छे, आणल्याशिवाय कांहीं यायची नाहीं. ( जातात. )

**काकासाहेब०**--नादी आणि मूडी ! लग्न झाल्यावर हिची ही वृत्ति कमी व्हायची पण पहातों आहे, उलट ती थोडी फार वाढल्यासारखीच दिसते. आतां कां वर ही असं करते ? सत्यपालांच्या वागणुकींत हिला कांही फरक ?–छे हिचं रहस्य त्यांना मीं पत्रानं कळवलं आणि नंतरच त्यांनीं लग्न केलं नाहीं का ? हळवं, पापभिरु मन–तसं कोणतंच कारण आतां नसतांना कदाचित् गतगोष्टींचा उगीच मनांत कीस काढत असेल !

आपल्या बंगल्यांत रहायला जाण्याचा सत्यपालांचा सारखा आग्रह चालला आहे. मायेमुळं मला तिची ताटातूट–पण एकाअर्थी तेही ठीक होईल–नकोतच जुन्या घरांतल्या आठवणी तिला आतां.

**सरला**०–काका, कसं छान दिसतं आहे हें दृश्य. जरा थांबाना.

**काका**०–आम्ही नाहीं आतां थांबत–सत्यपाल,आणा हो तुम्ही आपलें तिला ( सरला व सत्यपाल येतात. )

**सरला**––काका, काका, कसा सुंदर दिसतो हो इथून सूर्यास्ताचा देखावा ! मन मोहून जातं, हृदय भरून येतं ! किती वाटतं कीं डोळ्यांतील अश्रू ओंजळीत घेऊन भगवान् सूर्यनारायणाचे पवित्र चरण धुवून काढावेत. डोळे मागे परततच नाहींत.

**काका**०––भगवान् सूर्यनारायणाचे चरण धुवून काढावेसे वाटतात ? तरुण मुली लग्न झाल्याबरोबर देवाला अजिबात विसरतात म्हणे ? तुझं लग्न होऊन महिना पंधराही दिवस झाले नाहींत, तों इतक्यांत तुला देव सुचूं लागला !

**सत्यपाल**––आणि तोही किती पण ? इतरांना मत्सर वाटेल इतका.

**सरला**––लग्न झालं तरी बायकांनीं देवाला विसरून कसं चालेल ? ( गंभीर होते ).

**सत्यपाल**—आली का पुन्हां मूड ? भावनामूर्ति म्हणून सर्व म्हणतात तें उगीच नाहीं. ( इतक्यांत सुशिलेचं विवळणं ऐकूं येतं. सर्व ऐकूं लागतात ).

**काका**०––कुणाचा आवाज ?

**सरला**—काका, काका, तें पहा तिथं कुणी तरी पडलं आहे. ( धावत जाऊन पहात ) कुणी तरी बिचारी बाई बेशुद्ध पडली आहे.

**काका**०––( स्वगत ) कोण ? सुशिला ?–( मुलाला पाहून ) अन् सरला इथं ? शिव, शिव, शिव. परमेश्वरा, येऊं नये तो प्रसंग. ( सरला सुशिलेला घेते.)

**सत्यपाल**––काय झालं बिचारीला ?

**काका**०—कांहीं नाहीं–बेशुद्ध पडली आहे. सत्यपाल, जवळ कुठं पाणी असेल तर हा रुमाल भिजवून आणा पाहूं ? ( सत्यपाल जातात.)

बाई–बाई उठा–( सुशिला चळवळ करते, डोळे उघडते व एकदम थोडी उठून.)

**सुशिला**—बाळ, बाळ कुठं आहे ?

**सरला**--बाळ, कुठं आहे बाळ ? हं, ते पहा–काका धराहो ह्यांना. मी मुलाला बघते. ( मुलाला घेऊन ) तुमचं बाळ खुशाल आहे बरं बाई. ( सुशिला उठत काकासाहेबांच्याकडे बघते. काकासाहेब तिला खुणेनं चूप करतात. सरला सुधाकराला हृदयाशीं धरते तोंच.) देवा, असं काय होतंय मला ! देवा, देवा–( सुशिला उठून सरलेच्या हातून मुलाला हिसकावून घेते व त्याला गाडींत घालून झपाट्यानं जाते.)

**काका॰**—अहो बाई, थांबा, थांबा.

**सरला**—काका, आई–( काकासाहेबांच्या खांद्यावर मान टाकते.)

**काका॰**--उगी बाळ. हें काय हें असं भलत्या ठिकाणीं रडावं बरं ?

**सरला**--अगं, आईगं; काका, कसं होतंय हो मला ?

**काका॰**—उगी, काय होतं ?

**सरला**—इथं, इथं पोटांत कसं तरी आतड्याला तोडल्यासारखं होतंय.

**काका॰**—चूप. उगी बाळ. त्या आठवणी आतां काढूं नकोस.

**सरला**—काका ! माझा बाळ खरोखरच गेला कांहो या जगांतून ?

**काका॰**—हें काय बरं बाळ भलतंच विचारावं ? तसं तूं विलायतेंत असतांनाच नव्हतं का मी तुला कळवलं ? ( स्वगत ) तसं कळवलं तेंच बरं झालं म्हणायचं.

**सरला**—( रडत ) मग या मुलाला घेतल्यावर मला असं काय बरं होतंय हें ?

**काका॰**—( स्वगत ) अरे, अरे, सुधाकर जिवंत असतांना–प्रत्यक्ष आपल्या आईच्या हृदयाजवळ असतांना, तिथून त्याला ओढलेला पहाण्याचा–तो मेला असं त्याच्या जन्मदात्या आईजवळ खोटं सांगण्याचा कठोर प्रसंग माझ्यावरच यावा काय ! कसं अगदीं जवळ घेतलन् होतं सुधाकराला हिनं ? पापपुण्याच्या, बऱ्यावाईटाच्या सर्व रूढ कल्पना जर कुठं तुच्छ ठरत असतील तर त्या एका मातृप्रेमापुढंच.

**सरला॰**--काका—

**काका०**—सरले सांगितलं ना, आतां कशाला बरं त्या आठवणी ? सरले, आतां तुझं लग्न झालं आहे ना बरं बाळ.? सत्यपालांना सुखी करण्याकरतां मागल्या बऱ्यावाईट सर्व–सर्व गोष्टी तूं आतां विसरायला नकोत कां बरं ?

**सरला०**—त्यांनीं माझ्याशीं लग्न केलं––खरंच, ते थोर आहेत; अन् मी—?

**काका०**—चूप, पुन्हां असं बोलूं नकोस. तुझ्या अज्ञानामुळं, तुझ्या अल्लडपणाचा फायदा घेतला गेल्यामुळं घडलेल्या गोष्टींपायीं तुला जबाबदार ठरवणं म्हणजे निर्दयपणा आहे.

**सरला०**—नाहीं, काका, ते देव आहेत. पण मी–?

**काका०**—छे, छे, सोडून दे हे विचार. सत्यपालांना तुझ्या वागण्यामुळं दुःख नसेल का होत ? ते पहा सत्यपाल आले. ( सत्यपाल येतात ) ती बाई वेडीच असावी. शुद्धीवर आली नी मुलाला घेऊन आपली पळतच गेली.

**सत्यपाल**––पण हें काय ? हिला काय झालं ?

**काका०**––हिच्या जवळून मुलाला ओढून नेलं ना ? लगेच आपले हिचे डोळे रडायला लागले. तुम्ही इथंच थांबा. त्या बाईची नी मुलाची नीट व्यवस्था लागली कीं नाहीं तें पाहून येतो चटकन.

**सत्यपाल**—आपण कशाला ? मीच जाऊन बघतों.

**काका०**––छे, छे–तुम्ही हिच्याजवळ असा. ( जातात )

**सत्यपाल**––(प्रेमानं सरलेचा हात धरून) अगं, वेडी ती. तिचं काय एवढं मनाला लावून घेतेस ?

**सरला०**––कुणाला ठाऊक ? ती वेडी कां मी वेडी तें ? ( शून्य दृष्टीनें समोर बघते. )

**सत्यपाल**—दोघीही वेड्या अहांत झालं. ( सरला कांहीं न बोलतां तशीच समोर पहात रहाते. ) हें काय हें ? काय बघते आहेस तिकडे ? भारीच बुवा हळवं झालं आहे तुझं मन ? चूप. आपल्याला आतां हायकोर्टांत लवकर गेलं पाहिजे. ते बघ काकासाहेबही आले. ( काकासाहेब येतात ) कोण होती ती बाई ?

**काका०**—कोणास ठाऊक. कोणी का असेना? बिचारी गरीब दिसली. भ्याली होती.

**सरला०**--( एकदम ) मुलाला नीट घेतलन् ना तिनं? नाहीं तर-

**सत्यपाल**--( हंसून ) नाहीं तर काय? वेडीच आहेस? आणि नीट व्यवस्था लागलेली बघितल्याशिवाय कां काकासाहेब येतील परत?

**काका०**--तिची नीट व्यवस्था लागलेली बघितली म्हणून तर मी परतलों. चला लवकर, उशीर होईल हायकोर्टांत जायला. ( सत्यपाल-सरला जातात. त्यांच्या मागं जातांना) देवाच्या दयेनं आजचा प्रसंग कसा बसा निभावला. पण यापुढं मात्र सुधाकराला इथंच ठेवणं धोक्याचं होईल. न जाणो पुन्हा अशीच कधीं भेट झाली तर? ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

( **स्थळ**:-पहिल्या प्रवेशांतील. )

**किसन**-काय करावं बुवा आतांशा कसं मला कोंडल्यासारखं झालंय इथं. तो नाऱ्या, कांहीं बिचारा, अंगावर येतो. ताईसाहेब प्रथम दोन चार दिवस बोलत होत्या, पण आतांशा पहावं तर स्वतःशींच बोलत असतात. कसं गुदमरल्यासारखं झालं आहे. सगळं काम आटपलं म्हणून त्या नाऱ्याजवळ दोन गोष्टी करायला गेलों तो त्यानं मला कसं बाहेर पिटाळंन्. कोणी तरी बोलायला मिळेल तर काय बहार-( मागें चाहूल येते ) अं, सासरा आला काय माझा! ( सुंदरराव झिंगलेल्या स्थितींत येतो. ) अरे वा, हे तर प्रिन्स ऑफ वेल्स. ठीक आहे यालाच विचारूं दोन प्रश्न. पण तो नाऱ्या नाहींना जवळ? कसं काय प्रिन्स ऑफ वेल्स? फार दिवसांनीं आलांत? पाय दाबून देऊं कां त्या दिवसासारखे? दिडक्या द्याना; पावणा कप आणतो.

**सुंदरराव**-( त्याच्याजवळ जात ) बर-झ-झालं इथं स-सापडलीस. अ अशी जवळ य ये माझ्या )

**किसन**-अरेच्या? हत्तीसारखे झुलता काय? अहो मी किसन आहे.

**सुंदरराव**—( त्याच्या गळ्यांत हात टाकून ) अशी य ये जवळ म माझ्या. तू माझी सरला आहेस, स सरला माझी म माझीच--

**किसन**--( स्वतःला सोडवीत ) सरला माझी ? सरला कोण ? अहो सरलाताई बाहेर गेल्या आहेत. [illegible] म्हणतांना. मी कोण आहे ठाऊक–

**सुंदरराव**—( त्याच्या गळ्यांत हात टाकतो ) तू–तू ठाऊक आहे. म मला. तू तू माझी स सरला. तू ककां त्याच्याशीं लग्न केलं. ककां लग्न ककेलं ?

**किसन**–हे काय ? अहो साहेब, माझं लग्न व्हायचं आहे अजून. पण हे काय चालवलं आहेत तुम्ही ?

**सुंदरराव**—ख खोटं झालं तुझं ललग्न त्याच्याशीं, ततो बदमाष तुझा न नवरा नाहीं. म मी तुझा खरा न नवरा. त तो कोण तुझा ? म मीच तुझा खरा न-नवरा–हो मीच. म-मीच तुझा खरा नवरा अ-आहे. ये जवळ. ( किसनला घट्ट अलिंगन देतो )

**किसन**—( स्वतःला सोडावीत संतापानें ) अरे बापरे, ए नाऱ्या ए रिंगमास्टरा. माझा कान धरतोस पण हा तुझा बाप माझ्या छातीवर बसतो आहे ना. अरे, अरे आतां काय !--अहो मी किसन--( चवताळून ) अरे आतां टाळकं फोडूं का तुझं. ए नाऱ्या तूं येत नाहींस तर माझे सासरे म्हणालास ते तरी कुठं आहेत ?

**सुंदरराव**—( रुपये काढून वाजवीत ) आण–सुशिला रुपये देत न–नाहीं–सु सुधाकराकरतां ठ ठेवते–आण रुपये द-दारु पाजतो त्याला.

**किसन**—गमती गमतीनं तुम्ही डोक्यावर बसत चालला–दारु जास्त झाली काय ?

**सुंदरराव**—तूं–दारू–तुझा बाप दारू–

**किसन**--( हिसकाहिसकी करून ) अरे माहात्म्या मला काय वाटेल तें म्हण, पण माझ्या बापाला दारू म्हणतोस ? आतां मात्र–

**सुंदरराव**--तुझा बाप द-दारू. अ-आण त्या सत्यपालाला अ आण त्याला ठ-ठार करतो–तुझ्याशीं लग्न करतो. आण ठार क-करतो त्याला पण आधी स-सुधाकराला–ठार–सुधाकराला ठ-ठार–(किसनला मारतो )

**किसन**--( त्याला उलट मारीत ) ए नाऱ्या-चुलखंडांत मेलास का? नाऱ्या-नाऱ्या ( नारायण धावत येतो )

**नारायण**--किश्या संध्याकाळच्या वेळेस ओरडतो आहेस काय सारखा ? ( दोघांना पाहून थबकतो ) कोण ? धाकटे साहेब ! ( दोघांना सोडवतो ).

**सुंदरराव**--हा हा आला सुधाकर-मारतो त्याला य-याला म मारतो मारतो याला-( नारायणाच्या अंगावर जातो ).

**नारायण**—साहेब माफ करा-एकदां मीं आपलं ऐकलं. अन् या स्थितींत तर मी मुळींच राहूं देणार नाहीं इथं. चला जा. नाहीं जात ? किश्या धर त्या दुसऱ्या हाताला. चल लवकर-हं चला बाहेर(धरून नेतात).

**सुंदरराव**—( जातांना ) तूं तूं कोण मला बाहेर घालवणार—मी येईन, येईन पुन्हा. ( त्याला घेऊन जातात. )

**नारायण**—( परत येतांना ) त्या फाटकाची सांखळी लावलीस कीं नाहीं नीट ?

**किसन**—होय.

**नारायण**—( किसनचा कान धरून ) पण गध्या, असं ओरडण्यापूर्वी मला कां नाहीं एकदम बोलवायला आलास. यांना घरांत येऊं द्यायचं नाहीं म्हणून साहेबांचा सक्त हुकूम—कां नाहीं आलास ? बोल.

**किसन**—सांगतों, सांगतों. कान सोड. हें पहा मी आपलं खरंच सांगतों मग वाटलं तर खुशाल कान धर. ( नारायण कान सोडतो ) असं झालं कीं—

**नारायण**—चल सांग चटकन खरं—घोटाळतोस कां—

**किसन**—सागतों, सांगतों असं झालं—ते आले नी माझ्या स्वभावा-प्रमाणं प्रश्न विचारावेसे वाटले त्यांना.

**नारायण**—प्रश्न विचारावेसं वाटले ?

**किसन**—मग क . करूं ? सबंध दिवसांत तूं एकही प्रश्न विचारूं देत नाहींस; मला मग कसं चोरट्यासारखं होत—मग विचारावेसें वाटले त्यांना दोन प्रश्न. विचारलें मात्र नी जो गोंधळ सुरूं झाला आहे म्हणतोस ? तुला हाका मारणार तो तुझ्या भीतीमुळें अवाजच निघेना प्रथम तोंडून.शेवटीं टा

मारीन असं म्हणून ते जेव्हां मला मारूं लागले तेव्हां घाबरलों नी त्यामुळं एकदम घसा साफ होऊन ओरडलों नी काय !

**नारायण**—पहा—तुझ्या या प्रश्न विचारण्याच्या संवईमुळं कसा प्रसंग आला तो ?

**किसन**—प्रसंग ? हो खरं आहे बाबा—प्रसंगच तो. मला बायको म्हणून मिठी काय मारली—छे, छे, छे, चांगली अद्दल घडली. आतां पुन्हा म्हणून प्रश्न विचारणार नाहीं.

**नारायण**—नाहीं ना ?

**किसन**—छत्, नांव नको अगदीं. (एकदम) काय रे ! या धाकट्या साहेबांना घरांतून कां घालविलं रे ?

**नारायण**—पुन्हा प्रश्न, पुन्हा प्रश्न ? (किसन आई म्हणून लांब जीभ काढतो.) उगीच नाहीं तुला प्रश्नसमंध म्हणत मी. आतां बऱ्या बोलानं कबूल कर प्रश्न विचारणार नाहीं म्हणून. नाहीं तर तुझं अलिंगन नी सगळं सांगतों मंडळींना.

**किसन**—(साष्टांग नमस्कार घालून) नको, नको माझे आई. (कान उपटून आणि हात जोडून) देवा, तुझी शपथ घेऊन सांगतों कीं, प्राण गेला तरी आतां मी प्रश्न म्हणून कोणाला विचारणार नाहीं—झालं.

**नारायण**—अस्सं.

**किसन**—पण झाला प्रकार आतां नाहीं ना कोणाजवळ बोलायचा ?

**नारायण**—(हंसून) बरं, नाहीं बोलायचा जा. तें पहा, सर्व मंडळी आलीच वाटतं ?

**किसन**—अरे बापरे, खरंच आली. चल बाबा आंत. माझ्याच्यानं नाहीं ताईसाहेबांच्याकड वर तोंड करून बघवणार. चल लवकर (जातात) (सरला, सत्यपाल व काकासाहेब प्रवेश करतात.)

**सत्यपाल**—या हारांचं ओझं उतरलं पाहिजे आतां; किती पण हे हार ? (सरलेकडे पहात रहातात.)

**काका०**—हार घालायच्या वेळचं बॅ. त्रिमकचंदांचं तें ढोंगीपणाचं भाषण ऐकून तर मला इतकं हंसायला आलं ! काय तुमची स्तुति ? उगीच

नाहीं केलीन्. तुमच्या जागेकरितां याही स्वारींची खटपट होती. निराशा लपवायची असली म्हणजे मत्सरी आणि ढोंगी मनुष्य दुसरं काय करणार ?

**सत्यपाल**—कांहीं का असेना आपण आपल्या ब्रीदाला न सोडलं म्हणजे झालं. सरले, फार थकल्यासारखी दिसतेस. जा बर, पडून रहा बरं.

**सरला०**—नको बाई घरांत, इथंच बसते. ( सत्यपाल तिला बसण्याकरतां इझीचेअर नीट ठेवण्यास जातात. )

**काका०**—( स्वगत ) पतीच्या आयुष्यांतला एवढा महत्त्वाचा आणि सन्मानाचा प्रसंग पण ही त्यावेळीं सुद्धां खिन्न ? विषय बदलण्याकरतां मी नाना गोष्टी काढूं लागलों पण-सत्यपाल सुद्धां येतांना थोडेसे विचारमग्न होते—या दोघांचं भावी आयुष्य ?-हरकत नाहीं. सत्यपालासारख्या मनुष्यावर माझी श्रद्धा आहे. आतां प्रथम योजल्याप्रमाणं सुधाकराची व्यवस्था लावण्याच्या उद्योगालाच लागलं पाहिजे. ( उघड ) हो, सरले, तुला सांगायचं विसरलों. मला आज दिल्ली एक्स्प्रेसनं कानपुरला जायचं आहे. दोन दिवस इथली व्यवस्था आतां तुझ्याकडे. अं, सांगायला नकोच म्हणा तुला हें ?

**सरला०**--काका याच वेळीं--? असं काय काम आहे ?

**सत्यपाल**--खरंच. एकदम काय काम निघालं ?

**काका०**—आमच्या तिथल्या मिलच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरवर मी आहे. अर्जंट मिटिंग आहे. मला तार आली, गेलं पाहिजे.

**सरला०**--आज नाहीं गेलांत तर नाहीं का चालायचं काका ?

**काका०**--परवाची मिटिंग. गेलंच पाहिजे. कांहीं भानगडीचे प्रश्न आहेतसं दिसतं.

**सरला०**—पण परत केव्हा येणार ? (जवळ जाऊन) लवकर या हं !

**काका०**--लवकरच येईन बरं. का? आतां सुद्धां मी पाहिजेच कां जवळ?

**सरला०**--परमेश्वर करो नी तुम्ही मला जवळ नकोत असं कधींही न होवो.

**सत्यपाल**--ओ स्प्लेंडिड्.

**काका०**--वा ठीक. आतां दोघंही एक झाल्यावर माझा म्हाताऱ्याचा काय टिकाव लागणार आहे ? बरं—मी जातों. पॅकिंग करायचं आहे, येतो

म्हणून तारही पाठवायची आहे. आलोंच आटपून मग जेवूं एकदमच सगळीजण. ( जातात. ) (सत्यपाल सरलेकडे थोडं पाहून एक हार उचलतात व तिच्या गळ्यांत घालायला जातात. )

**सरला०**--हें काय ?

**सत्यपाल**--लोकांनीं माझा सन्मान केला. पण माझ्या जिविताचा खरा सूत्रधार तूं. तुझा नको कां सन्मान मला करायला ?

**सरला०**--हें काय भलतंच. माझी लायकी--

**सत्यपाल**--सरले !

**सरला०**--हें काय ? असे एकदम गंभीर कां बर झालांत ?

**सत्यपाल**--कांहीं नाहीं. माझ्या आयुष्यांतला आजचा महत्वाचा-आनंदाचा प्रसंग ! पण मला त्यांत उणेपणा भासला. उभ्या समारंभांत तुझं लक्ष-नव्हतं फारसं त्यांत.

**सरला०**—( एकदम दचकून ) खरंच,-(थांबून) मला वाईट वाटत. माझ्यामुळें आपल्याला दुःख--

**सत्यपाल**--मी माझ्यां दुःखाबद्दल नव्हतों विचार करीत-मी-

**सरला०**—थांबलांत कां. बोलाना ?

**सत्यपाल**—सरले माझ्यावर तुझं किती प्रेम आहे, हें मला माहीत आहे आणि म्हणूनच आजच्या प्रसंगीं तू खिन्न—तुझ्या या मूडस्—

**सरला०**—( भावनेच्या उसळीनं ) खरंच आपल्या प्रेमामुळं मी सुखी झालें होतें पण--

**सत्यपाल**--सरले-( गंभीरतेनें स्तब्ध होतात.)

**सरला०**--काय सांगणार होतात ? सांगाना ?

**सत्यपाल**--कांहीं नाहीं.

**सरला०**—असं काय बरं करतां ? मला कसं बरं मग विचारतां ?

**सत्यपाल**—कांहीं नाहीं. तूं असं कांहीं विलक्षण बोललीस पण मी काय त्याचं उत्तर देऊं ? एवढं मात्र खास कीं, तुझ्यावरील माझ्या प्रेमामुळं तुझ्या प्राप्तीची माझी भूक एकसारखी वाढतच गेली. इतकी कीं केवळ लग्नामुळंच ती शांत झाली. लग्नाच्या दिवशींच मी खरा-खरा सुखी झालों.

सरला०—खरंच लग्न करून मी आपणांस सुख देणार कीं दुःख ? ( श्वास सोडून सत्यपाल तिच्यापासून दूर उभे रहतात. भानावर येऊन सरला लगेच त्यांच्याकडे जाते ) मला काय बरं ठाऊक आपल्याला असं दिसत असेलसं ! खरंच गडे राग आला का ? अं ? ( कापऱ्या स्वरांत ) मी अगदीं वाईट आहे नाहीं ? ( खांद्यावर मान टाकते.)

सत्यपाल—( तिला थोपटून ) असं विचारूं नये भलतंच.

सरला०—आपल्याला वाईट वाटलं ना ?

सत्यपाल--काय म्हणावं तुला ! क्षणांत पहावं तर तुझं अंगन् अंग बाल्यानंदानं फुलल्यासारखं दिसतं अन् क्षणांत दगडासारखी निर्जीव होतेस.

सरला०--( त्यांच्या गळ्यावर हात फिरवीत आणि चेहऱ्याकडे बघत ) खरंच गडे दिसत असेल आपल्याला असं. नाहीं बरं मी आतां असं करायची. खरंच नाहीं ना मी असं करायची ? अं ? खरंच नाहीं ना करायची ?

सत्यपाल—( हंसून ) हे काय ? मी कसं सांगूं ?

सरला०--आपल्याशिवाय कोण बरं मला असं सांगेल? (डोळे पुसते).

सत्यपाल--चुप, चुप. खरंच नाहींस बरं असं करायचीस ( तिचा गाल आपल्या गालाशीं धरतात.)

सरला०--हं. ( थांबून ) मला एक विचारावंसं वाटतं. विचारूं ?

सत्यपाल--खुशाल विचार.

सरला०—हंसायचं नाहीं अं पण (सत्यपाल हंसतात) हें काय हंसायचं नाहीं ना ?

सत्यपाल--बरं बरं. विचार काय तें चटकन्.

सरला०—मला कधीं कधीं असं वाटतं कीं आपण मला अशीच आपल्यांत, कुठं तरी आंत, आंत लपवून ठेवावं. पहायचं झालं तरी मी आपल्याला नी आपण मला. जगाला दर्शन नको. खरंच गडे, होईल कां असं ?

सत्यपाल--सरले कसं पण बोललीस. अगदीं अशी अशीच मी तुला ठेवली आहे बघ.

सरला०--( मान वर करून उत्सुकतेनं ) खरं? मग दाखवायची मला? पाहूं दे तरी?

सत्यपाल—अशी अगदीं माझ्यासमोर उभी रहा. पहा आतां माझ्या डोळ्यांत ( एकमेकांच्या डोळ्यांत बघतात ) आहेस ना इथं? इच्छा होईल तेव्हां स्वतःला अशी बघत जा; तिथं हजर आहेस. आणि एरव्ही, ही पहा गेलीस या पेटींत. ( तिला हृदयाशीं धरतात. ती सत्यपालांच्या हृदयावर डोकं ठेवते.)

सरला०—कसं कसं बोलता तरी? बोलाना-थांबलांत कां? बोलतच रहा गडे.

सत्यपाल—आतां कसं काय वाटतं पण तुला?

सरला०—सांगूं काय वाटतं तें? इथं अशी डोकं ठेवून पडलें कीं असं कांहीं अगांत बळ सांठवतं; वाटतं सगळं जग आतां तुच्छ आहे.

सत्यपाल—मग मध्येंच अशी कष्टी कां बरं होतेस?

सरला०—खरंच, सांगूं का? ऐन आनंदांत एकाएकीं वाटूं लागतं कीं माझी पात्रता नाहीं, इतकं आणि असं परमेश्वरानं मला दिलं आहे-देतो आहे. आपण देवाप्रमाणं अहांत आणि मी कुठं तरी दूर दूर आहे असं मला वाटूं लागतं. आजच्या समारंभाचे वेळींही मला असंच वाटत होतं. हे विचार मनांत सारखे येतात आणि मग मात्र सगळा आनंद शरीरांतून बाहेर पडतो आहेसं होतं, अन्‌ माझी मलाच शुद्ध रहात नाहीं. आपल्याला दुःख देत असेन हें सुद्धां मग मला कळत नाहीं म्हणून विचारते रागवायचं नाहींना मनापासून माझ्यावर कधीं? नाहींना रागवायचं?

सत्यपाल—(स्वगत) मी देवासारखा हिला वाटतों आणि आपण स्वतः माझ्यापासून कुठं तरी दूर-दूर आहे असा हिचा चमत्कारिक समज झाला आहे! कां हिला असं वाटतं? काय कारण असेल हिच्या एकंदर वृत्तीचं?

सरला०—आपण स्तब्ध अहांत?-खरंच रागावलांत माझ्यावर.

सत्यपाल--छे, छे, तुझ्यावर कसा बरं मी रागवेन? पण आतां तरी तूं सुखी आहेस ना?

सरला०--मी? पण अतिसुखांतच परमेश्वर दुःखाचं बीज पेरून ठेवीत असतो कां?

**सत्यपाल**—तसं असलं तरी त्यांत भक्ताची कसोटी, भक्ताची उन्नति याशिवाय परमेश्वराचा दुसरा हेतु असणं शक्यच नाहीं.

**सरला०**—पण मी कुठं भक्त आहे ! होता होईल का मला भक्त ! आपल्याकडे पाहिलं, आपलं बोलणं ऐकलं, आपल्याविषयीं विचार केला कीं, मी आपला भक्त कशी नी केव्हां होईन हा ध्यास मला लग्न झाल्यापासून लागलेला आहे. म्हणून गडे माझ्या वागण्यांत आपल्याला आतांशीं परकेपणा दिसत असेल. म्हणून म्हणतें पतिदेवा, होईन कां मी आपली भक्त ! कराल मला तशी ?

**सत्यपाल**—हें काय हें ! मी कसला आलों आहें देव ? सरले, माणसाला देव मानण्याच्या या वेडगळ कल्पना सोडून दे. या कल्पनेमुळेंच तूं व मी कदाचित एकजीव होत नसूं हें कसं बर तुझ्या लक्ष्यांत येत नाहीं ?

**सरला०**—आपण मला वेडी म्हणा, खुळचट म्हणा–कांहींही म्हणा पण पतिदेवा, मला आपली भक्त करून घ्या. घ्याल ना ? सांगा ना ! अं, सांगा ना !

**सत्यपाल**—सरले तें कांहीं नाहीं. मी मनुष्यच आहें आणि तुझ्या म्हणण्याप्रमाणं देवच असलों तर तूंही माझी देवता आहेस, माझी सरलादेवी आहेस. हो तूं माझी सरला–देवीच आहेस. ( सुंदरराव मागच्या लहान फाटकांतून येतो. )

**सुंदरराव**—तूं कोण मला बाहेर घालवणार. येईन मी. हो येईन. ( सुंदररावाचा आवाज ऐकून व चेहरा पाहून )

**सरला०**—अगबाई कोण? ( किंकाळीं फोडते व बेशुद्ध होते. )

**सत्यपाल**—( तिला सावरीत ) काकासाहेब, काकासाहेब. नारायण. चल चालता हो इथून–नीघ–नारायण ( काकासाहेब व नारायण धावत येतात ) काकासाहेब. हा कोण दारू प्यालेला इसम—

**काका०**—कोण ? कोण ? नारायण, हाकल हाकल या दारुड्याला आधीं. (नारायण तसं करतो. काकासाहेब एकीकडे दीर्घश्वास सोडतात नंतर कळवळून ) देवा—!

**अंक दुसरा समाप्त.**

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

( **स्थळः**—काकासाहेबांच्या बंगल्यांतला दिवाणखाना. सुशिला प्रवेश करून )

**सुशिला**—भेटायला येतों म्हणून काकासाहेबांनीं कळवलं. पण का बरं आले नाहींत ? त्यांची भेट लवकर व्हायला पाहिजे. घरची परिस्थिति ही अशी—लवकर जर भेट झाली नाहीं तर कसं करायचं ? (काकासाहेब बाहेर जाण्याकरितां येतात.)

**काका०**—कोण ? सुशिलाबाई ?—अन् ठरल्याप्रमाणं पूर्वी कळवल्या-शिवाय कशा आलांत ?

**सुशिला**—तसचं जरुरीचं काम आहे. आपण येईन म्हणून कळवलंत पण आला नाहींत. आणखी वाट पहाणं मला धोक्याचं वाटलं म्हणून मलाच यावं लागलं.

**काका०**—हो, मी येऊं शकलों नाहीं. हें सरलेचं मधेंच अजारीपण निघालं. पण तुम्हांलाच यावं लागलं म्हणतां ? काय भानगड आहे—? सुधाकर खुशाल आहे ना ?

**सुशिला**—होय. खुशाल आहे. पण—यापुढें—

**काका०**—थांबलांत का ? सांगा.

**सुशिला**—काय करूं. सुधाकराकरितां सगळं सांगणं जरूरच आहे. त्याला यापुढें माझ्याजवळ राहूं देणं धोक्याचं आहे.

**काका०**—का बरं ? असं का म्हणतां ?

**सुशिला**—माझी स्वतःची परिस्थितिच हल्लीं इतकी वाईट झाली आहे कीं मला त्याच्याविषयीं भीति वाटते.

**काका०**—अशी परिस्थिती यायला असं एकाएकी काय झालं ?

**सुशिला**—काय सांगूं ? त्यांच्या हातूनच सुधाकराला एखादे वेळीं धोका येण्याचा संभव—

काका०—त्यांच्या हातून ? म्हणजे ? तुमच्या पतींचं व तुमचं ठीक नसल्यामुळं ते इथं नसतात असं तुम्ही मला म्हणाला होताना ?

सुशिला—हो, पण थोडे दिवस झाले आले आहेत. इतर गोष्टी आहेतच. त्यांतून पिण्याचं व्यसन. आतांशा इतकं तें वाढलं आहे कीं, त्यांचं एकंदर वागणंच त्यामुळं चमत्कारिक झालं आहे.

काका०--अरे अरे!

सुशिला—त्यांतून सुधाकराकडे तर असं कांही विलक्षण नजरेनं बघतात कीं मला खरोखर आतांशा भीतिच वाटते. मला स्वतःला इतका त्रास होतो—पण माझं स्वतःचं दुःख सोडलं तरी बिचाऱ्या सुधाकराची जबाबदारी मला फार जाणवते. म्हणून मला आपल्याकडे असं यावं लागलं. त्याची दुसरीकडे व्यवस्था—

काका०—असं आहे म्हणतां ? फार वाईट परिस्थिति आहे. तुम्हांला मीं कळवलंच होत कीं सुधाकराची मुंबई बाहेर व्यवस्था करण्याच्या मी उद्योगांत आहे म्हणून. पण एकाएकी हें सरलेचं दुखणं निघालं. थांबावं लागलं मला.

सुशिला—काय होतं आहे त्यांना ? बरं आहे ना आतां ?

काका०—हो बरं आहे. त्याचं असं झालं. थोडें दिवसांपूर्वी आम्ही बाहेरून आलों नी तिला घेरी आली एकाएकी. भारी अशक्त प्रकृति. डॉक्टरांनीं तिला वांद्याला हवेवर ठेवायला सांगितलं—आतां बरं आहे तिचं. मी सुधाकराविषयींच्या व्यवस्थेंत आहेच. तुम्ही सुद्धां तयारींतच असा जाण्याच्या--

सुशिला--मी कशी बरं येऊं शकेन ?

काका०—कां बरं ?

सुशिला--इकडची स्थिति अशी कांहीं चमत्कारीक झाली आहे कीं, सांगतां येत नाहीं-परवां मी बेशुद्ध स्थितींत आपणांला दिसलें ती-ती दारूच्या धुंदीत त्यानींच मारल्यामुळें—

काका०--असं झालं म्हणतां ? अरेरे!

सुशिला—अशा स्थितींत त्यांच्यावर एखादा प्रसंग आला, नी मी जवळ नसलें म्हणजे—( रडूं लागते )

**काका॰**—छे, छे. अशा रडूं नका, खरंच, कठीणच आहे तुमची ही स्थिति.

**सुशिला**—आपल्याला मी एकदम संकटांत घालतें आहे याचं—

**काका॰**—छे, सुधाकराला तुम्ही प्रत्यक्ष आईप्रमाणं झाल्या अहांत हें मला दिसत कां नाहीं ? तुम्हांला तशी जरूरी वाटल्याशिवाय कां तुम्ही त्याला दूर करायला तयार झाला अहांत ?

**सुशिला**—मला वाटलं कीं, आपण माझ्यावर रागवाल !

**काका॰**—असं मनांतसुद्धां आणूं नका. मी आहेच त्या उद्योगांत. पण आतां तुमच्यासारखं माणूस मिळेपर्यंत थोडा वेळ लागेल कदाचित्. तोंपर्यंत मात्र त्याला सांभाळा--

**सुशिला**—माझ्याकडून मी शक्य तें करीनच. येतें मी. त्याला शेजारीं ठेवून आलें आहे.

**काका॰**—बरं, मलाही सरलेकरितां कांहीं सामान घेऊन जायचं आहे. अरे पण हो, पैसे—विसरलोंच. आणलें पाहिजेत वरतून-( वर जाऊं लागतात ) बरं तुम्ही या आतां.

**सुशिला**—( जातांना ) मग मी आपल्या पत्राची वाट पाहतें—

**काका॰**—होय—शक्य तो लवकर मी कळवतोंच सर्व. तोंपर्यंत त्याला सांभाळा.

**सुशिला**—( सुशिला मानेनं हं म्हणते. काकासाहेब वर जातात. सुशिला बाहेर जाण्याकारितां दरवाजाजवळ येते, एकदम दचकून दाराआड होते. ) अगबाई, हे इकडे कुणीकडे ? ( आडून पाहून ) इकडेच येताहेत. इथं माझी भेट झाली तर भलत्या ठिकाणीं कदाचित् नसता प्रकार—आलेच—आतां काय करूं ? निसटून जाईन म्हटलं तर सोय नाहीं.आलेच. (घाबरून इकडे तिकडे बघते व बाजूच्या दरवाजानं खोलींत शिरते. सुंदरराव सावकाश पायऱ्या चढून आंत येतों. दरवाजांत त्याचं पाऊल पडतं तोंच काकासाहेब वरतून येतात. )

**काका॰**—कोण ? पुन्हा तूं इथं ? जा आलास तसं तोंड फिरीव.

**सुंदरराव**—आपणही फिरवलंत म्हणजे दोघेंही बसूं आंत बोलत.

**काका॰**—मला तुझ्याशीं बोलायला एक क्षणाचाही वेळ नाहीं.

**सुंदरराव**—ठीक आहे. आपण परत आल्यावर बोलूं. मी बसतों इथं सावकाश आपली वाट पहात. ( आंत येऊन सिगारेट पेटवतो व खुर्चीवर आरामानें बसतो. )

**काका०**—( उसळून ) चल चालता हो इथून. मला परत आल्यावरहीं बोलण्याची इच्छा नाहीं.

**सुंदरराव**—मग आतांच बोलून टाकूं. आहे काय त्यांत. इट्स प्युअरली अ बिझिनेस मॅटर. दहा मिनिटांशिवाय अधिक एक सेकंद घेत नाहीं मी आपला. चला मुद्दयावर येऊं या चटकन.

**काका०**—तुला केव्हांही भेटण्याची माझी इच्छा नाहीं.

**सुंदरराव**—( शांतपणें ) आपली इच्छा काय आहे याची मला सध्यां जरूर नाहीं. तूर्त माझी आपल्याला भेटण्याची इच्छा आहे. मग काय जाऊन येतां ना ? उगीच उशीर होतो आहे. ( काकासाहेब त्याच्याकडे पहात रहातात. )

**काका०**—तूं कोणासमोर आणि काय बोलतो आहेस याची कांहीं जाणीव आहे का ?

**सुंदरराव**—माझे वडील काकासाहेब यांच्याशीं मी बोलतों आहें हें मला माहीत आहे.

**काका०**—मग कांहीं मर्यादा ?

**सुंदरराव**—मीं ठेवायचा प्रयत्न केला. पण उंबरठ्यावरच आपण अपशब्दांची देवघेव सुरूं केलीत. सोळा वर्षांनंतर मुलगा बरोबरीनं वागूं लागतो बाबा !

**काका०**—तुझं डोकं ठिकाणावर आहे का ?

**सुंदरराव**—माझ्याबद्दल आपण बेफिकीर असा. आपणच आपलं डोकं शांत ठेवून थोडं माझ्याकडे लक्ष द्याल तर—

**काका०**—तुझ्याकडे ? तूं कोण माझा ? संबंध काय आतां तुझा—माझा ?

**सुंदरराव**—मी कोण ? आपला मुलगा ! आणि संबंध म्हणाल तर कधीं न तुटणारा पिता-पुत्रांचा.

**काका०**—( उसळून) कोण कुणाचा मुलगा ? इतकीं अमानुषपणाचीं

कृत्यं करून, कुळाला आणि कीर्तीला काळिमा फांसून घेतल्यावर, माझा मुलगा म्हणून घ्यायला तुला लाज कशी वाटत नाहीं? ज्या वेळेस तुला घरांतून बाहेर काढला, त्याच वेळीं तुझ्याविषयींच्या सर्व कल्पनांची, आपलेपणाची, मायेची राखरांगोळी केली आहे; समजलास.

**सुंदरराव**—बाबा, बाबा, कशाला उगीच शिरा ताणतां? माझ्याविषयींच्या तुमच्या कल्पना काय आहेत तें मला पूर्ण माहीत आहे. मायेविषयीं म्हणाल तर, आपण निर्धास्त असा, ती मिळविण्यासाठीं कांहीं आज मी इथं आलेलों नाहीं; अन् आपलेपणा! मायेचा आपलेपणा मला मुळींच नको आहे. फक्त व्यवहाराचा आपलेपणा मला पाहिजे आहे. बस् व्यवहार, बिझिनेस. बाबा, आय् ॲश्युअर यू आय् मीन् बिझिनेस ॲन्ड नथिंग बट् बिझिनेस. त्याला तुमची तयारी आहे ना?

**काका०**—मुळींच नाहीं.

**सुंदरराव**—लवकरच आपल्याला आपलं मन बदलावं लागेल.

**काका०**—मन बदलावं लागेल? चल नीघ येथून. त्या पिंटोच्या दुकानांत जाऊन बाटल्या उडीव, महालक्ष्मीवर जाऊन रेसबाजी कर, गटारांत लोळण घे, नाहीं तर मवाल्यांशीं हणामारी कर जा.

**सुंदरराव**—मी दारूबाज, रेसबाज, सर्व कांहीं बाजीसंपूर्ण आहे असंच आपलं म्हणणं ना? कबूल, अगदीं प्रामाणिकपणें कबूल. उगीच शब्दाबद्दल वाद नको. चला इस्टेटची फारकत—

**काका०**—इस्टेट! कसली इस्टेट?

**सुंदरराव**—वडिलोपार्जित इस्टेट. तिचा भाग मला पाहिजे.

**काका०**—(आश्चर्यानें) वडिलोपार्जित इस्टेटीचा भाग परवां घेऊन गेलास. आतां राहता राहिलेली माझी स्वतःची मिळवलेली इस्टेट—

**सुंदरराव**—ती! तीच मला पाहिजे.

**काका०**—ती वडलोपार्जित इस्टेट का?

**सुंदरराव**—आपण माझे वडील आहांत ना?

**काका०**—बरं मग.

**सुंदरराव**—म्हणजे वडील आहांत तर. मग वडिलांनीं मिळवलेली इस्टेट म्हणजे वाडिलोपार्जित इस्टेट नव्हे का?

**काका०**—( संतापानं ) असा शब्दच्छल-( राग आवरून ) कायद्या-प्रमाणं त्या इस्टेटीवर तुझा कांहीं एक हक्क नाहीं. वेळ आलीच म्हणून सांगतों, माझ्या वुइलमध्यें तुला मी डिस् इन्हेरिट केलं आहे समजलास. पुन्हां जर बंगल्याची पायरी चढलास तर मला गड्याकडून धक्के मारून हाकून द्यावं लागेल.

**सुंदरराव**—( संतापानं ) मी बंगल्याची पायरीही चढायची नाहीं अन् तिनं मात्र आंत घुसून आयत्या पिठावर नागोबा होऊन बसायचं ? तिनं लग्न करायचं, समारंभांत मोठ्याची बायको म्हणून मिरवायचं ? मी मात्र या घराची पायरीही चढायची नाहीं ? माझं दर्शनही होऊं नये असं मीच एकट्यानं काय केलं आहे हो ?

**काका०**—( उसळून) काय केलं आहेस ? काय करायचं बाकीं ठेवलं होतंस. माझी सरला, गरीब भाबडी पोर; काशीताईच्या मागं पोटच्या गोळ्याप्रमाणं मीं तिला सांभाळली; अन् तूं, प्रत्यक्ष माझ्या मुलानं, तिच्या अल्लड स्थितीचा अन् अज्ञानाचा फायदा घेऊन प्रत्यक्ष तिच्या अब्रूवर, कौमार्यावर घाला घातला. आणि—काय केलं म्हणे ! काय करायचं बाकी ठेवलंस ? जा, तुझा पापी चेहेरा मला पुन्हां दाखवूं नकोस जा.

**सुंदरराव**—ह्यः ह्यः एवढं अकांडतांडव कशाला करतां बुवा ? अहो, लोकांत आणि नवऱ्याजवळ तिची अब्रू अद्याप ठीक आहे ना ? बस, आणखी हो काय पाहिजे ?

**काका०**—पाजी—

**सुंदरराव**—थांबा, थांबा, रागावूं नका. इस्टेट ?—तूर्त त्याबद्दल मी बोलत नाहीं. मला सध्यां पांचशें रुपये पाहिजेत. त्या पिंटोचं जबरदस्त बिल, घराचं भाडं, महालक्ष्मी सीझनमधलं साचलेलं त्या तात्या दलालाचं देणं; कितीन् काय ? शिवाय बायकोचं घोंगडं.

**काका०**—( दचकून ) बायको ? तूं आणि लग्न केलंस ?

**सुंदरराव**—होय. माझ्या मतानं आयुष्यांत ही मी पहिलीच चूक केली. कशी झाली हें मात्र एक ब्रह्मदेवच काय तें सांगूं शकेल.

**काका०**—कोणत्या गाईचा गळा कापलास ?

**सुंदरराव**—मी कशाला कुणाचा गळा कापूं ? तिचंच माझ्यावर कायसं म्हणे प्रेम होतं. तेव्हां केलंन् लग्न, झालं.

**काका॰**—आणि तिच्या प्रेमाचा तूं आतां चुराडा करणार ?

**सुंदरराव**—प्रेम ? हयः हयः कसलं प्रेम नी कसलं काय ? प्रेम म्हणजे अट्रॅक्शन. याच्यापलीकडे या जगांत माझ्या अनुभवाला अद्याप कांहींच आलं नहीं. हें अट्रॅक्शन आहे तोंपर्यंत तुम्ही आम्ही प्रेम करतों आहेसं वाटतं, पुढचं पुढें.

**काका॰**--(आश्चर्यातिरेकानं त्याच्याकडे पाहात) (स्वगत) हा माझाच मुलगा आहे का ? देवा, देवा, मी आपला खरोखरच भयंकर अपराधी असलों पाहिजे. एरव्हीं माझ्याच रक्तांतून माझे प्राण कासावीस करण्याकरतां हें विष कशाला निघालं असतं ? ( नारायण प्रवेश करून )

**नारायण**—सरलाताईनीं लवकर वांद्याला बोलावलं आहे.

**काका॰**—( घाईनं ) हा मी निघालोंच होतों, पण मुद्दाम कां बरं हा सरलेनं निरोप पाठवला ?

**नारायण**—बॅरिस्टरसाहेबांना निकडीच्या कामासाठीं मुंबईला यायचं आहे. तेव्हां त्यांच्याजवळ कुणी तरी पाहिजे.

**काका॰**—बरं बरं-मी निघालो तिकडे ( नारायण जातो ).(स्वगत ) सरलेकडे जायला निघालों पण अनपेक्षित थराला गेलेली याची एकंदर वृत्ति पाहून स्तंभित झालों; ज्याला क्षणभर इथं उभं राहूं दिलं नसतं त्याच्याशीं वादही केला. ( उघड ) सरला एकटी असेल—

**सुंदरराव**—तेवढा पांचशेंचा चेक फाडून आपण चटकन् जाऊं शकतां तिच्याकडे.

**काका॰**—एककपर्दिकही मिळायची नाहीं. चल जा, मला लवकर सरलेकडे—

**सुंदरराव**—चला मीही बरोबरच येतों तिच्याकडे ! नाहींतरी पुष्कळ दिवसांत पोरीला भेटलों नाहीं. ( उठून काकासाहेबाबरोबर जायची तयारी करतो ).

**काका॰**—(स्वगत) ह्याच्या आजच्या वागण्यावरून हा तिथं यायलाही कमी करायचा नाहीं. प्रकृतीच्या त्या तशा नाजूक अवस्थेंत ह्याचं तिला

दर्शन–? तिच्याकरतां (घाईनं चेकबुक काढून पांचशे रुपयांचा चेक लिहितात व तो सुंदररावाच्या अंगावर फेकतात). घे हा. कांहीं का कारण असेना. या वेळेस तुला हे रुपये दिले आहेत. पुन्हां इथं पाऊल टाकलंस तर पोलीस—

**सुंदरराव**—पोलीस–अहो हे पांचशे रुपये म्हणजे नुसता इसारा आहे.

**काका०**—इसारा—?

**सुंदरराव**—होय होय, इसारा. बाबा, तुमच्या सरलेची अब्रू या सुंदररावाच्या हातांत आहे हें तुम्ही विसरलात.

**काका०**—मग चांडाळा, काय काय करणार रे तूं?

**सुंदरराव**—काय करणार? तिच्या नवऱ्याच्या कानांत एकच शब्द पुरे आहे.

**काका०**—हं अस्स! एकूण धाकदपटशा दाखवणार! ब्लॅक्‌मेलिंग करणार! मग तुला सांगून ठेवतों हें तुझं ब्लॅक्‌मेलिंग व्यर्थ आहे.

**सुंदरराव**—व्यर्थ आहे! व्यभिचारी पतीला त्याची बायको क्षमा करते. पण पतित स्त्रीला तिचा नवरा उभा चिरतो.

**काका०**—तुझे हे खेळ कुणाशीं चालले आहेत, हें तूं लक्षांत घेतलं नाहींस. सरलेचं सगळं रहस्य मी स्वतः सत्यपालांना सांगितल्यावरच त्यांनी तिचा स्वीकार केला आहे समजलास. नीट ध्यानांत ठेव.

**सुंदरराव**—खोटं–खोटं–ही तुमची निवळ दमदाटी आहे.

**काका०**—घमेंड असल्यास जा त्यांच्याकडे आणि घे खात्री करून.

**सुंदरराव**—(आश्चर्यानें थक्क होतो) असं काय?

**काका०**—आतां तावडतोब जर इथून काळं केलंस तरच ठीक. नाहींतर—

**सुंदरराव**—करतो, करतो, काळं. अशा तऱ्हेनं मला सर्व बाजूंनीं मारण्याचा—

**काका०**—आधीं बाहेर हो नी मग काय तें बोल. हो हो बाहेर—

**सुंदरराव**—होतो होतो बाहेर. माझ्याविरुद्ध कट करून सर्व बाजूंनीं मला एकट्याला तुम्ही असा मारून टाकणार काय? ठीक आहे. पाहून घेईन. मी डवचलेला सर्प आहे. बाबा, पाहून घेईन. माझा काळा चेहरा मी

नेतो येथून पण तुमचे सर्वांचे चेहेरे गोरे रहातील अशी मात्र खबरदारी घ्या. ( त्वेषानें जातो.)

**काका०**—अरे, अरे, हा माझा मुलगा-( एकदम तोंड फिरवून दोन्ही हातांत डोकें धरून मटकन् खालीं बसतात.)

**सुशिला**--( बाहेर येऊन ) अगबाई, घेरी आली वाटतं ! नारायण, नारायण—

**काका०**—नका कुणालाही हांक मारूं नका. ( शांत होऊन ) जरा मला एकाएकी घेरी आली होती म्हणून टेकलों होतों अंमळ. हें काय ! आणि तुम्ही इथंच होतात ?

**सुशिला**--मी दुर्दैवी अनाथ लेकरूं आहे हो. मला दूर लोटूं नका.

**काका०**—हें काय ! सुशिलाबाई, मी तुम्हाला कधीं तरी लागेल असं बोललों का ?

**सुशिला**—नाहीं हो नाहीं. आणि म्हणूनच आपल्यासारख्या माणसांना दुःख देण्याचं—

**काका०**—छे, छे. असं भलतं काय बोलतां. तुम्ही मला दुःख देणार ! काय असेल तें स्पष्ट बोला. झालं काय-तुम्ही इथंच कशा !

**सुशिला**—मी कोण हें जर तुम्हाला कळलं तर-( रडूं लागते ).

**काका०**—सुशिलाबाई, यांत काय बरं मी समजूं ?

**सुशिला**—आतां आपल्याकडे कोण बरं आलं होतं ?

**काका०**—कोणी नाहीं. मी जरा विश्रांति घेत बसलों होतों.

**सुशिला**—कशाला आतां लपवून ठेवतां ! या कानांनीं सर्व कांहीं ऐकलं आहे.

**काका०**—काय ! आमचं बोलणं चोरून ऐकलंत !

**सुशिला**—असा गैरसमज करून घेऊं नका. मी घरीं जायला निघालें तों ते आले. मी चटकन् त्या खोलींत शिरलें. मला आपण दोघे-ते नी आपण-मोठमोठ्यानं बोलतांना ऐकूं आलं.

**काका०**—काय तो हलकट मनुष्य तुमच्या परिचयाचा आहे ?

**सुशिला**—नकाहो असं बोलूं त्यांना. मला ऐकवत नाहींहो.

**काका०**—त्याला नको बोलूं ! अन् तुम्ही कोण मला सांगणार !

सुशिला--कसं सांगू ? ते ते--

काका०--ते ! ते कोण ?

सुशिला--आतां आपल्याकडे कोण आलं होतं ?

काका०—माझ्याकडे ? हं तो ! त्याचं नांव उच्चारण्याची देखील लाज वाटते. तो-तो माझा मुलगा.

सुशिला—आपला मुलगा पण माझे-माझे पति.

काका—(एकदम उठून) काय ! माझा मुलगा तुमचा पती ? तुमचा-! माझा मुलगा तुमचा पती !

सुशिला—होय-सरलाताईंच्या आयुष्याचा सत्यानाश करणारे-सुधाकराचे वडील माझे पति. सुधाकराचे वडील माझे पति. (त्यांच्या पायाजवळ पडते.)

काका०—(एकदम कोचावर अंग टाकून व सुशिलेच्या मस्तकावर हात ठेवून) शिव, शिव, परमेश्वरा, आई, माते-तूं कुठं आहेस !

---

## प्रवेश दुसरा.

(**स्थळः**—वांद्रें येथील सत्यपालांच्या बंगल्यासमोरील विस्तीर्ण कंपाउन्ड.
डॉ. सदाशिवराव, सत्यपाल व डॉ. गणपतराव प्रवेश करतात.)

**डॉ० सदाशिव०**--हें पहा बॅरिस्टरसाहेब आमच्या गणुकाकांनीं आणि मीं सरलाबाईची प्रकृति आज पुन्हां नीट पाहिली. हें पहा त्यांना अगदीं कोणत्याही प्रकारची लहानशी सुद्धां एक्साइट्मेंट् होता उपयोगी नाहीं.

**डॉ० गणपतराव०**--इन् इंग्लंड दे गिव्ह ॲब्सोल्यूट रेस्ट.

**डॉ० सदाशिव०**--सरलाबाईच्या प्रकृतीच्या दृष्टीनं हा तुमचा बंगला छान एका बाजूला आहे बुवा. कंपाउन्ड तरी किती मोठं आहे ! इकडे असे बंगले मिळत नाहींत.

**डॉ० गणपतराव०**—इन् इंग्लंड दे आर नॉट रेअर.

**बॅ० सत्यपाल**—(स्वगत.) काय करावं, आपण स्वतः नसलें म्हणजे



**सुंदरराव**—तिच्या नवऱ्याच्या कानांत एकच शब्द— ( पान ४६ )

असल्या मूर्ख डॉक्टरांच्यावर आम्हांला भागवून घ्यावं लागतं, हें कसं कळत नाहीं डॉ. भडकमकरासारख्यांना ?

**डॉ॰ सदाशिव॰**---बरं भडकमकरांच्या कन्सल्टेशनचं काय झालं ?

**बॅ॰ सत्यपाल॰**—त्यांना बोलावण्याकरतां तीन वेळ फोन केला. उत्तर नाहीं. शेवटीं नोट देऊन आमच्या किनसला पाठवला परवां. त्याचाही अद्याप पत्ता नाहीं.

**डॉ॰ सदाशिव॰**---अस्सं ! अजून पत्ता नाहीं कां हो ? बरं त्यांचं कन्सल्टेशन जरूर आहे. अपॉइन्टमेन्ट झाली कीं कळवा आम्हांला. बरं, बॅरिस्टरसाहेब आपण कशाला आतां तसदी घेतां ? बसा ना !—

**बॅ॰ सत्यपाल**--( नमस्कार करून जातांना स्वगत ) परमेश्वरकृपेनं लवकरच सुटका झाली म्हणायची.

**डॉ॰ सदाशिव॰**—आपला ड्रायव्हर कुठं आहे ? नाना, ए नाना, ( नाना येतो ) चल हॅंडल मार बुवा.

**नाना॰**—( तंबाखू चघळीत ) साहेब थोडा उशीर आहे. चाकांतली हवा गेली. पंक्चर झालंस वाटतं आहे.

**डॉ॰ सदाशिव॰**— असं ! बरं, नाना लवकर दुरुस्त कर.

**डॉ॰ गणपतराव॰**--हो नाहींतर बसशील तंबाखू चघळीत. इन् इंग्लंड दे आर व्हेरी क्विक्. ( नाना जातो )

**डॉ॰ सदाशिव॰**—गणुकाका, तसा आमचा नाना गुणी आहे बरं. आपल्या नानासाहेबांनीं आणला आहे त्याला कोंकणांतून.

**डॉ॰ गपतराव॰**—ओ आय् सी, दॅटस् व्हाय ही इटस् दॅट स्टफ्. ही स्पेंडस् हाफ अ डे इन् दॅट. अँड रेस्ट ऑफ दि डे ही बिट्रेज् कॉन्स्टिपेशन.

**डॉ॰ सदाशिव॰**—ओ, अ नाईस् फेलो बुइथॉल दॅट. ते राहू दे, भडकमकर सध्यां नाहींत तर आपणच सरलाबाईची केस डिस्कस करूं या. यू हॅव् एक्झॅमिंड हर.

**डॉ॰ गणपतराव॰**—( नाजुकपण खोकून ) ओ, वेल यस्.

**डॉ॰ सदाशिव॰**—लेट मी नो युअर डायग्नोसिस ? गणुकाका काय

वाटत रे तुला ! एकंदर हिस्ट्रीवरून ब्रेन फिव्हर नी नर्व्हस् शॉक असावा नाहीं !

डॉ० गणपतराव०—इटीज अस्ट्रेट फॉर्वर्ड केस ऑफ मलेरिया. तुम्ही क्विनीन इन्जेक्शन दिलं नाहींत का त्यांना !

डॉ० सदाशिव०—नाहीं बुवा !

डॉ० गणपतराव०—इन् इंग्लंड दे वोन्ट वेट.

डॉ० सदाशिव०—अस्सं! बरं. तू मलेरिया म्हणतोस, कसं ओळखलस रे तूं गणुकाका !

डॉ० गणपतराव०—ओ, आय स्मेल्ट इट ऑन द थ्रेशोल्ड. स्त्रीन आहेना शिवाय ! वुइथ सच अ स्प्लीन वन कान्ट थिंक ऑफ एनिथिंग एल्स इन् बॉंबे. धिस इज वन थाउजन्ड सेवन हड्रेड अँड थर्टीनाइन्थ केस ऑफ मलेरिया दॅट आय् हॅव कम् अॅक्रॉस सिन्स आय लेफ्ट होम.

डॉ० सदाशिव०—असं. व्हेरिगुड. यु आर क्वाइट् राइट्. गणुकाका, तूं हुशार आहेस. आय अॅम शुअर यू वुइल मेक युअर नेम क्विक्ली.

डॉ० गणपतराव०—थॅंक यू—इन् इंग्लंड दे डोन्ट फाइन्ड इट सो ईझी.

डॉ० सदाशिव०—असं ! बरं. तू म्हणतोस मलेरिया. मग द्यायचं कारे इन्जेक्शन ! मला वाटतं टोंचावं. १ ग्रेन क्विनीन टोंचतो उद्यां त्यांना.

डॉ. गणपत०—गुड ग्रेशस ! वन् ग्रेन ! इन इंग्लंड इटीज नेव्हर लेस् दॅन टेन ग्रेन्स.

डॉ. सदाशिव०—पहा बुवा ! रिस्की आहे बरं. दहा ग्रेन ! गणुकाका, देऊंच का इन्जेक्शन !

डॉ. गणपत०—इन् इंग्लंड दे डोन्ट हेजिटेट.

डॉ. सदाशिव०—असं! ऑल राइट. गणुकाका, पहा बुवा, आपल्या बॉंबेत टेटॅनसची भीति असते म्हणतात. गणुकाका तुझा हात अगदीं हलका आहे. यू प्रिक, तूं टोंच.

डॉ. गणपत०—इन् इंग्लंड दि सीनिअर्स् डू इट.

डॉ. सदाशिव०—असं ! गणुकाका, टोंचतांना हाऊ डीप यू गो रे ! वन् थर्ड्ए ऑफ अॅन इंच् !

**डॉ. गणपत०**—इन् इंग्लंड दे गो हाफ ॲन इंच्. ( नारायण येतो. )

**नारायण०**--मोटार दुरुस्त होईतो डॉक्टर, चहा घेतां का ?

**डॉ. सदाशिव०**—नको मी घेत नाहीं. मी आपला सकाळीं ताटभर दहिभात बसवून बाहेर पडतों.

**डॉ. गणपत०**—इन् इंग्लंड दे नेव्हर स्टर आउट् विदाउट टी.

**डॉ. सदाशिव०**—हं, नारायण, तुझं कसं काय आहे रे बुवा ?

**नारायण०**—पंधरा दिवस झाले. ताप मुळींच नाहीं.

**डॉ. सदाशिव०**—आय ॲम ग्लॅड. मला फार आनंद झाला. हें पहा आणखी औषध घे. कांहीं फार नाहीं. सिक्स ॲनाज् अडे. हो बायद बाय हें तुझं बिल. मघाशीं हाताला लागलं. अकरा रुपये आहेत. एरव्ही म्हणजे कांहीं घाई नाहीं—पण शिवाचा शुभ आकडा आहे. लवकरच दे. ( नाना येतो )

**नाना०**—गाडी तयार झाली साहेब.

**डॉ० सदाशिव०**—बरं चला ?

**नारायण०**—भडकमकर येतात कीं नाहीं उद्यां कुणास ठाऊक ? हे डॉक्टरसाहेब येतील ना उद्यां ?

**डॉ. गणपत०**--( कोटाच्या अस्तनींतून रुमाल काढून तोंडावर फिरवतात. व नाजुकपणें खोकून ) ॲमऽफ्रेड, शांट प्रॉमिस् ( डोक्यावर टिचकी मारून ) नॅस्टि हेड एक्. मस्ट गो टु माथेरान फॉर थर्टी सिक्स् अवर्स.

**डॉ. सदाशिव०**—हें पहा नारायण, सरलाबाईंना म्हणावं आज नुसता दहींभात खा.

**डॉ. गणपत०**—इन् इंग्लंड दे नाउ अ डेज कीप ऑन लिक्विड डायट.

**डॉ. सदाशिव०**—( स्वगत ) हा लेकाचा इन् इंग्लंड म्हणून जिथं तिथं माझं नाक खालीं करणार. विलायतेहून आला म्हणून काय झालं. इथं तर एम्. बी. बी. एस.ला तीनदां नापास झाला. ( उघड ) बरं चला गणुकाका आतां--( जाणार तो डोक्यावर पोतं घेतलेला व घामाघुम झालेला किसन प्रवेश करतो. ) काय रे कुठं होतास इतके दिवस ?

डॉ. भडकमकरांच्याकडे तुला पाठवला होतांना चिठी देऊन ? हें काय डोक्यावर ?

**किसन०**—( स्वगत ) नारायणाला बातमी केव्हां सांगेन असं मला झालं नी हे कशाला इथं.

**नारायण०**—अरे बहिऱ्या ऐकू नाहीं का आलं ?

**किसन०**—हो, हो. ( ट्रंक खालीं ठेवून, घाम पुसून आणि श्वास घेऊन ) त्याचं असं झालं, माझा भाऊ गोंद्या पुण्याला असतो. तो भडकमकरांच्याकडून प्रकृति तपासून घेण्याकरितां इथं आला. मी चिठी घेऊन गेलों, त्याच वेळीं त्याला ये म्हणून डॉक्टरांनींच खुद्द सांगितलं होतं. आम्ही दोघेजण दवाखान्यांत तबल दोन कलाक बसलों, पत्ता नाहीं डॉक्टरांचा. नंतर कळलं की येन पावेलमधें गेले आहेत; येन पावेलमधें कळलं कीं, नॅशनल मेडिकल कॉलेजांत गेले आहेत; तिथं कळलं कीं,ब्राह्मणसभेंत गेले;ब्राह्मणसभेंत कळलं " नवाकाळ " ऑफिसांत गेले. तिथं कळलं श्रीसमर्थ नाटक मंडळीच्या नाटकाला गेले. तिथं गेलों तर मंडळी सांगू लागली कीं, मिरजेला गेले. लगेच मिरजेला गेलों, तर तिथं कळलं कीं, मुंबईला परत गेलें. त्यांच्या घरीं मुंबईला गेलों तर सांगू लागले कीं, ते काय ते, वुमेन युनर्सिटीच्या समारंभाला गेले आहेत. तिथं गेलों तर कळलं कीं, दवाखान्यांत गेलें आहेत. शेवटीं आमचा कोंकणी विचार केला, नी बाजारांत गेलों. आठ दिवसांचें तांदूळ, डाळ, पीठ नी हें पोत घेतलं. सर्व सामान या पोत्यांत घातल. स्टो घेतला. गोंद्याला या सामानासह दवाखान्यांत ठेवला. बजावलं, आठ दिवस इथंच मुक्काम कर. सैंपाक कर, जेव. डॉक्टर चुकून दवाखान्यांत आले तर तपासून घे. माझी वाट पाहूं नकोस. जेवून येतो म्हणतील तर त्यांनाही भात, पिठलं करून घाल. दोघेंही जेवा. मी घालतों ही चिठ्ठी घेऊन मुंबईंत त्यांच्यामागें रिंगण.

**नारायण**—अरे खुळ्या, इतकं रे कशाला केलंस ! भेटले नाहींत तरं परत यायचं.

**किसन**—वा ! साहेब म्हणाले जरूरीची चिठ्ठी आहे; डॉक्टर भेटल्याशिवाय येऊं नको म्हणून.

**डॉ० सदाशिव०**—व्हावारे शहाण्या, भेटले कां मग डॉक्टर ?

**किसन**—भेटले कसले, गांठलें त्यांना मी. आतां सकाळीं दवाखान्यांत जात होतें. तिथंच गांठलं, चिठ्ठी दिली, गोंद्याला तपासून घेतला. त्याला पुढच्या दारांत बसवला नी मी मागच्या दारावर उभा राहिलों. थोडा वेळ झाला नी मागच्या दारानं जात होते डॉक्टर, तेव्हां चिठ्ठीचं उत्तर मागितलं तर हंसले. दारांत गाडी उभी होती त्यांत मुकाट्यानं बसले आणि चालते झाले. जातांना पन्नास जणांना आठ वाजतां येतो म्हणून सांगितलं त्यांनीं.

**डॉ. गणपतराव**—पण हे काय हे डॉक्टराचं कसं ?

**डॉ. सदाशिव**—ते तसंच आहे. सगळं असलं तरी तो देवमाणूस आहे बरं देवमाणूस. कसाही वागला तरी राग येत नाहीं गृहस्थाचा. आणि एखादे वेळीं आपण रागावलोच तर असं कांहीं खुदकन् हसतात कीं आपला राग जातोच जातो, उलट देवा, या गृहस्थाला उदंड आयुष्य आणि सुख द्या अशी नकळत प्रार्थना करून मनुष्य मोकळा होतो.

**डॉ. गणपत०**—बट् इन इंग्लंड डॉक्टर्स आर व्हेरी रेग्युलर.

**डॉ. सदाशिव०**—चला तुम्हांला पुढचा जन्म इंग्लंडांत देण्याविषयीं देवाजवळ प्रार्थना करूं या. ( दोघेही जातात. नारायण आंत जातो.)

**किसन**—गेली एकदांची पिडा—नारायण, नारायण याचे कान बहिरे झाले काय ? ए नारायण, नारायण.

**नारायण**—( नारायण प्रवेश करतो ) किश्या गाढवा, तुला हजार वेळां सांगितलं असं मोठ्यानं ओरडत जाऊं नकोस म्हणून. पुन्हा तेच करतोस. कांहीं लाज—(कान धरतो.)

**किसन**—अरेरे--आई. अरे तें सामान घेऊन धांवत येतांना आधींच माझा जीव अर्धा व्हायची वेळ आली नी तूं आतां–अरेरे केवढ्या जोरानं– (नारायण कान सोडतो. किसन कान चोळतो.)

**नारायण**--पुन्हा ओरडलास–गाढवा अगोदरच ताईसाहेबांना रात्रीची नीट झोंप लागत नाहीं. दिवसां कधीं अमळ डोळा लागतो म्हणून गडबड करीत जाऊं नकोस म्हणून तुझ्या कानीकपाळीं तिनतिनदां ओरडत असतो. तरी तुझी ही ओरड–देऊं थोबाडींत--

**किसन**—नको, नको. नाहीं ओरडणार. पण ऐक आतां आधीं मीं काय सांगतों तें. अरे मी एवढा धापा टाकीत आलों तुला सांगायला—

**नारायण**—साध्या गोष्टीलासुद्धां तुझी धडपड असते. मग--

**किसन**—ऐक तर अगोदर मी काय सांगतों तें. मग कबूल करशील कीं, गोष्ट साधी नाहीं म्हणून--

**नारायण**—प्रस्तावना पुरें, सांग काय तें आधीं.

**किसन**—अरे आपल्या प्रिन्स ऑफ वेल्सना पकडलंना पोलिसांनीं.

**नारायण**—किश्या, स्वप्नांत तर नाहींस ना?

**किसन**—स्वप्नांत? या माझ्या डोळ्यांनीं पाहिल्या हातकड्या त्यांच्या हातांत-या या डोळ्यांनीं—

**नारायण**—काय? हातकड्या पाहिल्यास? धाकट्यासाहेबांच्या हातांत?

**किसन**—हो म्हणतोना.

**नारायण**—कुठं? कधीं पाहिल्यास? सांग लवकर.

**किसन**--आतांच सांगितलंना कीं, डॉ. भडकमकर मागच्या दरवाजानं बाहेर पडून गाडींत बसून गेले म्हणून?

**नारायण**—बरं मग?

**किसन**—मला आला राग. मी पण गेलों त्यांच्या मागं. ठाकूर द्वाराजवळ जातो तो नाक्याजवळ गडबड ऐकूं आली. म्हणून तिकडें पाहतो तों आपले प्रिन्स ऑफ वेल्स पोलिसांशीं हिसकाहिसकीं करताहेत. गेलों गर्दींत. पाहिलं तर पोलिसांनीं त्यांच्या हातांत हातकड्या ठोकलेल्या—

**नारायण**—असं? मग तूं कांहीं विचारलं कां त्यांना—?

**किसन**--ऐकतर-प्रिन्स ऑफवेल्स म्हणून मी हांक मारली अन् मी जवळ जाऊन प्रश्न विचारणार तो त्या शिपुड्यानं माझ्या थोबाडींत लगावली.

**नारायण**—( आतुरतेनं ) मग कांहीं कळलं कीं तसाच—

**किसन**--तसा कसा येईन. दहा जणांना प्रश्न विचारले. अरे तेव्हां कळलं कीं, आपल्या प्रिन्स ऑफ वेल्सनी खून केला—

**नारायण**--खून? धाकट्या साहेबांनी खून?—( थांबून ) किश्या नीट चवकशी केलीस कीं,--

**किसन**--म्हणजे, अरे तू मला काय समजतोस ? मी काय इतका मूर्ख आहे कां काय ?

**नारायण**--बरं बरं. सांग पुढं, आटप लवकर--

**किसन**—अरे एकानं नव्हे तर दहाजणांनीं मला हेंच सांगितलं.

**नारायण**—( स्वगत ) एखाद दिवशीं असं कांहीं तरी त्यांच्या हातून होईल असं त्यांच्या वर्तनावरून मला वाटलंच होतं. ( उघड ) कायरे कुणाचा खुन केला. केव्हां-कांहीं कळलं कां ?

**किसन**—हो हो तर सगळी बितंबातमी काढली आहे. पण तूं ऐकूनच घेत नाहींस. एकदम-मध्येंच मला प्रश्न—

**नारायण**—बरं, बरं. पुढं बोल.

**किसन**—अरे त्यांनीं एका कोवळ्या पोराचा खून केला म्हणतात—

**नारायण**—कोवळ्या पोराचा ? कोवळ्या ? नीट ऐकलस ना ? कीं,-

**किसन**—एकदां सांगितलं ना कोवळ्या पोराचा म्हणून-बिचारी त्याची बायको रडत जात होती मागनं पोलीस ठाण्यावर-

**नारायण**—( स्वगत ) बायको जात होती-कोवळ्या पोराचा खून ? सुधाकर-( किसनचा एकदम हात धरून ) किश्या, कशी आहे रे ती बाई दिसायला ? ठेंगू कीं उंच ?

**किसन**—अरे मी विचारीत होतो प्रश्न. माझं नव्हतं इतकं लक्ष गेलं तिच्या अंगाकडे. अरे ती सारखी डोळ्याना पदर लावी आणि मध्येंच सुधाकर सुधाकर असं कायसं बडबडे.

**नारायन**—(स्वगत) सुधाकर ! सुधाकर-अरेरे दुष्ट चांडाळ-सुशिलाबाईना जी धास्ती वाटत होती ती अशा रीतीनं खरी ठरली एकूण. पण या किशानं नीट ऐकलं कीं-ते कांहीं नाहीं. मला आधी सुशिलाबाईकडं जाऊन-( उघड ) किश्या मी जरूरीच्या कामाकरतां जाऊन आलोच लवकर-साहेब आंत आहेतच. पण काम लागलं तर जवळच रहा. मी येईपर्यंत बंगल्याची पायरी उतरलास तर याद राख-नीघ आधी. हे सामान उचल लवकर (किसन जातो) सुधाकराचा खून-धाकट्या साहेबांनी-खरं असेल कां हे ? खरं असेल तर काय दुर्दैवी पोर ? त्याची कुठं तरी व्यवस्था लावण्यासाठींच तर काकासाहेब कानपुराकडे परवाच येथून गेले. आणि इकडं

हा त्याचा असा शेवट झाला. काकासाहेबाना हे ताबडतोब कळवीन म्हटलं तर त्याची व्यवस्था जमण्यासाठी कदाचित त्यांना दोन चार ठिकाणीं जावं लागणार आहे. पण खरंच असेल का हें ? दुष्ट बातमी कधींच खोटी ठरत नाहीं. तरी पण आधी सुशिलाबाईची भेट घेऊन—( जाऊं लागतो तोंच ) अरे बापरे, सुशिलाबाईच इकडं—! इतक्या घाईनं—अरेरे दुष्ट वार्ता खरीच तर. पण सरलाताईना हे दिसलं तर—नको नको. बाहेरच त्यांना परस्पर गांठलं पाहिजे. सुशिलाबाई—सुशिलाबाई—(त्यांना आडवायला जातो तो सुशिलाबाई घाईनं येतात. )

**सुशिला**—( रडत ) नारायण, अखेर माझी धास्ती खरी ठरली रे. काकासाहेब—

**नारायण**—ऐकलं तें खरं तर ?

**सुशिला**—होय.

**नारायण**—अरेरे—

**सुशिला**—नारायण—

**नारायण**—इथं नको—तिकडे चला बाहेर आधी. मग बोलूं सगळं
( घाईनं जातात )

**अंक तिसरा समाप्त**

# अंक चवथा

## प्रवेश १ ला.

( **स्थळ:**—बॅ. त्रिकमचंद यांचे घरांतील बाहेरची खोली. सुशिला व तात्या दलाल आंतून येतात. वेळ सकाळ. )

**दलाल**—पहा, सुशिलाबाई विचार करा; सुंदररावांचा मी मित्र म्हणून इतका जीव तोडून सांगतों आहे. इतर कुणी पक्षकार असता तर—आम्ही वकिलांचे दलाल पांच मिनिटांच्यावर कधीं बोलत नाहीं पक्षकारांशीं. बॅ. त्रिकमचंद, बालकिसनदास यांच्यासारखीं माणसं म्हणतांहेत तर त्याप्रमाणं सरलेमार्फत दम द्या चांगला सत्यपालांना. असं कांहीं केलंत तरच सुंदररावांचा जीव वाचेल.

**सुशिला**—असं कां बरं म्हणतात ते ? सुधाकर माझा मुलगा होता, आणखी कुणाचा नव्हता. असं तीनतीनदां नाहीं कां मी कोर्टाला सांगितलं ?

**दलाल**—हो सांगितलंत. नाहीं कोण म्हणतो ? पण पटलं कां कोर्टाला तें ? अखेरी खुनाचाच आरोप ठेवलाना सुंदररावावर कोर्टानं ? गेलाच ना खटला हायकोर्टाकडे ?

**सुशिला**—पण रागाच्या भरांत, दारूच्या धुंदींत—

**दलाल**—तें सगळं खरं. पण दारूबाजाला कायदा क्षमा करीत नाहीं. ठाऊक आहे कां आधी तुम्हांला हें ? अन् संतापाच्या भरांत त्यांनीं सुधाकराला मारलं म्हणून तुम्ही म्हणतां ? पण खुनी माणसांचे प्राण वाचविण्यासाठीं त्याचा राग सुद्धां कायद्याप्रमाणं वाजवी असावा लागतो वाजवी. सुधाकर म्हणजे आपल्याच पापाचं फल हें कळल्यावर सुंदररावांचा राग भडकला आणि त्यांनीं त्याला मारला. हेंच कीं नाहीं ? कायद्यांत असल्या रागाला मुळींच क्षमा नाहीं सुशिलाबाई.

**सुशिला**—( रडत ) खरं म्हटलं तर खरी अपराधी मी आहें. सुधाकर कोण आहे हें रागाच्या भरांत भान न राहून माझ्या तोंडून निघून गेलं. कशी हो मी चांडाळीण ? मला का नाहीं देत फांशीं आधीं ?

**दलाल**—सुशिलाबाई, हें असं इथं—

**सुशिला**—कानपुराकडं जाते वेळीं काकासाहेबांनीं सुधाकराला किती विश्वासानं सांभाळायला सांगितलं होतं मला ? तिकडून ते परत आले म्हणजे त्यांच्यापुढं काय ठेवूं ? कसं दाखवूं हें काळं तोंड त्यांना ? देवा, देवा, पृथ्वी दुभंगून आतां मला पोटांत घेईल तर बरं.

**दलाल**—किती, किती रडाल आतां सुशिलाबाई ? झाल्या गेल्या गोष्टी. मी म्हणतों आतां पुढचं बघा. सुंदररावांना वाचवायचं नाहीं का तुम्हांला ?

**सुशिला**—नाहीं असं कसं होईल ? पण सरलाबाईकडे जायचं म्हणतां त्यानं पोटांत कसं भडभडून येतं.

**दलाल**—होय. पण त्यांच्याकडे जाण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

**सुशिला**—पण तो माझा मुलगा होता असं आज हायकोर्टांतही मी सांगितल्यावर मग काय होणार आहे त्यांच्या जिवाला ?

**दलाल**—आतां कसं नी किती वेळां तेंच तेंच सांगूं ? त्रिकमचंद व बालकिसनदास यांच्यासारखा फौजदारी वकील एक तरी उभ्या मुंबईत आहे कां दाखवा ? रोजीं हजार रुपये देऊन मिळायचे नाहींत कुणाला. त्यांचा माझा ऋणानुबंध—मित्रकार्य म्हणून सुंदररावाकरितां मीं खेचून आणलं त्यांना. सुधाकर माझा मुलगा होता म्हणून अगदीं प्रिव्ही कौन्सिलपर्यंत तुम्ही म्हणत गेलात तरी कांहीं एक व्हायचं नाहीं. तसं म्हटल्यानं काम भागतं तर सत्यपालसरला यांच्याकडे जायला कशाला तिनतिनदां तुम्हांला ते सांगते ? बोला.

**सुशिला**॰—सरलाताईच्याकडे मी जाऊं ? कशी जाऊं ? कोणत्या तोंडानं जाऊं ?

**दलाल**—कशी न् काय ? असं रडून कसं चालेल ? असं रडत बसलांत एकसारख्या तर सुंदररावांचा जीव ?—पहा बुवा. सरलेकडे गेलं हें पाहिजेच.

**सुशिला**—गेलं पाहिजे? नाहीं हो माझ्यानं मनांत सुद्धां आणवत ते. त्यांच्यासमोर उभी राहिलें म्हणजे काय सांगू त्यांना!

**दलाल०**—अहो खरं आहे तेंच सांगायचें—कीं सुधाकर तुझाच होता म्हणून.

**सुशिला**—( कानावर हात ठेवून ) आई, आई, नका हो असं बोलूं. बिचारं पोर, कसं हो माझ्या अंगावर होतं अगदीं! कालपरवां होता नाहो तो, कालपरवा होता; अन् आज! कसं सांगूं मी त्यांना? तुमचाच मुलगा मेला, मारला गेला, त्यांनीं मारला–हो मारला–कसं कसं ओकूं हें विष त्यांच्या समोर? डोळ्यासमोर हें सगळं उभं राहिलं कीं कसं आतड्याला कापल्यासारखं होतं नी सरलाबाईना, त्याच्या आईला सांगायचं म्हणतां? तो जिवंत होता—आपल्या शेजारी होता—हाताशीं होता, हें माझ्या तोंडून त्यांना आतां सांगायचं? काय वाटेल त्या आईला? नाहीं हो माझ्यानं कल्पना करवत.

**दलाल**—आहो, तिला काय इतकं वाटणार आहे? बोलून चालून तो तसा मुलगा—

**सुशिला०**—तसा मुलगा? तसा मुलगा! तसा असला तरी तो पोटचा. त्या आई होत्या; आई आहेत बरं; आई आहेत. आई होणं म्हणजे काय हें एका आईशिवाय कुणाला कळणार? देवा, मी मरत का नाहीं आतां?

**दलाल**—सुशिलाबाई, काय हे? अहो आंत बॅरिस्टरसाहेब बसले आहेत. त्यांनीं ऐकलं म्हणजे? अहो आज तुम्ही कोणत्या स्थितींत अहात? कोणता प्रश्न आज तुमच्या समोर आहे याचा कांहीं विचार? सुशिलाबाई तुमच्या पतीचे प्राण वाचवणं हा तुमच्यापुढं प्रश्न आहे.

**सुशिला**—होय आहे खरा–पण सरलाबाईच्याकडे जाण्याशिवाय दुसरा उपाय खरंच का नाहीं?

**दलाल**—नाहीं.नाहीं. त्यांनीं आणि मी मिळून सर्व कायदा धुंडाळला. दुसरा उपाय निदान कायद्यांत तरी नाहीं. हें पहा सुशिलाबाई, मी तुम्हांला शेवटचं विचारतों; वेळ थोडा आहे. सरलेकडे तुम्हाला जायचं आहे कीं

नाहीं ? सुंदरराव आमचा मित्र म्हणून त्याच्या जिवाकरितां आम्ही इतके मरतो आहोंत अन् तुम्हांला त्याचं—

**सुशिला**— नका हो असं बोलूं ?

**दलाल**—सुंदररावांच्या जिवाशीं आलं तरी नको बोलूं ? सुशिलाबाई आम्ही कायद्याच्या रूक्ष वातावरणांतलीं माणसं. कायद्याच्या पोलादी चौकटींत बसेल इतकं प्रेम, इतकी दया, आणि इतकाच प्रामाणिकपणा आम्हांला माहीत असतो. सुंदररावाला वाचवायचं असेल, सरळ सरलेकडे जा. तिच्या मार्फत सत्यपालांना दम भरा. म्हणावं तुम्ही सरकारी वकील आहांत. गुन्ह्याचं स्वरूप कमी जास्त करणं तुमच्या हातीं आहे. गुन्ह्याचं स्वरूप कमी करा नी सुंदररावांचे प्राण वांचवा नाहींतर—

**सुशिला०**—नाहींतर काय ?

**दलाल**—नाहीं तर, हो स्पष्टच सांगतों. सरला-सुंदररावांचं हें प्रकरण भरकोर्टांत सांगायचं—सत्यपालांना हें सर्व माहीत होतं आणि म्हणूनच खाजगी सूड उगवण्याच्या हेतूनं सुंदररावांच्या गुन्ह्याचं स्वरूप ते फुगवीत आहेत असं रोख ठोक भरकोर्टांत सांगायचं आम्ही—सुंदररावांनींच खुद्द ठरविलं आहे. पहा काय ते ?

**सुशिला**—असं ठरवलं आहे ! ( वैतागून ) भरकोर्टांत सरलाताईची बेअब्रू ? काय मांडलं आहे तरी काय हें

**दलाल**—अहो, अहो ऐकून तर घ्या आधी शांतपणें नीट. हें पहा, म्हणतो कोण बेअब्रू करायची म्हणून? गुन्ह्याचं स्वरूप कमी करा, माझे प्राण तरी निदान वांचवा म्हणजे मग मी सरलेची बेअब्रू कोर्टांत करीत नाहीं हें त्यांचं सरळ म्हणणं आहे. अन् काय चूक आहे हो त्यांत ? सत्यपालांनीं मनांत आणलं तर सरलाबाईची बेअब्रू अन् सुंदरावांचे प्राण, दोन्ही वांचतात हें कसं तुमच्या लक्षांत येत नाहीं ? (स्वगत) जर कां सत्यपालांनीं असं केलं तर काय मजा येईल. सत्यप्रतिज्ञ ! हं, पुन्हां कांहीं आमच्यासमोर मग वर तोंड करून येण्याची छाती नाहीं या सत्यप्रतिज्ञ हरिश्चंद्राची. (उघड) हं मग काय जाणार ना तुम्ही सरलेकडे ? तिच्यामार्फत—नाहीं तर सरळ सत्यपालांच्याकडे जा आणि द्या दम चांगला नी काय. मग काय ? सांगूं मी आंत त्रिकमचंदाना ? अहो बोला, वेळ थोडा आहे.

**सुशिला**—सुधाकर माझा होता म्हटल्यानं त्यांचा जीव—

**दलाल**—वांचणार नाहीं. शेवटचं सांगतों, पुन्हा विचारूं नका.

**सुशिला**—त्यांचे प्राण वांचवावयाचे? पतीचे प्राण वाचवणं? सरलाबाईची बेअब्रू वाचवणं? खरंच कां वाचेल त्यांची बेअब्रू?

**दलाल**—खरंच कां? आहो खात्रीनं. नुसती त्यांची बेअब्रूच वांचेल असं नव्हे तर तुमच्या पतीचे प्राण वाचतील त्याच्या बरोबर.सगळी किल्ली काय ती सत्यपालांच्या हातीं आहे.

**सुशिला**—त्यांचे प्राण, सरलाताईची अब्रू. दोन्ही माझ्या जिवाहून अधिक आहेत. देवा, तूंच एक सर्व ज्ञानी आणि सर्वसाक्षी आहेस. तूंच मला आतां बुद्धि दे.

**दलाल**—देव स्वतः का येत असतो मदतीला खालीं? आमच्यासारख्या मित्रानांच तो बुद्धी देतो. मग तुमच्या काकासाहेबासारखे कितीही दांतओठ खावोत आमच्या मैत्रीला.

**सुशिला**—काकासाहेब जर यावेळीं असते—

**दलाल**—हो असते; मी म्हणतों अगदीं काकासाहेब असते? काय करते दुसरं याच्याशिवाय तें सांगा?

**सुशिला**—एकाचे प्राण अन्—दुसऱ्याची बेअब्रू वांचवणं सत्यपालांच्या केवळ हातीं? गेलं पाहिजे. हो गेलचं पाहिजे. सर्वसाक्षी नारायणा, आई, तूच आतां मला धीर दे.

**दलाल**—हं, आतां कसं बरं बोललांत? परमेश्वर तुम्हांला योग्य तीच बुद्धि देतो आहे अशी श्रद्धा ठेवून धीरानं वागा अगदीं. काय समजलांत?

**सुशिला**—जाते, परमेश्वर बुद्धि देईल तसं करतें.

**दलाल**—ठीक आहे. लौकर कोर्टांत या. आम्ही त्रिकमचंद, सर्व तिथं तुमची वाट पहातों बरं. ( जाते ) ठीक झालं हे. सत्यपालांची मात्र आतां परीक्षा आहे. सत्यप्रतिज्ञ ठरण्याकरितां बायकोची चारचौघांत होणारी बेअब्रू बघणार! कीं बायकोची बेअब्रू वांचविण्याकरतां गुन्ह्याचं स्वरूप कमी करण्याचं कबूल करून सत्यभ्रष्ट होणार! ते काकासाहेब! आम्हाला कुत्र्याप्रमाणं घराबाहेर हांकून देतात नाहीं का! म्हणे मी सुंदरावाला

बिघडवलं ! ठीक आहे. काकासाहेब नी सत्यपाल, मजा उडणार नी दुसरं काय ! चला त्रिकमचंदांच्या कानांवर आंत जाऊन सगळं घातलं पाहिजे.

( जातो )

---

## प्रवेश दुसरा.

( **स्थळ**—सरलेची खोली. एका बाजूस पलंग आहे. दुसऱ्या बाजूस कोच असून पलीकडे एक लहानसें लिहिण्याचें टेबल आहे. टेबलावर रविवर्म्याची, श्रीसरस्वतीदेवीची एक लहानशी तसबीर आहे. कांहीं कागद व लिहिण्याचें इतर सामानही तसबिरीसमोर ठेवले आहे. ठिकठिकाणीं देवादिकांच्या व प्रसिद्ध पुरुषांच्या, अगदीं थोडया पण वेंचक आणि सुंदर अशा तसबिरी टांगल्या आहेत. त्यांत सत्यपालांच्या वडिलांचाही एक मोठा फोटो आहे. सकाळच्या वेळीं या खोलींत सरला श्रीसरस्वतीदेवीच्या तसबिरीसमोर हात जोडून उभी राहून प्रार्थना करते आहे. तिचा चेहरा बराच फिका झाला आहे. वेणी अद्याप घातली नसल्यामुळें कांहीं केस गालावर व डोक्यावर रुळत आहेत. )

**सरला**—( देवीला नमस्कार करून ) देवी, हें आजारीपण तूं मला मुद्दामच धाडलंस कीं काय असं मला वाटूं लागतं. हो, त्यामुळें तितकीच मी त्यांच्यापासून दूर नाहीं कां राहिलें ! कांहीं दिवसांपूर्वी मला आपल्या हृदयांत लपवून ठेवा अशी मी त्यांना विनंति केली होती. ठेवलीच आहे त्यांनीं मला तशी. तरी पण, क्षमा कर, देवी, सगळं जग मला बघतं आहे—टक लावून माझ्याकडे बघतं आहे, मी हीन — अपात्र म्हणून नांव ठेवतं आहे असा मला एकसारखा भास होतो. अन् मग त्यांच्याही हृदयांतून उडी मारून, जगापासून दूर, दूर, देवी, जिथं तुझे हे पवित्र चरण असतील तिथं एकदम ठाव घ्यावा अशी माझ्या जिवाभावाला तळमळ लागते. ( थांबून ) पण ते तरी कोण आहेत ? देवच आहेत. देवी, तूंच मला पटवलंसना ते देवच आहेत म्हणून ! ते जवळ नसले कीं, माझे डोळे त्यांच्या वाटेकडे कां बरं मग लागलेलें असतात ? हो, आहेतच ते देव. माझ्या

देवांना मी पाहिजे––जशी मी आहें तशी पाहिजे–त्यांना काकांनीं सगळं सगळं सांगितलं तरी मी त्यांना पाहिजे आहे. मग मला दूर राहण्याचा काय बरं अधिकार ! लग्नानं ते सुखी झालें मग मला दुःखी राहण्याचा अधिकारच नाहीं. मी जरा दूर झाले कीं, त्यांना वाईट वाटतं. देवी, आई, त्यांच्याजवळ राहण्याचा मी नाहीं कां बरं प्रयत्न करीत ! पण काय करूं, भूतकालच्या प्रसंगांचीं हीं भुतं मधेंच उभीं––नाहीं मी त्यांना आतां भ्यायची. त्यांच्या प्रेमाच्या जोरावर मी त्या भुतांच्या समोर धैर्यानं उभी राहणार. मला त्यांना सुखी करायचं आहे, मी धैर्यानं वागणार. देवी, मी नाहीं ना या भुतांना आतां भिणार ! नाहीं ना मी माझ्या देवापासून आतां दूर राहणार ! देवी, तुझे पवित्र चरण साक्ष आहेत, मी नाहीं आतां भिणार; नाहीं मी दूर राहणार. (हात जोडून तन्मयतेनं उभी राहते. सत्यपाल प्रवेश करून स्तब्धतेनं तिच्याकडे पहात उभे राहतात. )

**सत्यपाल**––सकाळपासनं हा तिसऱ्यांदा देवाला नमस्कार. हिची ही तन्मयता पाहिली कीं, त्या तन्मयतेचा जरासुद्धां भंग करणं म्हणजे पाप आहे असंसुद्धां एखाद वेळ वाटूं लागतं. झालं आहे तरी काय हिला ? काय असेल ते असो. अलीकडे वारंवार माझ्या मनांत येतं कीं, लग्नापूर्वी काकासाहेबांनीं मला पत्र दिलं होतं त्याचा नी हिच्या वागण्याचा कांहीं संबंध–! मला ते त्या वेळीं वाचण्याची आवश्यकता वाटली नाहीं. मीं तें तसंच जाळून टाकलं. तें मला वाचायला हवं होतं कां ? कांहीही असो, झालं तें झालं. आतां हिचाच पिच्छा पुरवून हिच्या अंतःकरणाचा मला छडा लावला पाहिजे. अजून नमस्कार चालूंच आहे. सरले, सरले, सरले–(सरला पुन्हां एकदां शांतपणें देवीला नमस्कार करते. नंतर सत्यपालांच्या जवळ येऊन उभी राहते ) किती वेळ मी उभा आहें अन् किती हाका मारल्या कांहीं ठाऊक आहें का ?

**सरला**—खरंच कां ?

**सत्यपाल**—तुझी ही प्रार्थना संपेल तेव्हांनां ? सकाळपासून तिसऱ्यांदा झालं हें. एकसारखं कायपण हें देव, देव !

**सरला**––( देवीकडे पाहून ) जे देवपदाला आगोदरच पोहोचले

आहेत त्याना प्रार्थनेची काय गरज ? जे तसें नसतात त्यांना—माझ्या-सारखीला प्रार्थनेची तळमळ असते. पण आपणच माझे देव आहांत.

**सत्यपाल**—( एकदम ) हें पहा मी तुला स्पष्ट सांगतों कीं, मला देवबिव कांहीं म्हणू नकोस. कुणीं सांगितलं तुला कीं मी देव आहें म्हणून ?

**सरला**—कुणी कशाला सांगायला हवं. पत्नीला तें चटकन कळतं. हें कळायला पत्नी व्हावं लागतं बरं पत्नी. मला पटलं आहे, आपण देव आहांत तें. मीं विसरत होते, पण माझ्या देवीनं आतां मला पटवलं आहे तें. आतां नाहीं मी दूर व्हायची इथून.

**सत्यपाल**—हजार वेळां असं बोलतेस, जवळ येतेस नी पटकन कसं तरी वागतेस.

**सरला**—आतां नाहीं असं करायची. माझ्या देवीच्या चरणांना साक्ष ठेवून--( उठून जाऊं लागते तोंच )

**सत्यपाल**—पहा, पहा, पुन्हा देव, पुन्हा देव--

**सरला**--( एकदम परतून ) नाहीं, नाहीं, आलें पहा. ( कळवळून) चुकले बरं देवा, अजूनसुद्धां चुकेन बरं थोडी कधीं कधीं ( जवळ जाऊन सत्यपालांना बिलगून बसते. )

**सत्यपाल**--( गंभीरतेनं सरले, तुझं हें असं क्षणक्षणाला विसंगत वागणं नी बोलणं पाहिलं कीं, आतां मला काय वाटतं—! सांग सरले, तुझ्या मनांत काय आहे ? कां असं होतं तुला ?


**सरला**—कुठं काय आहे आतां ? ही जवळ नाहीं कां मी ! ( अधिक ज़वळ बिलगते. )

**सत्यपाल**—आतां आहेस पण दुसऱ्या क्षणाला काय करशील—तें कांहीं नाहीं. आज कोर्टांतून मी परत आलों कीं, सरले, तूं नी मी असं एकटं बसूं; (तिला अगदीं जवळ कुरवाळून घेतात.) नी सरले, त्यावेळीं—

( नारायण येतो. )

**नारायण**—साहेब खालीं ऑफिसांत पोलिसवाले आले आहेत.

**सत्यपाल**—हो. आजच्या त्या खुनाच्या खटल्याबद्दल—हं ठीक. बरं आलों खालीं ( नारायण जातो. ) सरले, कांहीं म्हण तुझ्या मनाची अवस्था



**सरला**—तुमच्या नव्हें? हे काय आहे?

( पान ६८ )

आज संध्याकाळीं कोर्टांतून आल्यावर तूं आपलं मन माझ्याशीं मोकळं करणार नाहींस का ? तसं मोकळं केल्यानं, मी सांगतों कीं, तुला खास बरं वाटल्यावांचून राहणार नाहीं. असंच ना ? येऊं ना मी ?

**सरला**—( सत्यपालांकडे कांहीं वेळ स्थिर दृष्टीनं पहात ) बरं.

**सत्यपाल**--सच् अ गुड गर्ल. दॅटस् ऑल राईट. ( तिच्या पाठीवर हात फिरवून जातात. )

**नारायण**--( प्रवेश करून ) ताई, ताई, ताई.

**सरला**--काय रे नारायण ?

**नारायण**--कांहीं नाहीं, एक बाई आपल्याला भेटायला आल्या आहेत.

**सरला**—त्यांना विचार, अगदीं जरूरीचं काम आहे का ?

**सुशिला**-- ( एग्दम प्रवेश करून ) होय. नाहीं तर मी उगीच आपल्याला कधींही त्रास दिला नसता. ( दोघींची दृष्टादृष्ट होते. दोघीही एकमेकींकडे पहात रहातात. नारायण जातो. )

**सरला**--बाई, तुम्ही कोण अहांत ? त्या दिवशीं दिसलांत, तेव्हांपासून मी तुमचा चेहेरा विसरलें नाहीं. अन् तें बाळ ! कसं हो ओढून नेलत अगदीं माझ्याजवळून ? त्याचे डोळे अद्याप बघताहेतसं वाटतं. कुठं आहे तें ? मला दाखवाल का ? मला त्याचं गॉडमदर व्हायचं आहे. गॉडमदर म्हणजे काय तुम्हांला माहीत नाहीं ? आई होणं. विलायतेंत जन्मदात्या आईशिवाय आणखी एक आई असते. तिला गॉडमदर म्हणतात. खरंच, हो मला त्याची आई व्हायचं आहे. हें काय ? तुमच्या डोळ्यांत पाणी आलं (जवळ जाऊन ) अहो मी त्याची आई झालें तरी तुमच्याजवळून कांहीं त्याला न्यायची नाही हो ! तुमच्याजवळच तो राहील बरं. होऊं ना मग मी त्याची आई ?

**सुशिला**--कोण कुणाची आई होणार ?

**सरला**०--कां बरं, मी त्याची आई होणार. आई होणार नाहीं असं का तुम्हांला वाटतं !

**सुशिला**—तुम्ही आई होणार नाहीं ? असं कसं होईल ? पण आतां—

सरला--हें काय बाई, तुम्ही गडे अधिकच रडूं लागलात ? तुम्हाला वाईट वाटत असेल तर नाहीं बरं होत मी आई. ( डोळे पुसते )

सुशिला—नकाहो असं बोलूं. तुम्ही आईच आहांत. पण आतां कुणाच्या आई ?

सरला—कां बरं, तुमच्या बाळाच्या.

सुशिला—माझ्या बाळाच्या ! आतां कुणाचं बाळ ! ते बाळ आतां माझं नाहीं, तुमचं नाहीं. तें--

सरला—( अधिरतेनं ) मग कुणाचं ?

सुशिला—देवाचं.

सरला—नका नकाहो असं बोलूं. कुठं आहे तें ? काय झालं त्याला ?

सुशिला—एका मनुष्यानं संतापाच्या-दारूच्या धुंदींत--

सरला—बोला लवकर काय झालं तें ?

सुशिला—त्याचा खून केला ?

सरला—( सुशिलेचा हात धरून ) त्याचा खून ? त्या बाळाचा खून ? कोण चांडाळ--

सुशिला—माझे पति, त्याचे वडील.

सरला—( सुशिलेला पोटाशीं धरून ) अगं आई गं. तुमचे पति, त्याचे वडील--( थोडा वेळ दोघी स्तब्ध होतात )

सुशिल--( वर मान करून ) बाई मी तुमच्याकडे आलें--

सरला—नकाहो बोलूं. अगदीं स्वस्थ इथं पडा. तुमचं हृदय तिळतिळ तुटत असेल हो. मी तुमची आई आहे बरं.

सुशिला—( तशीच पडून ) अहाहा, देवा, किती थोर हृदय आहे हे. तूंच, तूंच देवा, मला भेटलास रे ! ( डोके ठेवून डोळे मिटते. )

सरला—बाई, तुमचं काळीज कसं धडधडतं आहे !

सुशिला—( उठून ) आतां कसं अगदीं धीर आल्यासारखं वाटतं. ( उघड ) मला क्षिनी आतां इथं थांबतां येत नाहीं. मला कोर्टांत लवकर हजर झालं पाहिजे. सरलाताई--

सरला--काय ? माझं नांव तुम्हांला ठाऊक आहे ? मग तुम्ही कोण ?

सुशिला—मी ? मी तुमची भावजय.

सरला--( एकदम दूर होऊन ) माझी भावजय ? तुम्ही माझी भावजय ?

सुशिला--अशा दचकूं नका. सरलाताई मी एक दुर्दैवी स्त्री आहे. आपले काकासाहेब माझे सासरे—

सरला--अन् त्यांचा मुलगा ?--

सुशिला--माझे पति.

सरला--आणि त्यांनीं तुमच्या बाळाचा खून केला ? अगं आईगं-( कोचावर एकदम बसते व तोंड झांकून घेतें )

सुशिला--नका, नका असं रडूं गडे. सरलाताई, मी तुमच्याकडे सहायाकरितां आलें आणि तुम्हीच जर असं—

सरला—( तिचा हात धरून ) सांगा काय करूं ते ? खरंच सांगा. वहिनी, मीही तुमच्यासारखीच एक दुर्दैवी स्त्री आहे बरं.

सुशिला--मला माहीत आहे. आणि--

सरला--( भीतियुक्त आश्चर्यानें ) तुम्हांला माहीत आहे ? काय माहीत आहे ? कुणी सांगितलं ? कां सांगितलं ?

सुशिला--अशा विलक्षण नजरेन माझ्याकडे पाहूं नका. मी सर्व कांहीं सांगायला आले आहे सगळं सांगतें. पण मग आपण माझ्यावर रागावणार नाहीं ना ? ( डोळ्यांना पदर लावते. )

सरला--( एकदम मृदु स्वरांत ) नका गडे असं डोळ्यांतून पाणी काढूं. नाहीं बरं रागावणार मी. सांगा ना. नाहीं बरं रागावणार. काय करूं म्हणजे माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वास बसेल ?

सुशिला--मी सगळं सगळं सांगते. सरलाताई, ज्याच्या खुनाचा त्यांचेवर आज खटला चालणार तो मुलगा माझा नव्हे.

सरला--( स्तंभित होऊन ) तुमचा नव्हे ? तुमच्या पतीनं-त्याच्या वडिलांनीं खून केला अस आतांच म्हणालांत ना तुम्ही ?

सुशिला—होय, माझ्या पतींनीं, त्याच्या वडिलांनीं खून केला. पण--

सरला--पण काय ?

सुशिला--( रडत ) पण त्यांच्या मुलाचा--माझ्या नव्हे.

सरला—( अधिरतेनं ) तुमच्या नव्हे--तुमच्या नव्हे.. हें काय आहे ? बोला हो लवकर.

सुशिला०—त्यांच्या आणि--

सरला--त्यांच्या—आणि ?-आणि काय ?--

सुशिला—( सरलेकडे बोट दाखवून ) तुमच्या—

सरला—खोटं, अगदीं खोटं. असं बोलून तुम्ही—

सुशिला—खोटं कसं असेल. खुद्द काकासाहेबांच्याकडूनच अकस्मात मला तुमची सगळी हकीकत कळली. तुम्ही विलायतेंत असतांना तो मेल्याचं तुम्हांला त्यांनीं कळवलं तेंच खोटं.

सरला—मग परवां—परवां ज्याला माझ्या हृदयाजवळून तुम्हीं ओढून नेलात तो-तो माझा-माझाच !—

सुशिला—होय.

सरला--देवा, देवा—(असं म्हणून कोचावर अंग टाकते व कुशनमध्यें तोंड लपवून एकसारखीं रडूं लागते. )

सुशिला--( तिला जवळ घेऊन ) सरलाताई, सरलाताई !

सरला—नको, मला कांहीं नको. तो संसार नको, तें प्रेम नको. त्या अनाथ लेकराचा गळा कापला—नीच, निर्दय--

सुशिला—नीच, निर्दय. नाहीं हो माझ्यानं ऐकवत.ते पापी आहेत. परमेश्वराचा भयंकर अपराध त्यांनीं केला आहे. पण ते पापी असले, निर्दय असले, नीच ठरले तरी ते माझे पति आहेत. एखाद्या भयंकर शिक्षेला ते पात्र असले तरी त्या शिक्षेचा उच्चार कृपाकरून माझ्यासमोर करूं नका.

सरला—मग मी काय करूं ? कुणाला शरण जाऊं ! देवा, देवा, कुठं आहेस ! कुठं आहेस रे देवा तूं ? काका, काका, तुम्हीतरी देवासारखे या हो.

सुशिला—सरलाताई, काकासाहेब इथं असते तर तुमच्या अंतःकरणाला मी दुखवलं असतं का ? पण काय करूं ? त्याला सुरक्षित खात्रीच्या ठिकाणी ठेवायचा म्हणून चांगली सोय लावण्याकरितांच काकासाहेब कानपुराकडे गेले आहेत. पण इकडे यांनीं त्या बाळाचा, तुमचा--माझा

सर्वांचा गळा कापला. सरलाताई, सुधाकराला मीं जन्म दिला नसला, आतड्याची माया जरी माझ्याजवळ नसली तरी अनाथस्वरूपी परमेश्वर, म्हणून माझ्या हृदयांत त्याला मी स्थान दिलं होतं.

**सरला**—इतकं असून असं कसंहो झालं वहिनी ?

**सुशिला**— कसं झालं ? मी—ही दुर्दैवी चांडाळीण त्याला कारण. सरलाताई, त्यांची ती खुनशी नजर त्या बाळावर एक सारखी खिळलेली असे. ती पाहून एक दिवशीं मला संताप आला. तो सर्व पूर्वेतिहास माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. आणि--आणि संतापाच्या भरांत माझ्या तोंडून तो बाहेर पडला. कशीहो मी अशी ! आमच्यामुळें एका निराप-राध अर्भकाचा शेवट, निरापराध सच्छील आईचा--तुमच्यासारख्या साध्वी स्त्रीचा--

**सरला**—( कानावर हात ठेवून ) मी निरापराध ! मी साध्वी ! तुम्ही असं म्हणतां ?

**सुशिला**--होय. ( तिच्या खांद्यावर हात ठेवून निश्चयानें ) मी कां असं म्हणूं नये ? सरलाताई, जग कांहींहीं म्हणो, परंतु स्त्रीहृदयांतला परमेश्वर, निरपराध साध्वी म्हणून या अल्लड सुकुमार फुलाला वर उचलून हृदयाजवळ घेतल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं बरं. ( सरलेला एकदम सुशिला आपल्याजवळ घेते. )

**सरला**—अहाहा ! या जगांत परमेश्वर नाहीं असं मी कसं म्हणूं ? वहिनी, तुमचं हृदय किती थोर आहे. सांगा तुमचे उपकार मी कसे फेडूं ?

**सुशिला**--माझे उपकार कसले ? सरलाताई, उलट माझ्यावरचं उपकार करा, माझं सौभाग्य कायम ठेवा म्हणून भीक मागण्याकरतां मी तुमच्याजवळ आलें आहे.

**सरला**--मी, अन् तुमचं सौभाग्य कायम ठेवणार !

**सुशिला**--सरलाताई, त्यांच्यावरचा हा खुनाचा खटला आजच हायकोर्टांत चालणार आहे, आणि सरकारतर्फे वकील म्हणून आपले पति काम चालवणार आहेत. फिर्यादीपक्षानं गुन्ह्याचं स्वरूप कमी केलं तर त्यांचें प्राण वांचण्याचा संभव आहे. आपले पति सरकारी वकील आहेत. त्यांचं वजन फार मोठं आहे; त्यांनीं जर मनावर घेतलं तर गुन्ह्याचं स्वरूप

कमी दाखवतां येणं शक्य आहे. सरलाताई, या दुर्दैवी स्त्रीकरतां आपल्या पतीजवळ तुम्ही दोन शब्द बोलाल का ?

**सरला**--नाही,नाहीं. दुसरं काय वाटेल तें सांगा पण एवढं करायला सांगूं नका ?

**सुशिला**--सरलाताई, माझ्यावर एवढी दया-

**सरला**—वहिनी, माझं स्वतःचं असं काय वाटेल तें मागा, मी देण्यास तयार आहें. द्रव्य-माझे प्राण मागा मी द्यायला तयार आहें. पण त्यांच्याजवळ बोलायला सांगू नका. वहिनी तुम्ही मला कोणत्या संकटांत टाकीत आहां याची तुम्हाला कल्पनाही नाही हो.

**सुशिला**—तुमच्या एकंदर संकटाची जाणीव मला झाली नाहीं असं का तुम्हांला वाटतं ? तुमची अब्रू रक्षण व्हावी म्हणून खालच्या कोर्टांत सुधाकर माझा मुलगा होता असं नाहीं कां मीं सांगितलं ?

**सरला**--( उठून ) काय, असं सांगितलं तुम्ही ? असं सांगितलंत ? ( तिच्या पायाजवळ नम्र होते. ) बाई तुम्ही अहांत तरी कोण ? तुमची एकेक कृती पाहिली कीं तुम्ही शापभ्रष्ट देवताच अहात कीं काय अस वाटूं लागतं.

**सुशिला**--छे, छे, भलतंच. मी कसली देवता. मीही तुमच्याप्रमाणें एक स्त्री आहें. सरलाताई तुमच्या मनाला यातना होतात; नका तुम्ही बोलूं बरं त्यांच्याशीं. मीच तुमच्या पतींचे पाय—

**सरला**—नकाहो त्यांचेजवळ कांहीं बोलूं. त्यांना कसं वाटेल, कितीन् कसं दुःख होईल—बाई, याच्याशिवाय दुसरा एखादा उपाय नाहीं का ?

**सुशिला**--दुसरा एखादा उपाय असता तर मी इथं आलेंच नसते. सुधाकर माझा मुलगा आहे असं शेवटपर्यंत म्हणत राहिल्यानं भागलं असतं तरी सुद्धां मी आलें नसतें. सरलाताई, कसं सांगू मी तुम्हाला, या सर्व गोष्टी, तुमच्या आमच्या हातीं आतां राहिलेल्या नाहींत. ह्या खुनाच्या खटल्यांत हा सर्व पूर्वेतिहास त्यांनीं तात्या दलाल नांवाच्या आपल्या मित्रास सांगितला आणि त्या दलालानं तो जसाच्या तसाच त्यांच्या वकीलांना-बॅ. त्रिकमचंद वगैरेंना सांगितला आहे. स्वतःच्या बायकोबद्दलचा सूड उगवण्याच्या बुद्धिनंच आपले पति गुन्ह्याचं स्वरूप

मुद्दाम मोठ करीत आहेत हें दाखवण्याकरितां, तुमचा सर्व पूर्वेतिहास कोर्टापुढं मांडण्याचीही त्या सर्वांची तयारी दिसली. तसं होऊं दिलं तर एका निरपराध स्त्रीची अब्रू चवाट्यावर येऊं दिल्याचं पाप माझ्या माथीं बसणार. सरलाताई आपली सर्वांची अब्रू व माझ्या पतीचे प्राण, हीं दोन्ही जर रक्षण करायची असतील, तर आपल्या पतीचे पाय धरण्या-शिवाय दुसरा उपायच नाहीं.

**सरला**—प्राण गेला तरी ते सत्याला चव्हाट्यावर आणल्याशिवाय कधींही रहावयाचे नाहींत.

**सुशिला**—सरलाताई मी स्त्री आहें. स्त्रीहृदय कसं असतं हें आपणही जाणतां. मी जिवंत आहें तोंपर्यंत माझ्या पतीच्या प्राणांचा प्रश्न कसा विसरूं?

**सरला**—मग मी करूं तरी काय? बाई, बाई माझ्यावर आकाश कोसळलं हो. आतां कुठं आणि कसं ठिगळ लावूं? त्यांना हें करायला सांगायचं म्हणजे स्वतः घडवलेल्या सुंदर, प्रेमळ, सात्विक व तेजस्वी देव-मूर्तीचा, स्वतःच्याच हातांनीं भंग करा म्हणून निर्दयपणं सांगण्यासारखं नाहीं कां? (हात जोडून) देवा, आपण जसे सर्वशक्तिमान तसे दया-सागरही आहांत. माते, माझ्यावर आपल्या दयामृतानं सिंचन करून हें मूर्तिभंगाचं करुण चित्र माझ्या दृष्टीआड कराहो. (कोचावर तशीच पडते)

**सुशिला**—सरलाताई, सरलाताई उठा. तुमचा हा करुणविलाप माझ्या आंतड्याला पीळ पाडतो आहे. यापुढं मी तुम्हाला कोणतीच विनंति करीत नाहीं. आपल्या पतीच्यासमोर बोलण्यास मला धीर होणार नाहीं असं वाटलं म्हणून सर्व हकीकत जशी मला माहीत आहे तशी या पत्रांत लिहून मीं आणली आहे. ही घ्या अन् तुम्हाला योग्य दिसेल तें करा. तो परमदयाळु ईश्वरच तुम्हाला योग्य मार्ग दाखवील.

**सरला**—तुम्ही जातां? मला एकटीला टाकून—(उशींत डोकं ठेवून रडते.)

**सुशिला**—(तिच्या डोक्यावर हात फिरवीत) मला उशीर झाला. मला आतां कोर्टांत हजर झालं पाहिजे. मी गेलें, सर्व जगतानं जरी तुमचा त्याग केला तरी तो सर्व शक्तिमान् परमेश्वर तुमच्या पाठीशीं आहे अशी दृढ श्रद्धा ठेवा. येतें मी (जाते. सरला त्याच स्थितींत पडलेली असते.)

नारायण--( प्रवेश करून ) ताई, ताई, ताई ?

सरला--( न उठतांच ) नारायण, जेवणं झालं कां रे ?

नारायण--अर्धा तास झाला बाई साहेबांना जेऊन.

सरला--अर्धा तास झाला ?

नारायण--आपली दोनदां आठवण काढली. पण कोणी बाई भेटायला आल्या आहेत म्हणून सांगितलं.

सरला--काय करताहेत आतां ?

नारायण—कपडे घालीत होते. कोर्टात जायला निघाले असतील. इकडेच येताहेतसं—हो आलेच.

सरला—तूं जा आतां, मी मग जेवीन बरं. ( नारायण जातो. सरला खालीं पहात टाइम्स चाळते.) सेन्सेशनल मर्डर केस. सुंदरराव पंडीत चार्ज्ड वुइथ अ मर्डर ( शून्य दृष्टीनं समोर बघते. सत्यपाल प्रवेश करून )

सत्यपाल—( इकडे तिकडे कांहीं तरी शोधीत ) काय ? गेली का भेटायला आलेली मंडळी ? छत् नाहींच सांपडत.

सरला—( न वळतांच ) काय पाहिजे ?

सत्यपाल--माझी मनीबॅग कुठं ठेवली माहीत आहे ? खरंच माझ्यासारखा बंगलर मीच बुवा.

सरला—( उशाखालची बॅग देऊन ) ही घ्या.

सत्यपाल--( आश्चर्यानं ) कुठं सांपडली ?

सरला--त्याच्यांत बऱ्याच नोटा आहेत म्हणून बजावून आपणच नाहींत का मला ठेवायला दिलीत ?

सत्यपाल--जस्ट लाइक मी. खरंच तुझ्याशीं लग्न केलं नसतं तर माझं कसं होतं कोण जाणे. थँक गॉड, यू आर माय् वाइफ्. ( तिचे हात धरून आपल्या हातांत घेऊन तिच्या गालावर टिचकी मारतात.)

सरला--( खालीं पहाते. ) आर यू शूअर, यू आर ग्रेटफुल टु गॉड ?

सत्यपाल—डाउट इट अँड सी हौ आय पनिश यू. ( हनुवटी उचलून तिला जवळ ओढतात. सरला दुसरीकडे बघते. ) चला, बायकांच्या मोहांत फार वेळ राहूं नये. फारच उशीर झाला.



सत्यपाल वृत्ति बधीर झाल्यासारखे उभे राहातात. (अंक ४ पान ७४)

**सरला**––( हात धरून गंभीरतेनं ) जेवण नीट झालं का ?

**सत्यपाल**––या गंभीर चेहेऱ्यावरून मी जेवलों नसावा असंच आपल्याला वाटतंय ? तुझ्या हातचा प्रेमाचा घांस पोटांत गेल्याशिवाय पोट भरतच नाहीं अशी तुझी समजूत आहे कीं काय ?

**सरला**––कुणाला ठाऊक ? प्रेमाशिवाय सर्व व्यर्थ आहे असं नेहमीं म्हणायचं असतं.

**सत्यपाल**—प्रेम श्रेष्ठ आहे. नाहीं कोण म्हणतो. पण संसार म्हणजे कांहीं प्रेमच नव्हे.

**सरला**—मग प्रेमाशिवाय सारं कांहीं व्यर्थ तें काय ? प्रेमाहून ही श्रेष्ठ–

**सत्यपाल**––सत्य. कां, इतकं दचकायला काय झालं ? आपल्या प्रेमाबद्दल नव्हतों मी बोलत. हें काय, गंगायमुनांना पूर उन्हाळ्यांत येतो. इथं तर प्रेमाची शीतलता आहे.

**सरला**—पण बेअब्रूमुळं तिचं रखरखीत उन्हांत रूपांतर होतं.

**सत्यपाल**—बेअब्रू—?

**सरला**—नाथ––( न बोलतां उभी रहाते. )

**सत्यपाल**—हें काय ! काय होतंय ! ओठ कां कापताहेत ? अशी काय चमत्कारिक बघते आहेस ? हें पहा, एकदां खूप पण चटकन रडून टाक पांहू. हें तुझं नानातऱ्हेचं गुदमरणं मला बघवत नाहीं. ( तिला जवळ ओढून घेतात. )

**सरला**––देवा, आपल्या बेअब्रूचा प्रसंग आजच आला आहे.

**सत्यपाल**–– माझ्या ?

**सरला**––आपल्या परिचयाच्या माणसांविषयींच––

**सत्यपाल**––इनफ् ऑफ धिस क्रुएल जोक. आय् कॅन् हॅव नो मोअर ऑफ इट्.

**सरला**––थट्टा ! आपल्या जिवलग माणसांकडून थट्टा–( रडूं लागते )

**सत्यपाल**––सरले, हा काय प्रकार आहे ! कम्, आउट् वुइथ इट; क्विक.

**सरला**––प्रत्यक्ष आपल्या––

**सत्यपाल**––( तिला दूर करून दोन्ही हातांनीं तिचे दंड धरून व

तिच्या चेहऱ्यावर आपली दृष्टि खिळवून ) लवकर बोल. इटीज क्रुएल् टु कीप मी इन सस्पेन्स.

**सरला**--हें वाचा. ( घाबरून टाइम्सचा अंक देते. )

**सत्यपाल**--मर्डर केस. सुंदरराव पंडित चार्ज्ड वुइथ ? मला माहीत आहे ही केस. आजच मी ती चालवणार आहें. ( सरला सुशिलेनं दिलेलं पत्र मुकाट्यानं पुढें करते ) हे काय ? ( सत्यपाल ते भराभर वाचण्यास सुरवात करतात.) काय ? सुंदरराव पंडित म्हणजे काकासाहेबांचा मुलगा ? ( पुढं वाचीत असतांना सरलेनें एका हातानं कोच धरला असून दुसरा हात पुढं केला आहे; तिच्या गालावरून अश्रु येऊन ते तसेच खाली पडत आहेत. सत्यपालांच्या मुखाकडे तिची दृष्टि मात्र निश्चलतेनं लागली आहे व तिच्या चेहऱ्यावर भीतियुक्त आतुरता पसरली आहे. पत्र वाचन संपल्यावर सत्यपाल तिच्याकडे पहातात. )

**सरला**—खरा, प्रत्येक शब्द खरा आहे.

**सत्यपाल**—प्रत्येक शब्द खरा आहे ? प्रत्येक शब्द ?

**सरला**—परमेश्वरसाक्ष प्रत्येक शब्द खरा आहे, सत्य आहे.

**सत्यपाल**--( पाठीमागें खुर्चीला टेकतात. एका हातानं पत्र घट्ट दाबतात, दुसरा हात कपाळावरून केसावर नेत सद्गदित स्वरानं ) हर, हर, भगवान् प्रभो ! ! ( सत्यपाल वृत्ति बधीर झाल्यासारखे उभे रहातात. त्यांना असं पाहून ).

**सरला**--( एकदम त्यांच्या पायाजवळ पडून ) देवा, देवा, काय झालं हो हें !

**सत्यपाल**-(स्वगत) बाबा-( वडलांच्या फोटोकडे टक लावून बघतात.)

**सरला०**--नका हो नका. अशा करुण वाणीनं मामंजींना हाक मारूं नका. अशा करुण दृष्टीनं त्यांच्याकडं बघूं नका. नाहीं हो मांझ्यानं आतां सहन होत कांहीं. बोला, आपल्या तोंडून पडणाऱ्या शब्दाकरितां माझा जीव तळमळतो आहे. देवा, एकदा तरी बोला हो. नाहीं हो माझ्यानं आतां बोलवत ( दोन्ही हातांत तोंड धरून रडूं लागते.)

**सत्यपाल**--( स्वगत ) सत्य दूर आहे तोंपर्यंत सर्वच घमेंड मारीत असतात. परंतु सत्याचं प्रत्यक्ष दर्शन–बाबा, बाबा, तुमचा चेहरा मला

बजावतो आहे कीं, " बाळा, ईश्वर तुझ्या श्रद्धेची परीक्षा घेतो आहे. " सत्यस्वरूपी भगवंता, आपला अंश माझ्यांत आहे अशी जर माझी दृढ श्रद्धा असेल-( निश्चयानं ) परमेश्वरा, मी शब्दांचा उच्चार करीत नाहीं-( एकदम पुढं होऊन ) सरले—?

**सरला**--( खोल आवाजांत ) अहाहा, देवा, आपले उपकार मी कधींहि विसरणार नाहीं बरं. ( त्यांच्या पायाजवळ मूर्च्छित पडते. )

**सत्यपाल**--सरले, सरले, हें काय ? हिला फिट् आलेली दिसते. सरले, बाळ नकोग असं करूंस; नारायण,नारायण; सरले ऊठ, मी तुझ्यावर रागावलों नाहीं बरं. पण तुला कसं सांगू मला काय होत होतं तें. ऊठ, माझ्याशीं एकदां तरी बोलग. देवा, आतां काय करूं ? नारायण, नारायण ( नारायण येतो ) जा, जा, लवकर डॉक्टरांना बोलावून आण. बाईना फिट् आली आहे. जा पळ. (नारायण जातो) सरले, मी तुझ्याशीं बोललों नाहीं म्हणून रागावलीस होय? नको ग रागावूं. क्षणमात्र मला भान नाहींसं झालं. थांब मी तुला पाणी देतो. पाणी नारायण-पाणी—( काकासाहेब प्रवासाच्या पोषाखांत प्रवेश करतात) कोण काकासाहेब ? थँक गॉड. कसे अगदीं वेळेवर आलांत. पहाहो हिच्याकडे जरा.

**काकासाहेब**--काय झालं ? सरले, सरले बाळ मी आलों आहे. सत्यपाल काय झालं हिला ? (टाइम्सचा अंक सत्यपाल देतात-काकासाहेब तो घाईनें वाचतात.सत्यपाल शेजारच्या तांब्यांतलं पाणी सरलेच्या डोक्यावर शिंपडतात. व थोडे पिण्यास देतात) काय ? मारलेलं मूल म्हणजे ?—

**सत्यपाल**—सुधाकर; आपल्या सुनेनंच आम्हांला हें सगळं कळवलं.

**काकासाहेब**--हर, हर, नारायणा, अखेर हा असा प्रसंग ? तुझी मर्जी. तीपुढं प्रत्येकानं श्रद्धेनं मान वाकवलीच पाहिजे.

**सत्यपाल**--होय, परमेश्वरीइच्छेपुढं प्रत्येकानं श्रद्धेनं मान वाकवलीच पाहिजे. ( बाराचे ठोके पडतात. सरला किंचित चळवळ करते.) काय बारा वाजले ? मला कोर्टांत हजर झालंच पाहिजे. सरले ? थँक गॉड. ही शुद्धीवर येते आहेसं दिसतं. ही शुद्धीवर आली म्हणजे हिला सांगा मी रागावलोनाहीं तुझ्यावर-( काकासाहेबाकडे पाहून ) काकासाहेब, आजची ही केस-या वयांत आपल्यावर आलेला हा प्रसंग-यांत परमेश्वर

खरोखर आपली कसोटीच पहात आहे म्हणायचं. पण मीं आता जातोच. (घाईनं जातात. काकासाहेब एक श्वास सोडतात–इतक्यांत सरला चळवळ करते).

**काका०**––सरले, बाळ उठ. नारायण, (नारायण येतो) पाणी दे पाहूं चट्दिशी. (पाणी देतो तें तोंडांत घालतात. टेलिफोनची घंटा होते.) (नारायण जातो) सरले ऊठ. मी आलों आहे ना (ती थोडी अधिक चळवळ करते) हें असं, हे घे थोडं पाणी–(पाणी पाजतात). (नारायण येतो.)

**नारायण**––त्या पाहा आणखी हातपाय हालवूं लागल्या आहेत.

**काका०**––तूं जा आणि गरम दूध घेऊन ये पाहूं चट्दिशीं. (नारायण जातो) सरले, बाळ हें बघ मी आलों आहे ना! ओळखलंस का मला तूं? (पाणी पाजतात) बघ, बघ, मी आलों आहे बाळ. हा इथं आहें बघ तुझ्याजवळ (ती डोळे उघडते व इकडे तिकडे बघते) देवा–(तिला घट्ट पोटाशीं घेतात. त्यांच्या डोळ्यांत पाणी येतं) बाळ, ओळखलंस कां मला तूं?

**सरला**––काका! तुम्ही! कसे हो अगदीं देवासारखे आलांत तुम्ही काका! (त्यांच्यां गळ्यांत पडते.)

**काका०**––उगी, उगी बाळ, मी आहें ना आतां तुझ्याजवळ!

**सरला**––(एकदम उठून) तुम्ही अहांत? पण ते कुठं आहेत! कुठं गेले! (इकडे तिकडे भरकन् पहाते) कुठं गेले! सांगा ना काका?

**काका०**––बारा वाजले तसं कोर्टांत जायलाच पाहिजे म्हणून गेले. मला सांगून गेले. आतां येतील बरं ते. पड पाहूं तूं जरा––

**सरला**––कोर्टांत जायला पाहिजे म्हणून गेले! कोर्टांत जायलाच पाहिजे? एकटे गेले? तिथं एकटेच रहाणार? नाहीं, असं कसं होईल? जातें मी–काका, काका, अशा स्थितीत ते एकटे, मी जिवंत असतांना एकटे! नाहीं थांबणार–जाणार मी. (धावत जाते.)

**काका०**––(तिच्यामागें धावत) सरले, हे काय? सरले, थांब, थांब–मी आलो (जातात).

— अंक चवथा समाप्त. —

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला.

( स्थळ—हायकोर्ट; शंकरराव कारकून व गोपाळ कारकून एक कागद वाचीत आहेत )

**गोपाळ**—कायरे शंकर, आजच्या खुनाच्या खटल्यांतील हा प्रकार म्हणजे भयंकरच दिसतो.

**शंकर**—असेल भयंकर. पण त्याऱ्याबद्दल इतकं वाईट कशाला वाटून घ्यायला हवं ! अरे या त्रिकमचंदाची कारकुनी करून मला चार वर्षें झालीं. अं, असले प्रकार त्यांच्या वकिलींत नित्याचेच. मला नाहीं वाटत त्याचं आतां इतकं.

**गोपाळ**—चार नाहीं दहा वर्षे झालीं तरी असला प्रकार पाहून केव्हांही संताप--

**शंकर**—चूप. मोठ्यानं बोलूं नकोस. अरे तूं आपल्या तात्यांच्याजवळ दलाली अशीच का शिकणार ? त्यांच्या एकेक कारवायापुढं ही गोष्ट म्हणजे किस झाडका पाला !

**गोपाळ**—खरं काय ? का रे पण सुंदररावांनीं हा लेखी जबाब खरोखर दाखल करायचं ठरवलं आहे काय ?

**शंकर**—अं, तो काय ठरवणार ? दारूमुळं त्याच्या मेंदूत अक्कल शिल्लक असेल तर ? ही सगळी आपल्या तात्या दलालाची चिथावणी.

**गोपाळ**—पण आरोपी सुंदररावाची नी याची ओळख कुठली ?

**शंकर**—अं, आहे तशीच दाट मैत्री. दोघंही दारूबाज. शिवाय इतर गोष्टी; जाऊं द्या. अरे व्यसनी माणसं चटकन एकमेकांजवळ येतात.

( केशवराव हायकोर्ट वकील प्रवेश करून )

**केशव०**—गोपाळ तें लांबलचक टाईप केलेलं काय आहे रे ? लेखी आर्ग्युमेंट आहे वाटतं ?

**शंकर**—कांहीं नाहीं. त्रिमकचंदांनीं काम सांगितलं होतं. आणलं आहे तयार करून.

**केशव०**—हा रे कोण ? आपल्या गांवचा गोपाळ नाहीं का ? वा, इथं कधीं आलास ?

**गोपाळ**—महिना दोन महिने झाले.

**शंकर**—मुंबईस धंदा करायला आला आहे. सध्यां बालकिसनदास ॲडव्होकेटांच्याकडे शिकतो आहे कारकुनाचं काम. पुढें तात्यांकडे दलालीही शिकण्याचा विचार—

**केशव०**—काय दलाली ! आणि तीही त्या पाजी माणसाजवळ शिकणार?

**गोपाळ०**—कां बरं ? त्यां.. तर कबूल केलं आहे आपल्या हाताखालीं घ्यायचं.

**केशव०**—अरे, पण कोंकणांत मरत कां होतास अन्नावांचून म्हणून इथं हा धंदा करायला आलास ?

**शंकर**—हे पहा केशवा, दलालांच्यावरचा हा तुझा नेहमींचा संताप पाहिला कीं, मला आतां खरोखरच हंसूं येतं. दलालाला दूर ठेवून काय मिळवलंस अद्यापपर्यंत बाबा ? चार वर्षं झालीं तुला वकिली सुरूं करून शंभर रुपड्या तरी मिळवतोस का ?

**केशव०**—हें पहा शंकर, मेलों तरी चालेल पण वकिली करीन ती त्या दलालांना चार हात दूर करून–अरे या दलालांना कांहीं कॉन्शन्स ?

**शंकर**—केशवा, तुला खरं सांगू ? तूं मास्तर व्हायला लायक आहेस. म्हणे कॉन्शन्स ? कशाला रे झालास वकील ? प्रामाणिकपणा ठेवायचा असेल, तर ही वकिली सोड आणि मास्तर हो. मर मग त्या टाईम स्केलमधें.

**गोपाळ**—का रे दलाली इतकी वाईट आहे ?

**केशव०**—वाईट ? ह्या दलालांचीं एकेक कृत्यं पाहिलीं कीं, असं वाटतं–

**शंकर**—हं, काय वाटतं ? होऊंच द्या वर्णन. अरे मूर्खा, पैसा मिळतो आहे ना दलालीत गबर ? ह्या तात्यांचंच घे उदाहरण. हे त्रिमकचद बालकिसनदासासारखे वृद्धकपी आपल्या फीतून शेंकडा पन्नास कमिशन देतात त्यांना. आमच्या मंडळांत तात्यांचं नांव " फिफ्टी परसेंट " पडलं ते त्यामुळेंच. ते कांहीं नाहीं. आपलं एक तत्त्व आहे. पैसा देईल तो धंदा उत्तम.

**केशव०**—तसं म्हणशील तर मी कोणताच धंदा वाईट समजत नाहीं;

आमच्या वकिलीच्या धंद्यांत तुझ्या मालकासारखीं रत्न आहेतच कीं नाहींत ? पण हे दलाल म्हणजे एकंदरींत कांहीं विचारूं नकोस. त्यांतल्या-त्यांत हा आपला तात्या-जाऊंदे, त्याचं नांव घेण्याचा सुद्धां मी विटाळ मानतों.

**शंकर**—काय केलं आहे रे तसं त्यांनीं तुझं ?

**केशव०**—माझं काय करतो तो म्हणा ? मी तर तो आमच्या गांवचा असून देखील त्याला जवळ करीत नाहीं क्षणभर. माझं सोडून दे, पण हा गोपाळ त्याच्या संगतींत रहाणार म्हणतोस—?

**गोपाळ**—खरं आहे बाबा तूं म्हणतोस ते. नुक्ताच अनुभव आला आहे मला. शंकर, तूं काय उगीच बोलतोस ? आतांच तो सुंदररावाचा जबाब—

**शंकर**—चूप. बालकिसनदास काय म्हणतील ? आपल्याच मालकाची वकिलींतलीं रहस्यं कारकुनानींच अशी चव्हाट्यावर आणायचीं म्हणजे काय ?

**केशव०**—आतां नवीन काय अशीं त्यांचीं रहस्यें बाहेर पडायचीं आहेत ?

**शंकर**—आमच्या त्रिकमचंदाना शिव्या देतोस नी उठल्या सुटल्या त्या सत्यपालांची स्तुती करतोस ? स्वतःची स्तुतिस्तोत्र गायला, तुला काय त्यांनीं भाट ठेवला आहे काय ?

**केशव०**—मुद्दाम कशाला कुणी कुणांचं भाट व्हायला पाहिजे ? गुणी माणसाचं कोणीही भाट होईल. शंकर, राहूं देत तुझे ते त्रिकमचंद बाजूला; पण परवां दोन अपिलांत सत्यपालांचं अर्ग्युमेंट ऐकलं, बस्, दिलखुष आहे आपला. अन् किती तरुण आहेत ! ही इज अ रीयल ॲडव्होकेट जनरल. काय करावं, अशा माणसाजवळ जर काम करण्याची संधि मिळेल—

**गोपाळ**—बाकी शंकर, आज मात्र सत्यपालांची खरी परीक्षा आहे या तात्याकडून—

**शंकर**—अरे मूर्खा चूप. तो पहा तुझा काका आला.

**केशव०**—( स्वगत ) सत्यपालांची परीक्षा ? या तात्या दलालाकडून ?

**गोपाळ**—केशव चल तूं तिकडे-मी सांगतों त्या बदमाषांचं कारस्थान.

( जातात. त्रिकमचंद, बालकिसनदास व तात्या येतात. )

**दलाल०**—सत्यपाल अद्याप कोर्टांत आले नाहीत त्याअर्थी सुशिलेनं त्यांच्यापर्यंत मात्रा पोहोंचवली खास. आज तो चारीमुंडे चीत होणार.

मजा उडणार नी काय. अं, तुम्हां आम्हांला काय ? सुंदरराव फासावर जावो नाहींतर—सरला-सत्यपालांची बेअब्रू होवो. थोडी मजा आली म्हणजे झालं.

**बालकिसनदास**—त्या सुंदररावाला नीट पढवलं आहेना ?

**दलाल०**—त्याची अगदी काळजी नको. पण सत्यपाल अद्याप कसे आले नाहींत ?

**त्रिकमचंद**--ते पहा सत्यपाल-जज्ज वगैरे आलेच. ( सर्व येतात आप-आपल्या जागीं बसतात. कामास सुरवात. )

**सत्यपाल**—माय लॉर्ड, मला इथं येण्यास थोडा उशीर झाला, याबद्दल मी फार दिलगीर आहें. ज्यूरींतील सद्गृहस्थहो आज ज्या गुन्ह्यासंबंधीं आपल्याला मत द्यायचं आहे तो गुन्हा आमच्या मतें आरोपी सुंदरराव यांनीं केला आहे. त्यासंबंधी जो जो पुरावा या क्षणापर्यंत माझ्याहातीं आला आहे तो सर्व मी आपणांपुढें मांडणारच आहें. कांहीं कारणामुळं या खटल्याला अनपेक्षित महत्त्व प्राप्त होणार आहे. आपणांस माझी इतकीच विनंति आहे कीं, कायद्याच्या प्रश्नाखेरीज इतर ज्या गोष्टी आपणासमोर मांडल्या जातील त्याचा आपण विचार करून आपलं मत निर्भीडपणें द्यावं. व्यक्तिविषयक दर्जा, अब्रू वगैरे गोष्टींना यत्किंचितही महत्त्व देऊं नये. बाहेर सब इन्स्पेक्टर असतील त्यांना बोलाव. (चपराशी जातो.)

**बालकिसनदास**—काय हो, व्यक्तिविषयक मान अब्रू-काय आहे तरी काय घमेंडखोराचा बेत !—

**त्रिकमचंद**—कांहीं कां असे ना. येऊंच द्या त्याला आतां रणांगणांत. पाहून घेऊं काय तें. ( सब्-इन्स्पेक्टर येतात. शपथविधी झाल्यावर )

**सत्यपाल**--या खटल्यांतील गुन्ह्याची चौकशी तुम्हीं केली काय ?

**सब्-इ०**--होय.

**सत्यपाल**—चौकशींत तुम्हाला काय आढळून आलं ते थोडक्यांत सांगा पाहूं.

**सब् इ०**—मी आरोपीच्या घरीं गेलों तेव्हां डॉक्टर मृत मुलाचें प्रेत तपासत होते. मुलाच्या गळ्यावर नखांच्या खुणा असून तेथें रक्तही निघालं होतं. आरोपी हा एका बाजूस उभा होता. त्याची पत्नी सुशिलाबाई

मुलाला मांडीवर घेऊन रडत होती. नंतर सर्वांचे जबाब मीं लिहून घेतले. आरोपीला पकडून नंतर मी ठाण्यावर नेलं.

**त्रिकमचंद**—गुन्ह्याचे वेळीं तुम्ही हजर होता काय ?

**सबइ०**—नव्हतों.

**त्रिकमचंद**—नंतर केव्हां आलांत ?

**सबइ०**—थोड्या वेळानं शेजारी बोलवायला आले तेव्हां.

**त्रिकमचंद**—आरोपी शुद्धीवर होता का ?

**सबइ०**—तो गैरशुद्धींत नव्हता.

**त्रिकमचंद**—कशावरून ?

**सबइ०**—तो प्रश्नांचीं उत्तरें समजून देत होता म्हणून.

**त्रिकमचंद**—बरं बसा.

**सबइ०**—खालच्या कोर्टांत डॉक्टरांचा पुरावा झाला आहे. तो आपण सर्वांनीं वाचून पहावा. सुशिलाबाईंना बोलवा.

( सुशिला येते व शपथ घेते.)

**सत्यपाल**—आरोपीचं व तुमचं काय नातं आहे ?

**सुशिला**—ते माझे पति आहेत

**सत्यपाल**—हें पहा, सुधाकर कसा मेला तें थोडक्यांत सांगा पाहूं.

**सुशिला**--( रडत ) यांनीं संतापाच्या भरांत त्याचा गळा जोरानं धरला म्हणून तो मेला.

**सत्यपाल**—पण त्यांना संताप यायला कारण काय घडलं ?

**सुशिला**--मला माहीत नाहीं.

**सत्यपाल**--बाई पुन्हा विचार करून सांगा.

**सुशिला**--मला माहीत नाहीं.

**सत्यपाल**---बरं, सुधाकर तुमचा मुलगा होता असं तुम्ही खालच्या कोर्टांत म्हणालात तें खरं कीं—

**सुशिला**--होय, तो माझा मुलगा होता.

**सत्यपाल**—नीट विचार करून उत्तर द्या.

**सुशिला**--(स्वगत) देवा, मला पाव नी सत्यपालांना योग्य ती बुद्धि दे.

**सत्यपाल**—बाई तुम्ही बोलत कां नाहीं ? मूल कुणाचं होतं ?

**सुशिला**—माझंच.

**सत्यपाल**—आतां अखेरचं विचारतो कीं मूल—

**चीफ जस्टीस**—मि. सत्यपाल, त्यांनीं एकदां सांगितलं ना मग ?—

**सत्यपाल**—माझ्याजवळ जो पुरावा आहे त्यावरून पहातां या बाई सत्य दडपून ठेवीत आहेत. तेव्हां यांची उलट तपासणी करायची मला परवानगी असावी.

**चीफ जस्टीस**—ओ, आय् सी ! बरं आहे चालू द्या.

**सत्यपाल**—सुधाकर तुमचा नसून दुसऱ्या कुणाचा आहे असं तुम्हीं कधीं दुसऱ्याला सांगितलं आहे का ?

**सुशिला**—नाहीं.

**सत्यपाल**—सुधाकर तुमचा नसून माझी पत्नी सरला हिचा आहे असं तरी तुम्ही कुणाला कळवलं आहे का ? रडूं नका सांगा.

**चीफ जस्टीस**—सत्यपाल, हें काय आहे ?

**सत्यपाल**—एव्हिथिंग इन् ड्यू टाईम माय लॉर्ड; सांगा बाई तुम्ही लेखी कुणाला कळवलं होतं काय ?

**सुशिला**—नाही हो नाहीं.

**सत्यपाल**—हे पहा पत्र, या पत्रांत तसं लिहिलं आहे. हें तुमच्या हातचं पत्र आहे ना ?

**सुशिला**—( पत्र पाहून एकदम ) नाहीं.

**सत्यपाल**—मग कुणाच्या हातचं आहे ?

**सुशिला**—मला माहीत नाहीं.

**त्रिकमचंद**—माय लॉर्ड आम्हांला तें पत्र पाहिलं पाहिजे.

**जस्टीस**—हो हो जरूर ( पत्र पहातात व जज्जास देतात. जज्ज पत्र वाचीत असतांना. )

**दलाल**—( एकीकडे ) अहो खेंचाना त्या सरलेला साक्षींत.

**बालकिसनदास०**—हो हो खेंचाच. थोडी मजा उडेल.

**त्रिमकचंद**—माय लॉर्ड, या पत्रांत जो मजकूर आहे, त्यावरून

सरलाबाईची साक्ष या ठिकाणीं होणं अवश्य आहे. त्यांना बोलावण्याची व्यवस्था विरुद्ध पक्षानें करायला पाहिजे.

**जस्टीस**—हें सांगण्याची जरूरीच नाहीं. ज्यांनीं हें पत्र कोर्टापुढं आणलं ते सरलाबाईना कोर्टापुढं आणल्याशिवाय रहातील असं मला वाटत नाहीं. मि. सत्यपाळ मला वाटतं या नाजूक परिस्थितीचा विचार करतां केस कॅमेरामध्यें घ्यावी.

**सरला**—( एकदम प्रवेश करून ) नाहीं. तसं करण्याची कांहीं एक जरूरी नाहीं. साक्ष भर कोर्टांत इथंच झाली पाहिजे. मला कांहीं एक गुप्त ठेवायचं नाहीं.

**जस्टीस**—मि. सत्यपाल, मला वाटतं तुम्ही यांचं मन वळवून केस कॅमेरामध्यें—

**सरला**—नाहीं. माझी साक्ष–या वेळीं आणि याच ठिकाणीं उघड झाली पाहिजे.

**जस्टीस**--सत्यपाल—

**सरला**--त्यांना विचारण्याचं कारण नाहीं. साक्ष मी देणार. या पवित्र न्यायासनासमोर मी साक्ष देणार. आपण मला प्रश्न विचारीत नसाल तर मला जें सांगायचं तें मी सांगून टाकतें. ( सत्यपालास ) आपण प्रश्न विचारणार का नाहीं ?

**सत्यपाल**--माय लॉर्ड मला माझं कर्तव्य केलं पाहिजे. हं सांगा, या खटल्यातलं मेलेलं मूल कोणाचं होतं ?

**सरला**--माझं. माझ्या कौमार्यावस्थेंत तें जन्माला आलं.

**सत्यपाल**--मुलाचा संभव कोणापासून आहे ?

**सरला**—या खटल्यांतल्या आरोपीपासून.

**सत्यपाल**—आतांपर्यंत मूल कुठं होतं ?

**सरला**—माझे मामा काकासाहेब यांनीं त्याला या सुशिलाबाईजवळ पाळायला दिलं होतं.

**सत्यपाल**--मूल तुमचं नसून सुशिलाबाई म्हणतात माझं आहे म्हणून. मग—

**सरला**—माझी बेअब्रू होऊं नये म्हणून ही माउली खोटं बोलायला

तयार झाली. त्या कांहींही बोलल्या असल्या तरी सर्व हकीकत एका पत्रांत लिहून त्यांनीं आज सकाळींच मला दिली आहे.

**सत्यपाल**—हेंच तें पत्र आहे काय ?

**सरला**—( पाहून ) होय.

**सत्यपाल**--ठीक आहे. हे विचारतील त्या प्रश्नाचीं उत्तरं द्या.

**दलाल**--( हळूंच ) हीच संधी आहे. करा भडीमार नी काय ?

**त्रिमकचंद**—हें पहा मुलाच्या जन्मासंबंधींची सर्व हकीकत लग्नापूर्वीं आपल्या पतींना तुम्हीं सांगितली होती नां ?

**सरला**—नाहीं.

**त्रिकमचंद**—मग केव्हां सांगितलीत ?

**सरला**—आज सकाळीं सुशिलाबाई येऊन गेल्यावरच मीं प्रथम त्यांच्याजवळ बोललें.

**त्रिकमचंद**--मूल जिवंत असून तें सुशिलाबाईजवळ आहे हें तुम्हाला माहीत होत ना ?

**सरला**--नाहीं. उलट तें मेलं असं काकासाहेबांनीं विलायतेंत असतांना मला कळवलं होतं.

**बालकिसनदास**--(एकीकडे) अहो पुरे.

**त्रिकमचंद**—बरं आहे. बसा.

**सत्यपाल**--काकासाहेब पंडितांनां बोलवा. ( काकासाहेब येतात. )

**शिरस्तेदार**—तुमचं नांव काय ?

**काका०**—वामन नारायण पंडीत.

**सत्यपाल**--हें पत्र पहा. हें अक्षर तुमच्या परिचयाचं आहे काय ?

**काका०**--होय. हें अक्षर या सुशिलाबाईचं आहे.

**सत्यपाल**--कशावरून.

**काका०**--सुधाकराला मी यांचे जवळ संभाळायला दिला होता. त्या बाबतींत त्यांचा माझा वारंवार पत्रव्यवहार होत असे म्हणून.

**सत्यपाल**--हें पत्र वाचून सांगा पाहूं यांतला मजकूर खरा कीं खोटा तें.

**काका०**—सर्व मजकूर खरा आहे.

**सत्यपाल**—सुधाकरासंबंधींचा इतिहास तुम्ही सुशिलाबाईंना सांगितलां होता नाहीं का ?

**काका०**—होय. अनेक कारणामुळं मला तसं करणं जरूरच होतं.

**सत्यपाल**—आरोपीला तुम्ही घरांतून कां घालवलंत ?

**काका०**—सरलेच्या अल्लडपणाचा व अज्ञानाचा त्यानं फायदा घेऊन अत्यंत नीचपणाचं कृत्य केलं म्हणून.

**सत्यपाल**—आरोपीची एकंदर वर्तणूक कशी आहे ?

**काका०**—मी त्याला घरांतून घालवला व आतांपर्यंत परत घेतला नाहीं यावरूनच काय तें दिसत आहे.

**सत्यपाल**—पुरे.

**त्रिकमचंद**—मूल जिवंत असल्याचं तुम्ही सत्यपाल व सरलाबाई यांना कधीं सांगितलंत ?

**काका०**—केव्हांही नाहीं. उलट मूल मेलं असं खोटंच सरलेला मी विलायतेंत असतांना कळवलं होतं. तें ती खरं मानीत आली होती.

**त्रिकमचंद**—बरं आहे बसा.

**जज्ज**—मि. त्रिकमचंद हें पत्र तुम्ही वाचलंच आहे.

**त्रिकमचंद**—होय.

**जस्टीस**—सत्यपालांना धाक दपटशा देण्याकरितां सुशिलाबाईंना तुम्ही त्यांच्याकडे पाठवलं असं यांत तुमच्याविरुद्ध लिहिलं आहे त्याबद्दल तुमचं काय म्हणणं आहे.

**दलाल**—अहो सांगा, आम्हाला कांहीं माहीत नाहीं म्हणून.

**त्रिकमचंद**—सुशिलेनं त्यांत काय लिहिलं असेल तें तिचं तिला माहीत. आम्हाला यांतलं कांहींएक ठाऊक नाहीं.

**सुशिला**—(रागानं उसळून) कां उगीच दिवसाढवळ्या खोटं बोलतां. तुम्हीच मला माझ्या इच्छेविरुद्ध—

**दलाल**—(हळूंच) चूप–चूप. सुशिलाबाई—

**सुशिला**—खबरदार एक शब्द बोलाल तर. तुम्हीसुद्धां या कटांत सामील होतात.

**जस्टीस**—मग बाई–तुम्हीच हें पत्र लिहिलंत तर ?

**सुशिला**—( स्वगत ) दुसऱ्याला खोटं बोलतां म्हणून दोष देते अन् देवा, आतां मीच खोटं बोलायचं ?

**जस्टीस**—बाई ! भिऊं नका–खरं सांगितलंत तर तुम्हांला मी माफीचं अश्वासन देतों; पण खोटं बोलून इथं घेतलेल्या देवाच्या शपथेला तुम्ही बाध आणणार का ?

**सुशिला**—सांगते. सगळं सांगतें. तें–पत्र—

**जस्टीस**—सांगा—सांगा चटकन्.

**सुशिला**—मींच लिहिलं.

**जस्टीस**—मग यांतील सर्व मजकूर खरा आहे तर ?

**सुशिला**—होय.

**जस्टीस**—बरं बसा. मि. बालकिसनदास तुम्हीही त्रिकमचंदांच्या बरोबर यांत होतात असं यांत आहे ?

**दलाल**—सांगा माहीत नाहीं म्हणून. या शिकलेल्या माणसांचीं मन एकदम मरत नाहींत हेंच खरं.

**जस्टीस**—काय हो बोलत का नाहीं ?

**बालकिसनदास**—मला यांतलं कांहीं माहीत नाहीं.

**गोपाळ**—( एकदम पुढें येऊन ) खोटं–सरकार मी या ठिकाणीं सांगतों कीं, हे खोटं बोलताहेत.

**त्रिकमचंद**—ए मूर्खा फिर, मागं फिर—

**गोपाळ**—मागं फीर–? तुम्ही फिरा मागें. साहेब हे पाहा मला दटावत आहेत.

**जस्टीस**—मि. त्रिमकचंद हें तुमचं वर्तन गैर आहे.

**दलाल**—ए कोंकण्या फिरतों कीं नाहीं मागं.

**गोपाळ**—कोंकण्या ? साहेब हा पाहा मला कोंकण्या म्हणून शिवी देतो आहे.

**जस्टीस**—असला प्रकार जर इथं चालूं राहिला तर मला कडक उपाय योजावे लागतील. तुम्ही शपथेवर हे सांगायला तयार अहात कां ?

**गोपाळ**—होय, शपथेवर सांगायला तयार आहे.

**जस्टीस**--मग सांगा तर.

**गोपाळ**—साहेब मी कोंकण्या असलों तरी यांच्यासारखा खोटा मांग नाहीं. साहेब मी या बालकिसनदासांचा कारकून आहे. शिवाय हे तिघे जण या सुशिलाबाईना सत्यपालांकडे पाठविण्याचा बेत करीत होते, तें सर्व मी या कानानीं ऐकलं. त्या पत्रांत उल्लेख केलेल्या या तिघांच्या कारस्थानाप्रमाणंच हा पहा आरोपीनं दाखल करायचा जबाब यांनीं तयार केला आहे. हा जबाब मीच टाईप केला. (जबाब देतो.)

**जस्टीस**—काय हो दलाल, तुम्ही या कारस्थानांत—

**दलाल**—माय लॉर्ड, या मूर्खांनीं येऊन कांहींही बडबडावं व आपल्यासारख्या माणसांनीं त्यावर विश्वास—

**जस्टीस**—मीं विचारलेल्या प्रश्नांचं आधीं उत्तर द्या.

**दलाल**—रीतसर माझ्याविरुद्ध काम चालवा. मला काय सांगायचं तें मी त्या वेळीं—

**जस्टीस**—शट्अप्. आय शॅल सी अबाउट् धिस् लेटर ऑन.

**सत्यपाल**—माय लॉर्ड, या खटल्यांत माझ्या हेतुविषयीं शंका घेणारे प्रश्न विचारले गेले आहेत. मी या ठिकाणीं साक्षीदार म्हणून उभा आहे. विरुद्ध पक्षाला प्रश्न विचारायचे असल्यास विचारावेंत.

**त्रिकमचंद**—तशी मला कांहीं जरूरी वाटत नाहीं.

**जस्टीस**—मि. त्रिकमचंद तुम्हांला कांहीं पुरावा द्यायचा आहे काय?

**त्रिकमचंद**—नाहीं.

**सत्यपाल**—ज्यूरींतील सद्‌गृहस्थहो, या खटल्यासंबंधीं जो जो पुरावा माझें हातीं आला तो तो मी आपणांसमोर अक्षरशः मांडलेला आहे. त्याचा शांतपणें विचार करून आपण आपलं मत द्यावं इतकीच माझी आपणांस विनंति आहे.

**त्रिकमचंद**—मीही आपला अधिक वेळ घेत नाहीं. मला मुख्य दोन गोष्टी आपल्या नजरेस आणायच्या आहेत. मुलाचा खून घडला असं म्हणतात त्यावेळीं फक्त सुशिलाबाईशिवाय तिथं कोणीही नव्हतं. त्यांच्या म्हणण्यास पुष्टी देण्याकरितां दुसरा एकही साक्षीदार फिर्यादीपक्षानं पुढं आणला नाहीं. यदाकदाचित् आरोपीनंच हें कृत्य केलं असं मानलं तरी ते दारूच्या किंवा विकाराच्या आधीन झाल्यामुळं घडलं असावं. दुसरी

गोष्ट, गतायुष्यांतील रहस्य सरलाबाईनीं इतके दिवस आपल्या पतीजवळून लपवून कसं ठेवलं असेल याचं आश्चर्य वाटतं. आरोपीला दोषी ठरवण्यापूर्वी या सर्व गोष्टींचा विचार व्हाया इतकीच विनंती आहे.

**जस्टीस**—( ज्यूरीस ) दोन्ही बाजूंचा पुरावा तुम्हीं ऐकलाच आहे. त्याविषयीं मी जास्त कांहीं सांगत नाहीं. त्याचा विचार करून आपण आपलं मत द्यावं. आपल्याला बाजूस जायचं आहे काय ?

**फोरमन**--नाहीं.

**जस्टीस**—मग आपलं काय मत आहे ?

**फोरमन**—आमच्या सर्वांच्या मतें आरोपी हा दोषी आहे. पण शिक्षा देतेवेळीं या खटल्यांतील विशिष्ट परिस्थितीचा सहानुभूतीनं विचार व्हावा इतकीच विनंती आहे.

**जस्टीस**--ठीक आहे. ( आरोपीस ) तुम्हांला कांहीं सांगायचं आहे काय ?

**सुंदरराव**--मी खून केला असं जरी आपलं सर्वांचं मत असलं तरी माझं पाप मीच नाहींसं करून इतरांच्या सुखाचा मार्ग मोकळा करून दिला याचा कोणी विचार करीत नाहीं !

**जस्टीस**--बरं आहे. आमच्या समोर जो एकंदर पुरावा नमूद झाला आहे त्यावरून विचार करतां आरोपी पूर्ण दोषी आहे असं ज्यूरीप्रमाणं आमचंही मत आहे. सुशिलाबाईनीं या पत्रांत लिहिल्याप्रमाणें आरोपीची सुधाकरासंबंधींची नेहमींची खुनशी वृत्ती, वामनराव पंडीत यांच्याशीं त्याचं नुक्तच झालेलं कडाक्याचं भांडण व खुनाच्या पूर्वी संतापाच्या भरांत सुशिलाबाईच्या तोंडून बाहेर पडलेलं सुधाकराच्या जन्माचं रहस्य इत्यादि गोष्टी आरोपीनं खूनच केला आहे हें सिद्ध करण्यास पुरेशा आहेत. सुशिलाबाई प्रथम जरी या ठिकाणीं शपथेवर खोटं बोलल्या असल्या तरी त्यांत त्यांचा उच्च हेतू होता म्हणून आम्ही त्यांची तारीफच करतो. सरलाबाईनीं इथं येऊन, सत्य तेंच सांगून, न्यायास जी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. सत्यपालांच्या हेतूविषयीं शंका घेण्यास त्यांनी तिळभरही जागा ठेवली नाहीं. सरलाबाई व सत्यपाल या दोघांच्याही बद्दल सर्वांना पूज्यभावच वाटेल. त्रिकमचंद आदिकरून मंडळीकडून जें

वर्तन या खटल्यांत घडलं त्याचा आम्ही योग्य विचार करूंच. आरोपी-सारखे लोक हे समाजाचे खरे शत्रू आहेत, त्यांच्यासारख्या इतरांना दहशत बसण्याकरितां त्यांना फाशीची शिक्षाच योग्य आहे. परंतु जूरीच्या विनंतीस मान देऊन आम्ही त्यांस जन्मठेपेची शिक्षा देत आहोत. (पडदा).

---

## प्रवेश २ रा.

( **स्थळ**--हायकोर्टाजवळचा रस्ता. गोपाळ घाईनें जातो आहे. मागून तात्या दलाल प्रवेश करतो. )

**तात्या**—ए कोंकण्या-ए कोंकण्या-बरा सांपडलास इथं !

**गोपाळ**—हे पहा पुन्हा जर मला कोंकण्या म्हणशील तर—

**तात्या**—तर ? तर काय ? मूर्खा माझ्याविरुद्ध कोर्टांत बकलास. कोंकणांत मरत होतास म्हणून तुला मीं इथं उद्योगाला लावला. अन्नदात्याचे उपकार चांगले फेडलेस बरं बाबा ?

**गोपाळ**—अन्नदाता-? अन्न नव्हे तें वीष होत वीष !

**तात्या**—अगदीं खरं आहे. अन्न खाऊन वीष ओकलांस खरं.

**गोपाळ**—तुझ्यासारख्याजवळ अन्न खाऊन जगण्यापेक्षां बेहेत्तर आहे कोंकणांत नुसता ताकभात खाऊन मरेन.

**तात्या**—मर मर-तूं तो केशवराव, सगळे एकाच माळेचे मणी. मरा त्या सत्यपालाच्या नादीं लागून. लक्षांत ठेव, कोर्टांत माझ्यावर उलटलास ? पाहून घेईन तुम्हां सर्वांना. तो सत्यपाल-? हं—

**गोपाळ**—कशाला नांव घेतोस त्यांचं. त्यांच्या बुटांचीसुद्धां सर यायची नाहीं तुला समजलास !

**तात्या**—उमंटा, त्यांचे बूट तूंच बैस पुसत. तूर्त माझ्या बुटापासून तो आपला कसा बचाव करतो तें मला पहायचं आहे.

**गोपाळ**—का ? आज कोर्टांत साहेबांनीं चांगले कान उपटले अन् आतां तर तुमच्या वर्तनाची चौकशी सुरू केली. झाली इतकी फजिती पुरे

नाहीं का झाली ? सत्यपालासारख्या ऋषितुल्य माणसाला त्रास देण्याबद्दल चांगलं प्रायश्चित्त मिळालं–आतां काय करणार आहेसरे तूं त्यांचं ?

**तात्या**—काय करणार आहे ? पाहा काय करतो तें. अरे, कोर्टांत मोठ्या दिमाखानं सरला–सत्यपाल वागले. आपण मोठे सत्यप्रिय म्हणून क्षणभर त्यांना मिरवतां आलं खरं, पण पुढें—

**गोपाळ**—पुढें काय ?

**तात्या**—पुढें काय ? अं, त्यांची काळजी घ्यायला आधीं समाज आहे कीं तत्पर.

**गोपाळ०**—समाज म्हणजे कांहीं केवळ तुझ्यासारखे चार गुंड नव्हेत. कोर्टांत कित्येक जणांनां, सरला–सत्यपालांच्याविषयीं गौरवानं बोललेलं मी ऐकलं आहे समजलास.

**तात्या०**—ह्यः ह्यः बच्चा आहेस अजून बच्चा. अरे, तसं बोलायचा आपला शिष्टाचार आहे प्रतिष्ठित समाजांतला. कोर्टाच्या बाहेर पडून एकदां चार ठिकाणीं जा. खुनाचा विषय राहील एका बाजूला नी याच स्कँडलची चर्चा तुला सगळीकडे ऐकूं येईल. समाजाची नाडी तुला गांवढळाला काय कळणार आहे बाबा ? ( गोपाळ त्याचेकडे बघतो ) ( स्वगत ) समाजाबरोबर मलाही काळजी घेतली पाहिजे त्या सत्यप्रतिज्ञांची–अं रोजच्या सेन्सेशनल बातम्यावर जीव जगवणाऱ्या चार लेखकांनां हाताशीं धरतो नीं, चार महिने ठेवतो चर्चा चालू या सरलेच्या रहस्याची. कोर्टांत आमच्यासमोर दिमाख दाखवलान् नाहीं का ?

**गोपाळ०**—( स्वगत ) हा काय बेत करतो आहे आणखी. (उघड) हे पहा तूं आणि तो तुझ्यासारख्या गुंडांचा समाज यांची त्यांना पर्वा करण्याचं कारण काय ? मी नुक्तच ऐकलं कीं सरलाबाईचं हें रहस्य कळल्यावरच सत्यपालांनीं लग्न—

**तात्या०**—ह्यः ह्यः ! गोप्या अरे ऐक माझं ? तूं बच्चा आहेस अजून बच्चा. तुला मनुष्यस्वभाव कुठं कळतो आहे बाबा ? सत्यपाल कदाचित्-कदाचित घेईल थोडंस वागवून तिला–पण सरला ? भर कोर्टांतली बेअब्रू आणि यापुढची समाजाची चर्चा–नीट जगली या पुढं म्हणजे मिळविली.

इतकं कशाला खुद्द सुंदररावानं तर तिच्या स्वभावाचं वर्णन माझ्याजवळ– जाऊं दे–माझा पाणउतारा केला आहे तुम्ही सर्वांनीं, लक्षांत ठेवा.

**गोपाळ**—( स्वगत ) फार माजला आहे लेकाचा या मुंबईला येऊन. याला जरा हात दाखवला पाहिजे आतां.

**तात्या**—ए गोप्या, ए कोंकण्या–हे पहा झालं ते झालं. तूं गांवचा म्हणून पाहिजे तर एकदां तुझी गय करतो. नीट शुद्धीवर ये नी पुन्हा असं––

**गोपाळ**––( एकदम ) तात्या, शेक हँडस्, शेक हँडस्.

**तात्या**—शाबास–अगदींच कृतघ्न नाहींस.

**गोपाळ**––तें कांहीं नाहीं. आधीं शेक हँडस्. ( तात्या हात पुढं करतो, गोपाळ तो धरतो व त्याचीं बोटं जोरानं दाबतो. तात्या ओरडतो ) ओरड, म्हणशील कोकण्या पुन्हां ! म्हणशील !

**तात्या**––गोप्या–गोप्या ए ए—

**गोपाळ**––म्हणशील पुन्हां ?

**तात्या**––( मोठ्यानं ओरडून ) नाहीं नाहीं. ( हात सोडतो ).

**गोपाळ**—लक्षांत ठेव. मी बारीक असलों तरी कोंकणी रक्त आहे माझं–तुझ्यासारखं मुंबईचं खानावळी रक्त नाहीं. लेकाचा डबल ब्रेस्टचा कोट घालतो ऐटीनं !

**तात्या**—अरे पण ती हल्लींची फॅशन—

**गोपाळ**––फॅशन ? वीस इंच सुद्धां छाती नाहीं लेकाची अन् म्हणे डबल ब्रेस्ट ? करशील फॅशन ? फॅशनखालीं दुसऱ्याचे गळे कापणारे तुम्ही– देशील त्या सरला–सत्यपालांना त्रास ?

**तात्या**––( स्वगत ) छे, आपल्याला ब्रूट फोर्स मानवायचा नाहीं. आपलं शस्त्र म्हणजे डोकं.

**गोपाळ**––ए खानावळी रक्ताच्या, देशील का त्यांना त्रास ? बोलत कां नाहींस ? दाखवूं पुन्हां कोंणणी रक्त ?

**तात्या**––नको नको. अरे तशी मी उगीच तुझी गंमत करत होतों. अरे आम्ही, बॅरिस्टर, वकील वगैरे लोकांच्या भांडणाची रीत तुला माहीत नाहीं म्हणून इतका सीरीयस झालास तूं ? अरे, कोर्टात आम्ही एकमे-

कांच्या आंगाचे लचके तोडतो पण कोर्टाबाहेर–हे असं. ( त्याच्या गळ्यांत हात टाकतो ).

**गोपाळ**––( स्वगत ) असं ! कसा आला वठणीवर. ( उघड ) हे पहा अरे सत्यपालासारख्या सज्जनाशी वैर धरण्याऐवजीं त्यांना यापुढं तरी सुख कसं मिळेल हें आपण बघितलं पाहिजे.

**तात्या**––( स्वगत ) त्यांना सुख ? त्या सरलेचं स्वभाव वर्णन–तें सुंदररावाच्या रहस्याचं भूत—

**गोपाळ०**––काय ? मी म्हणतो तें खरं कीं नाहीं ?

**तात्या०**—हो हो तर. अरे त्यांना सुख कसं लाभेल याचाच विचार करीत होतों. बरं हें पहा मला आतां एक अपॉइंटमेंट आहे. मग भेटू आतां. हं, सरलेला सुख ! ( जातो. )

**गोपाळ०**—बेरड कुठला. ( जातो. )

**अंक पांचवा समाप्त.**

# अंक सहावा.

## प्रवेश पहिला

( **स्थळः**—सरलेची खोली. वेळ सायंकाळ. सरला, नारायण. व किसन प्र. क.
सरला पातळ नेसली असून पांढरी चोळी तिनं परिधान केली आहे.
नारायण आणि किसन यांच्या हातीं फराळाचं
सामान व कोको आहे. )

**सरला**--नारायण ते फराळाचं ठेव त्या टेबलावर. किसन ठेव तो कोको जवळ अन् ती खुर्ची जवळ कर त्या टेबलाच्या ( दोघेही तसं करतात व जाऊं लागतात. ) थांबा हं. नारायण, आठवतं कां तुला ! मला लहानपणीं तूं खांद्यावरून फिरावयास घेऊन जात असतांनाचा एक फोटो काढलेला आहे.

**नारायण**— होय ताई.

**सरला**--तो तुला फार आवडायचा आणि वारंवार तो तूं पहातोस नाहीं?

**नारायण**--होय.

**सरला**--हा घे तो फोटो. मी मुद्दाम तुझ्याकरितां या चांदीच्या फ्रेममध्यें तो घातला आहे.

**नारायण**--( आनंदानं ) ताई, फार चांगला आहे. मला फार आवडतो. पण आजच कां आपल्याला द्यावसा--

**सरला**—असूं दे–मला द्यायचाच होता तुला कधींतरी, अन् हें पहा काकांना आतां तूं नी सुशिलावहिनीनीं नीट संभाळायचं. माझ्या जागीं आतां तुला सुशिला वहिनीच तिथं आहेत.

**नारायण**--ताई--

**सरला**--समजलें. नको सांगायला कांहीं. अन् किसन माझ्या मैनेसह काढलेला हा एक माझा दुसरा लहानपणचा फोटो आहे, हा तुला घे. आणि काकांनीं मुद्दाम तुला इकडच्या तैनातीला दिला आहे. जायचं नाहीं हो इथून कधीं. नारायणाचा कित्ता समोर ठेव. बरं जा आतां. ( त्याच्या

पाठीवरून हात फिरवते. दोघे पहात जातात. सरला फराळाचं सामान नीट ठेवते. दरवाजाकडे एकदां बघते. सत्यपालांचें सामान आवरूं लागते--पण मध्येंच उठून खिडकीजवळ उभी रहाते. सत्यपाल प्रवेश करून तिच्याकडे पाहून स्तंभित होतात. )

**सत्यपाल**—( स्वगत ) हें काय, इतकी गंभीर ? आजपर्यंतचे हिचे मूड्स् या गंभीरतेपुढं कांहींच नव्हत. वास्तविक कोर्टांतील आजच्या हिच्या उदात्त वर्तनानंतर गतायुष्यांतील मनाच्या त्या टोंचण्या कमी होऊन त्या मूड्स् जाव्यात. आयुष्याला एक प्रकारचं नवचैतन्य मिळून पूर्वीचा ओघ पालटलेला दिसावा–पण आतांची ही हिची मुद्रा पाहून मन अधिकच अस्वस्थ होत. छे, हिला या अवस्थेंत फार वेळ राहूं देतां उपयोगी नाहीं. (उघड) सरले तिकडे काय बघते आहेस ? हा बघ तुझ्या देवीचा चेहरा किती प्रेमळ दिसतो आहे तो. (श्रीसरस्वती देवीच्या चेहऱ्याकडे सरला टक लावून बघते, तिचा ऊर भरून येतो; ती देवीला वंदन करते. सत्यपालही भक्तिभावानं गहिंवरून तिच्याबरोबर नमस्कार करतात.) देवी, आपल्या हृदयांतील वात्सल्य, माझ्या हृदयांत यावेळीं इतक्या जोरानं उसळूं द्या कीं, त्यांत न्हाऊन, माझ्या सरलेच्या अंतःकरणाला नवजीवन प्राप्त करून घेतां येईल. (सरलेच्या खांद्यावर हात ठेवून) सरले, माय डियरेस्ट चाइल्ड—

**सरला**—चाइल्ड ? नाहीं, मी मूल म्हणवून घेणार नाहीं.

**सत्यपाल**—मग काय आजीबाई म्हणूं ?

**सरला**--म्हणा, मला आजीबाईप्रमाणंच वागायचं आहे.

**सत्यपाल**--वाटेल त्याप्रमाणं वाग, वागव पण अशी बोलत रहा माझ्याशीं. त्या खिडकीजवळ किती वेळ तरी मुक्यासारखी उभी होतीस ! कोणत्या गूढ तत्त्वाचा विचार करीत होतीस ?

**सरला**—मनुष्यप्राणी हेंच मुळीं केवढं एक गूढ आहे.

**सत्यपाल**--लागलीस आजीबाईप्रमाणं तत्त्वज्ञान बोलायला !

**सरला**—आजीबाईप्रमाणं वागवून घेणार ना !

**सत्यपाल**--हो हो. पण तत्त्वज्ञान जर बोलायचं ठरवलं असशील तर—

**सरला**--ते कांहीं नाहीं; बोललेलं खरं करायचं ना ?

**सत्यपाल**––हो, हो, पहा म्हणजे झालं.

**सरला**—पहाते आतां. ( फराळाच्या टेबलाकडे जाते.)

**सत्यपाल**—हें काय ? चाललीस काय ? ये इकड; अं, काय करावं बुवा ? ( फ्लावर पॉट मधलं एक फूल घेऊन तिच्या डोक्यावर फेंकतात. सरला वर बघते. सत्यपाल तिची नजर चुकवून पुस्तकाचीं पानें उलटूं लागतात. )

**सरला**—यू नॉटी बॉय् ( त्याच्याकडे जायला लागते व मन आवरते )

**सत्यपाल**—काय म्हणतां आजीबाई ?

**सरला**—कांहीं नाहीं. फराळाची वेळ झाली. अगोदर फराळ करायचा. ( असं म्हणून त्यांचा हात धरून फराळाच्या टेबलाजवळ आणून बसवते. ) हं, करा सुरवात. तोंवर मी हें आवरतें. ( बिछान्यावर अस्ताव्यस्त पडलेला सत्यपालांचा सूट नीट घडी करून ठेवण्यास जाते. मागें पाहून ) हें काय ? खायचं नाहीं कां ?

**सत्यपाल**—आजीबाईनीं भरवल्याशिवाय कसं खाऊं ?

**सरला**—अं, कसं करतां तरी ? ( एक वडी घेऊन तोंडाजवळ नेते )

**सत्यपाल**—हं, पुरे पुरे. तूं खाल्याशिवाय आपण कशाला हात लावणार नाहीं. ये, बस पाहूं.

**सरला**—आजी मुलांच्या ताटांतलं खात नसते; शब्द पुरा करायचा ना ?

**सत्यपाल**—हो तर. ( खाऊं लागतात. सरला सूटची घडी घालण्यास जाते. ) आल्याबरोबर सूट तसाच फेंकलाना मी !

**सरला**—सूटच कशाला ? बूट त्या खुर्चीखालीं. ती उशी त्या कॅश बॉक्स्वर, अन् हा टाय इथं. कसन् काय ?

**सत्यपाल**—अग मग लग्न कशाला केलं आहे मीं ? तुझ्याशिवाय माझं कसं चालेल कुणास ठाऊक ? ( सरलेच्या हातून टाय गळून पडतो. तिचे ओंठ कांपूं लागतात. ) अं ? काय झालं आतां ? (सरला एकदम शांत होऊन टाय उचलते. )

**सरला**—( जवळ जाऊन ) कोको घेता ना ? ( सरला कोको ओतून पेला हांतांत देते )

**सत्यपाल**—( कोको घेत असतांना ) पुरें नाहींकां झालं ! आतां बैस इथं.

**सरला**—( स्वगत ) हे बोलूं लागले कीं मी पुन्हां स्वतःला विसरून जातें. काय माझ्या हातून होणार ? अशीच मी करीत राहिलें तर--

**सत्यपाल**—(पेला खालीं ठेवून) का ? विचार कसला चालला आहे ? आज जवळ बसायचं नाहीं वाटतं ?

**सरला**—ही सुपारी मसाल्याची नी ही सिगरेट ( सिगरेट तोंडांत देते व काडी ओढून तिला लावते. सत्यपाल तिच्याकडे पाहात धूर सोडतात.)

**सत्यपाल**—झालं कीं, अद्याप कांहीं राहिलं आहे आजीबाई ?

**सरला**--इच्छेप्रमाणं डोळे भरून खाल्लेलं पाहिलं. मनाला कसं समाधान झालं.

**सत्यपाल**--हे काय ? आतां मात्र ऐकणार नाहीं अं अगदीं. ये पाहूं अशी जवळ.

**सरला**--( स्वगत ) ह्यांचें हें असं बोलणं-ही प्रेमाची उत्कटता, हा मोह-अधिक जर इथं थांबलें तर मला आवरतां येणार नाहीं. तें कांहीं नाहीं. पुरें झालं आतां ( असं म्हणून प्रथम श्रीसरस्वती देवीला वंदन करते. त्यानंतर सत्यपालांना नमस्कार करून व प्रवासाची बॅग घेऊन ) येतें मी ( तिच्यानं पुढें बोलवत नाहीं. ती पटकन तोंड फिरवून जाऊं लागते. )

**सत्यपाल**—( तिला अडवून ) सरले, काय काय बोललीस ? कुठं चाललीस बाळ तूं ?

**सरला**--माझ्या परमेश्वराची सेवा करण्याची पात्रता मिळवण्याकरितां.

**सत्यपाल**—तुझा परमेश्वर ? कोण तुझा परमेश्वर ?

**सरला**--आपण-आपणच माझे परमेश्वर आहांत.

**सत्यपाल**—तसं असलं तर मग तुला जायला कशाला पाहिजे ?

**सरला**—आपली सेवा करण्याची पात्रता माझ्यांत नाहीं. अद्याप तो अधिकार मला नाहीं म्हणून.

**सत्यपाल**--तूं माझी धर्मपत्नी आहेस. कुणीं सांगितलं तुला तुझ्यांत पात्रता नाहीं म्हणून--

**सरला**—माझ्या गतायुष्यानं—

**सत्यपाल**—चल,भलतंच कांहीं तरी. हें पाहा, रात्रीं आपण महाबळेश्वराला जाऊं. चार दिवस तिथं राहूं-वरं वाटेल त्यानं तुला.

**सरला**--मला येतां येत नाहीं.

**सत्यपाल**--येतां येत नाहीं ! मग तूं कुठं जाणार !

**सरला**--हे पवित्र चरण मार्ग दाखवतील तिकडे ( श्रीसरस्वती-देवीच्या चरणाकडे बोट दाखवते. )

**सत्यपाल**--दाखवतील ! अद्याप दाखवला नाहीं ना ? तोंपर्यंत इथंच रहा.

**सरला**--( निश्चयानं ) शक्य नाहीं. आतांपर्यंत पोराप्रमाणचं वागत आले. आतां एकदां तरी मला शहाणपणानं वागूं द्यावं इतकीच विनंति आहे. ( गद्गद् स्वरांत ) येतें मी.

**सत्यपाल**--( तिला जवळ ओढून ) मी तुला जाऊं देणार नाहीं.

**सरला**--( स्वतःला सोडवीत ) आपण जाऊं देत नाहीं. इथं यापुढं रहाणं मला शक्य नाहीं; गडे, माझ्या जिवाची अशी ओढाताण कां करतां ?

**सत्यपाल**—( तिला घट्ट धरून ) तुझ्या जिवाची ओढाताण ! सरले, लाडके, माझ्या जिवाचं पाणी होतंयग. नकोग अशी बोलूस ! सांग, सांग, एका शब्दानं तरी तुला मी कधीं दुखावलं आहे का ! ( तिच्या गालावर गाल ठेवून तिला आणखी जवळ ओढतात.)

**सरला**--( श्वास घेऊन ) नाहीं बरं.

**सत्यपाल**--( तिला दूर धरून तिच्या चेहऱ्याकडे पहात ) मग सांग, अशी आंतड्याला तोडणारे शब्द तूं कां बोलतेस ?

**सरला**---काय सांगूं ! आपण शब्दानं, कृतीनं, कशा कशानंही मला दुखवलं नाहीं; दुखवणं शक्य नाहीं-लग्न झाल्या दिवसांपासून मी कशी वागत आलें हें दिसत असतां, दुखवलं नाहींत. सकाळपासून आपल्या हृदयावर एकसारखे घाव बसत होते तरी आपण मला दूर केली नाहींत, रागाचा किंवा तिरस्काराचा एक शब्दही आपल्या तोंडून निघाला नाहीं. प्रत्येक क्षणाला दयेचा, मायेचा माझ्यावर वर्षाव करून, पोटच्या गोळ्या-

प्रमाणं मला असं कुशींत घेतां; आपल्या चारित्र्यांतलं हें देवपण प्रत्येक-क्षणीं माझ्या नजरेस येतं आणि त्याचक्षणीं स्वतःचा हीनपणा मला पटतो. देवा, मग मी इंथ कशी राहूं ? आपलं खरं स्वरूप लग्नानंतरच प्रथम मला दिसलं, आणि त्या स्वरूपाशीं एकरूप होण्याची सात्त्विक महत्त्वाकांक्षा माझ्या हृदयांत प्रगट झाली. तेव्हांपासून एकरूप होण्याचा प्रयत्न करतें, तो काय करूं, मी अपात्र आहें हा विचार मनाला एकसारखा टोचतो आणि मी मागें परततें. देवा कसं सांगूं ? आज सकाळपासून घडलेल्या एकंदर प्रकारा-नंतर माझं मन मला इथं आतां एक क्षणभरही राहूं देत नाहीं.

**सत्यपाल**--सरले, सरले—

**सरला**—महाराज, आपण मला लाथाडलं असतंत, तर दुसरी लाथ खाण्याकरितां मी या पायापाशीं घुटमळत राहिलें असतें. रागावला असतात, तिरस्कारानं बघितलं असतंत, तर त्या रागाच्या आणि तिरस्काराच्या ज्वालेंत स्वतःला सतत जाळून घेण्याकरितां मी इथंच घुटमळत राहिलें असतें. आपण रागावला नाहीं, लाथाडलं नाहींत आपलं देवपण मला पटवलंत. देवा, आपला आशीर्वाद द्या. येतें मी. (पायाजवळ नम्र होते.)

**सत्यपाल**—सरले, सरले, ऊठ, ऊठ. तुझ्या या भावनेच्या ओघाला काय म्हणूं ? गतायुष्यांतील गोष्टी-? खास-असं बोलणारी, असं मानणारी सरला, खरी सरला नव्हे. पूर्वसंस्कार नसानसांतून भिनून जिच्या रक्ताबरोबर उसळताहेत, रूढीच्या, पिढ्यान् पिढ्या अज्ञानाच्या प्रभुत्वानं, जुनाट, पुराण विचारांचं वार्धक्य जिच्यावर चढलं आहे, आणि समाजाच्या तीक्ष्ण नजरेनं जी अंतर्बाह्य बावरली आहे, अशी ही माझ्यासमोर बोलणारी सरला, माझी खरी सरला ? खास नव्हे. माझी सरला ? अहाहा, त्या सरलेचं पवित्र दर्शन मला आज कोर्टांत झालं. निधड्या छातीनं तिथं येऊन, तें तसं उदात्त वर्तन करणारी सरला, तीच माझी खरी सरला-तीच माझी सरलादेवी.

**सरला**—मी आणि सरलादेवी ! आपली सरलादेवी; पण समाजाची सरलादेवी ? समाजाची निंदा कदाचित् आपल्या दर्जाकडे पाहातां सर्वच वेळीं आपल्या कानावर येणार नाहीं. पण--

**सत्यपाल**—पण ? पण काय ? आज समाज निंदा करील—उद्यां

तोच स्तुति करूं लागेल. परिस्थितीच्या अघातानंच समाजाचं स्वरूप पांलटत असत. तो तसा पालट म्हणजेच समाजाची सुधारणा. कुंतीला कौमार्यावस्थेंत पुत्र झाला, समाजानं तिच्याकडे त्यावेळीं वांकड्या नजरेनं पाहिलं असेल पण पुढें विवाह करून पराक्रमी अलौकिक पांडवांची झालेली माता म्हणून कुंती आजच्या युगांत वंदनीय आहे.

**सरला**—कुठं कुंती आणि कुठं मी ?

**सत्यपाल**--वा, असं का म्हणतेस ? थोर व्यक्तिंची अलौकिक कृत्यं राहं देत-पण आपत्कालीं त्यांनीं दाखवलेलं धैर्य-त्याचा तरी माणसानं अंगिकार करायला नको कां ?

**सरला**--त्या साध्वीचं धैर्य उभ्या आयुष्यांत माझ्या अंगीं येईल असं मला वाटत नाहीं. महाराज क्षमा करा, पण आपल्या उभयतांच्या तापदायक भावी आयुष्याशिवाय मला यावेळीं दुसरं कांहीं दिसत नाहीं.

**सत्यपाल**—आतां त्या आयुष्यांत सुखाशिवाय दुसरं काय आहे ?

**सरला**--काय आहे ? दैवयोगानं त्या आयुष्यांत मुलंबाळं झालीं आणि त्यांच्या मोठेपणीं जर आपल्या मातेचं पूर्वचरित्र त्यांना समजलं तर त्यांना काय वाटेल याचा विचार करा. वडिलांच्या उज्ज्वल चारित्र्यासमोर मातेची योग्यता-थँक गॉड. आय् हॅव् नो चाइल्ड. ( रडूं लागते. )

**सत्यपाल**--(तिला जवळ ओढून कुरवाळीत) नको गडे अशी रडूंस. सरले, अल्पवयांत तुझ्यावर एकसारख्या कोसळलेल्या प्रसंगांनीं तुझं मन व्याकुळ होऊन, तुझी बुद्धि मंद झाल्यामुळंच तूं असं बोलते आहेस.

**सरला**--नाहीं, निःसंशय नाहीं. त्या प्रसंगांनीं माझ्या आयुष्यांतील सर्व रस आटून टाकला असला तरी माझी बुद्धि शुद्ध करून, त्यांनीं मला आत्मज्ञान दिलं आहे-आपल्या माझ्यांत पसरलेलं अफाट अंतर माझ्या नजरेसमोर उभं केलं आहे. देवा, जीव तोडून खरं सांगतें हें अंतर तोडण्याचं सामर्थ्य यावं एवढ्याकरतांच मी जात आहें.

**सत्यपाल**—( गहिवरून ) सरले, तूं आज कशी नी काय बोलते आहेस हें तुला माहीत तरी आहे का ? तीन तीनदां जातें म्हणतांना तुझ्या अंतःकरणाला कांहींच का वेदना होत नाहीत ?

**सरला**—( गद्गद स्वरांत ) वेदना होत नाहींत ? कसं सांगूं !

**सत्यपाल**—( तिला एकदम जवळ घेऊन ) मग कां-कां असं बोलतेस ! सरले, माझा जीव तुझ्यांत कसा, किती, किती तऱ्हेनं गुरफटला आहे याची साक्ष, सरले तुला पुरेपुर पटलेली आहे. ( तीव्र भावनेनें तिच्या हृदयावरील आपलें मस्तक उचलून ) सरले, तुला समजत नाहीं, तूं गेलीस तर तुझ्याबरोबर श्रीलक्ष्मीही या गृहाचा त्याग करील आणि श्रीसरस्वतीलाही इथं रहावंसं वाटणार नाहीं. सर्व देवतांनींच या गृहाचा त्याग केल्यावर या अरण्यांत मी एकटा कसा राहूं ? तू माझी पत्नी आहेस. कायेनं, वाचेनं, मनानं, आपण एक आहोंत. मग--

**सरला**—छे, छे, छे, देवा, कांहींही असलं तरी आपण आत्म्यानं एक होणं शक्य आहे का ?

**सत्यपाल**—( तीव्रतेनं ) अशक्य असण्याचं कारणंच नाहीं. सरले, ज्यावेळीं मीं तुला प्रथम पाहिली त्याच वेळेस, तुझ्या या नेत्रांत माझं स्वतःचं रूप मला दिसलं; आणि सरले, आपण सर्वस्वी एक आहोंत ही जाणीव मला-तुलाही पटली. मग--

**सरला**—नाहीं, नाहीं. महाराज, माझ्यावरील प्रेमामुळं आपल्याला खरोखर अंध केलं आहे--आपल्यामाझ्यांत पसरलेलं अंतर त्यामुळेंचं आपल्याला दिसेनासं झालं आहे म्हणून प्रार्थना करतें. देवा--( पुढें बोलवत नाहीं )

**सत्यपाल**—बोल, कां थांबलीस ? बोल, बोल ना.

**सरला**—कां मला बोलायला लावतां-मी बोलत नाहीं, कां मला बोलायला लावतां ? ( तोंड दोन्ही हातांत झाकून बसते. )

**सत्यपाल**- नकोच बोलूंस तूं. अशीच माझ्या खांद्यावर डोकं ठेवून निजून रहा पाहूं.

**सरला**—निजून राहूं ! नाहीं. मी बोलत नाहीं, आपण मला बोलायला लावता. महाराज, मी प्रार्थना करतें, प्रेमानं असे अंध होऊं नका. देवा, आपल्या उभयतांच्या जिविताचं खरं रहस्य विवाहानंतरच्या एकांताच्या पहिल्याच प्रसंगीं या माझ्या जिवाला समजलं. त्या प्रसंगीं उरले सुरलेले सर्व पडदे दूर होऊन, उभयतांचे आत्मे, परमेश्वरी स्वरूपांत, एकमेकांना एकदम दिसले. पतीला देव कां मानतात हें मला त्या वेळीं प्रथम



सत्यपाल—आई—माते—    (अंक ६ पान १०२)

ठलं आणि विवाह हें साध्य नसून आत्मैक्याचं साधन आहे, याची पुरे- साक्ष त्याच वेळीं मला पटली. पण देवा, ते एकांताचे प्रसंग पुन्हा त तेव्हां जिवाजिवांच्या या अविरल भेटीमध्यें, माझ्या गतायुष्यांतील गाचा पडदा उभा रहातो आणि पहिल्या प्रसंगीं अनुभवास आलेल्या स्वरूपांत लीन न होतां मी सदा खिन्न, खिन्न होतें. ( रडत ) देवा, सलं केविलवाणं जिणं रोजच्या रोज जगण्यापेक्षां— ( सत्यपाल श्वास ोडून व टक लावून तिच्याकडे पहातात )

**सत्यपाल**—सरले, सरले तूं आहेस तरी कोण ? माझ्या प्रेमाच्या केला ओ देऊन एखाद्या अजाण अर्भकाच्या विश्वासानं माझ्याशीं विवाह- द्ध होणारी सरला, सत्यस्वरूपी परमेश्वराचं अस्तित्व सिद्ध करण्याकरितां कोर्टांत निधड्या छातीनं स्वतःचं गतायुष्य सांगणारी सरला, आणि त्मस्वरूप पाहिलेल्या तपस्व्याप्रमाणें तळपणारीही आजची सरला, या सर्व कच आहेत का ? सरले विवाहापूर्वीच मीं तुला पुरेपूर ओळखली आहे, ी मला घमेंड होती. पण या दैवी पुष्पाच्या कितीतरी पाकळ्या अद्याप ळायच्या होत्या आणि अद्याप कितीतरी मिटलेल्या असतील. ( हात डून ) देवा, तूंच निर्माण केलेल्या स्त्रीजातीचं ज्ञान तुलाही अद्यापि ालेलं नाहीं असं म्हणतात तें खरं नसेल तर, या जगांत तुझी सरला- रलादेवी म्हणून पूजनीय ठरणार कीं, आपल्या शीलाचं मोल देण्या- रतां निघालेली गुन्हेगार स्त्री ठरणार, याचा निर्णय, सर्वसाक्षी नारायणा, ातां तूंच दे. ( कोचावर पडतात व उशींत तोंड लपवून रडूं लागतात. )

**सरला**—( एकदम जवळ जाते पण थांबते ) हा वादविवाद मीं सार्चं चालूं दिला तर !—तर कसं होईल अखेर ! ( मन आवरून निश्चयानं मागें परतते व श्रीसरस्वतीदेवीच्या तसबिरीसमोर गुडघे टेकून ात जोडते ) भगवती देवी, तिकडचं माझ्यावर किती प्रेम आहे हें माझ्या वतःच्या प्रेमावरून मी ओळखूं शकतें. प्रेमापासून सर्वांचा उगम आहे, ेमानंच सर्व विश्वाला शुद्ध केलं आहे, स्वतः तूंच प्रेममय आहेस असा ाक्षात्कार, भगवती माते, तुझ्या कृपेमुळें जर मला झाला तर, त्याच- णीं माझ्या पतीच्या पायाशीं नम्र होऊन, त्यांच्या अंतःकरणाच्या वेद- ावर प्रेमाश्रूंनीं सिंचन करण्यास मी धावत येईन. या घरांत नांदणाऱ्या

पवित्र देवतांनो, मी सर्वस्वी शरण येऊन आपल्याचरणी प्रार्थना करे
कीं, कृपा करून आपण या गृहाचा कधींही त्याग करूं नका. आपल्य
शिवाय माझ्या पतीचा संभाळ कोण बरं करील ! मला समजत ना
मी तुम्हाला शरण आहें. देवी, आई, माते, येतें मी ( भक्तिभावानं श्
सरस्वतीदेवीला वंदन करते. नंतर उठून सत्यपालांच्याकडे येते व त्यां
नमस्कार करीत ) देवा, मला आपला आशीर्वाद सदैव असूं द्या, येतें मी
( असें म्हणून तडक जाऊं लागते.)

**सत्यपाल**—( एकदम उठून तिच्यामागें जातात ) सरले, लाडके-
( उच्च स्वरांत ) आई, माते-( खालीं मूर्च्छित पडतात.) ( आई, मा
अशी आपल्याला मारलेली हांक ऐकतांच सरला एकदम मागें वळते; आ
सत्यपालांचं मस्तक मांडीवर घेऊन आपल्या मुखानं तें कुरवाळतें.)

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. 9034 नों दि.
वि. ना२५ क्र.

IRBK-0101034
IRBK-0101034